आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, १५ ऑगस्ट २०२३
◉ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
◉ मराठी ◉ दैनिक
◉ वर्ष - ०३ ◉ अंक - १९
◉ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६
●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●TUESDAY 15 AUGUST 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-19 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-14 ●PRICE-5


चित्र : बाबूराव पाटील, भोकर

# अजून अमुच्या दुखण्यावरचे निदान बाकी आहे...!

आधुनिक केसरी न्यूज

*"घाव संपले देहावरचे निशाण बाकी आहे,*
*हृदयामधले झंझावती तुफान बाकी आहे !*
*सावलीस तू बघून मित्रा थांबू नकोस कुठे,*
*पोहचायचे जिथे तुला ते ठिकाण बाकी आहे !*
*स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे किती गोडवे गाऊ,*
*अजून अमुच्या दुखण्यावरचे निदान बाकी आहे..!"*

महाराष्ट्रातील प्रसिद्ध गझलकार गुलाब मेश्राम यांची अस्वस्थ करणारी गझल वाचली आणि मनाला भिडत गेली. आपला देश अमृत महोत्सव साजरा करीत असताना सभोवतालचे भय, चिंता आणि संवेदना थांबायचे नाव घेत नाहीत. रोज माणुसकीला काळीमा फासणाऱ्या घटना बघून सामाजिक जाणिवेचे हाल बघवले जात नाहीत. चिंतनाचे दोर सैल होऊन गळून पडत आहेत. समता, स्वातंत्र्य आणि बंधूता तत्त्वांची पायमल्ली पावलो पावली होत आहे. आणि त्याचा परिणाम म्हणून विषमतेचा डोंगर सामाजिक वैर आणि दुरावा निर्माण करीत आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी भोगलेल्या यातनांचा माणसांना विसर पडला. समतेला पायदळी तुडविले, बंधुतेने हात सोडल्यामुळे सामाजिक वेदनातिर्थ अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण करीत आहे. वेदना आणि तिची विविध रूपे दुःखाची चादर ओढून निपचित पडून आहेत. तात्विक समाज निष्ठांचे, सामाजिक जाणिवांचे तळ उध्वस्त केल्याने माणसांना वेगळ्याच मार्गावर चालावे लागत आहे. माणसांच्या अंगी असलेल्या कलाकृती नव उभारी घेतात परंतू त्यांना उभारी घेतली जाऊ दिली जात नाही. सत्याची कास धरीत त्या कलाकृती तळपताना दिसल्या की ठराविक लोकांची होणारी पोटदुखी उपचाराने देखील नीट होत नाही. म्हणून धगधगते वास्तव मांडताना आणि सभोवतालचे अस्वस्थ वर्तमान शब्दात मांडताना गझलकार गुलाब मेश्राम यांच्या वरील ओळी सद्यस्थितीत समाजाला आणि माणसांना डोळ्यात खोलवर बोटे घालतात. सर्वसामान्यांना सभोवताल चाललेला हैदोस नाही तर प्रेम आणि शांतता हवी आहे. हिंसा, जातीभेद, शत्रुत्व,अन्याय रोज चव्हाटयावर येत आहे. धार्मिक संघटना, राजकीय संघटना मनामनात भयभीत वातावरण निर्माण करीत रोज नवनव्या वादाला तोंड फोडताना दिसत आहेत. वाचाळवीरांनी तर पातळी सोडून वागणे पसंत केले आहे. त्यांचा रोजचा हैदोस समाजाने मान्य करायचा का ? त्यांच्या वक्तव्यांचे समर्थन करणारे समाजजाणीव देखील विसरले आहेत. जनसामान्यांचे प्रश्न अद्यापही जळत आहेत, लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारी बदल करणारी लोकशाही अर्धांगवायू झाल्यासारखी दिसत आहे. देशाच्या भविष्याची दशा आणि दिशा ठराविक लोकांनी पोकळ करून टाकल्याने व्यवस्थाच मुळावर आलेली दिसत आहे.

सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न उभा करीत आहेत. आणि त्यामुळे शेवटचा माणूस नागवलेला दिसत आहे. समाज गतकाळात झालेल्या शोषणाला विसरला नाही ,तरी सद्यस्थितीतील नवे शोषण अनेक आव्हाने उभा करीत आहे. देशभक्ती नवे रूप परिधान करून लोकशाही रंगात येत आहे. महामानवांचे अपमान, त्यांच्या विचारांना देण्यात येणारा खो, आणि त्यांचे उपकार यांचा सतत अपमान करणाऱ्या प्रवृत्ती आपले पाय घट्ट रोवून उभा आहेत. त्यांचा भावभावनांशी खेळ सुरू आहे. इतिहास पुसून नवा इतिहास घडवण्यासाठी जिगर लागते, धमक लागते. अशा परिस्थितीत इतिहासाची विकृत मांडणी व विवेकवादी विज्ञाननिष्ठा डावलणा-या प्रवृत्ती थांबायचे नाव घेत नाहीत. तेव्हा या प्रवृत्तींना विशिष्ट लोकांचा पाठिंबा मानवी भावभावनांना ठेच पोहचत आहे. देशाला शरमेने मान खाली घालणारी "मणिपूर घटना' अंगाचा थरकाप उडवते तेंव्हा राष्ट्रीय एकात्मतेची टीबी झालेल्या रुग्णासारखी अवस्था होत आहे. अशा परिस्थितीत देश विरोधी कारवाया करणा-या प्रवृत्तींचे सुद्धा मंगलमय सुरू आहे हे विसरता कामा नये.

देशाचे भवितव्य घडवणारी तरुण पिढी बरबाद होऊनत्यांच्यापुढे पुढे काय ? हा अस्वस्थ करणारा प्रश्न उभा आहे. अशातच अतिश्रीमंत मनसोक्त वावरताना दिसत आहेत. भ्रष्टाचारी, विवेक हरपलेले महाभाग अगतिक झालेले आहेत. ते पवित्र होण्याचे तीर्थ घेऊन उजळ माथ्याने फिरत आहेत. मग अशा परिस्थितीत निसर्ग देखील लहरी बनल्याने ऋतुचक्र उलटे फिरतानाचे बघून त्याचे पालटलेले रूप पाहायला मिळत आहे. याच स्थितीमुळे चिंता मनामनांत नवनवे प्रश्न उभा करीत आहे. द्वैत आणि अद्वैतेचे माणसातून हरवून जाणे कदापि परवडणारे नाही. काळजाची झुंबरं या स्थितीमुळे साद घालण्यात देखील धजावत नाहीत. तेव्हा फारच झालेली गडबड कानाची पाळी पकडते आणि मान हालवून नकार देते हे ध्यानात घेणे गरजेचे आहे. खरं तर आपला उद्या आजवरच उभा असतो. आपण आपल्या आज मध्ये उद्याचे जगणे जगत असतो. उद्या चांगला पाहिजे, सुखाचा पाहिजे म्हणून झटत असतो. खरेतर गेल्या काय दिवसांपासून सभोवतालचे काटेरी टोचणे माणसांची डोकेदुखी ठरली आहे. जगाचा कल्याणाच्या चेहरा मठ्ठ बनून तुमच्याकडे येण्याचा प्रयत्न करतो आहे ,त्याला स्वीकारणार का ? फसगत करणाऱ्या चेहऱ्यांना वेळीच ओळखण्याची ताकद आजमावली तर 'पेरले ते उगवेल बाबा, बेसावधपणे पेरू नको, हातीचा बाण सुटल्यावर मग उद्वेगाने झुरू नको.." हे मात्र याप्रसंगी लक्षात ठेवणे खूप महत्त्वाचे आहे.

बाळासाहेब जोगदंड, छत्रपती संभाजीनगर, संवाद : 9423051246

# 'ती' व्हायरल पोस्ट फेक

## सर्वोच्च न्यायालयाचा खुलासा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश धनंजय वाय. चंद्रचूड यांच्या नावाने एक मेसेज समाज माध्यमांवर वेगाने प्रसारित होत आहे. या मेसेजद्वारे लोकांना रस्त्यावर येऊन सरकारचा निषेध करण्यास सांगण्यात आले आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या नावाने व्हायरल होत असलेली ही पोस्ट बनावट असल्याचे स्पष्टीकरण सर्वोच्च न्यायालयाने दिले आहे. ही पोस्ट चुकीच्या हेतूने पसरवली जात असल्याचे न्यायालयाचे म्हणणे आहे. इंडियन डेमोक्रेसी सुप्रीम कोर्ट जिंदाबाद (भारतीय लोकशाही आणि सर्वोच्च न्यायालयाचा विजय असो) अशा मथळ्यासह हो पोस्ट व्हायरल केली जात आहे.**



या सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे की आम्ही ( सर्वोच्च न्यायालय – सरन्यायाधीश ) आमच्या बाजूने भारताचे संविधान, भारताची लोकशाही वाचवण्याचा प्रयत्न करत आहोत. परंतु, यामध्ये तुमचे ( लोकांचे ) सहकार्य खूप महत्वाचे आहे. सर्व जनतेने संघटित होऊन रस्त्यावर उतरून सरकारला त्यांच्या हक्कांबाबत प्रश्न विचारावा लागेल. तसेच या मेसेजमध्ये पुढे म्हटले आहे की, हे हुकूमशाही सरकार तुम्हाला ( जनतेला ) घाबरवेल, धमक्या देईल, पण तुम्ही घाबरण्याची गरज नाही, तुम्ही तुमचा आत्मविश्वास कायम ठेवा आणि सरकारला तुमचा हिशेब मागा, मी ( सरन्यायाधीश ) तुमच्या पाठीशी आहे. ही पोस्ट व्हायरल झाल्यानंतर याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या जनसंपर्क कार्यालयाने एक प्रसिद्धीपत्रक ( प्रेस नोट ) जारी केले आहे. या निवेदनात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, आमच्या ( सर्वोच्च न्यायालयाच्या ) निदर्शनास आले आहे की, एक सोशल मीडिया पोस्ट सध्या व्हायरल होत आहे, ज्यात सरकारविरोधात जनतेने रस्त्यावर उतरावे, असे आवाहन सर्वोच्च न्यायालयाने केले असल्याचे सांगितले आहे. यासाठी एक फाईल फोटोदखील वापरण्यात आला आहे. तसेच यात भारताचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांचा फोटो वापरून त्यांच्या नावाने हा कोट ( वक्तव्य ) प्रसारित केले जात आहे. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेली ही पोस्ट बनावट आहे. यामागे चुकीचा उद्देश असून खोडकरपणाने कुणीतरी हे केले आहे. भारताच्या सरन्यायाधीशांनी अशी कोणतीही पोस्ट शेअर केलेली नाही, किंवा असे वक्तव्य कुठेही केलेले नाही, याप्रकरणी योग्य ती कार्यवाही केली जात आहे.

# अठरा रुग्णांच्या मृत्यूला जबाबदार कोण ?

## नऊ सदस्यीय समिती करणार चौकशी


आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात शनिवार 12 ऑगस्टच्या रात्री 10.30 ते रविवार सकाळी 8.30 वाजेपर्यंत अशा दहा तासांत 18 रुग्णांचा मृत्यू झाल्याची दुःखद घटना घडली. या दुःखद घटनेची योग्य ती चौकशी करुन अशा घटना घडू नयेत. त्याची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समितीची स्थापना करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने मोठा निर्णय घेतला आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने ठाणे येथे झालेल्या त्या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी नऊ सदस्यीय समिती नेमली आहे. आरोग्य सेवा आयुक्तालयाचे आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती या प्रकरणाची चौकशी करणार आहे. या समितीमध्ये ठाणे जिल्हाधिकारी, ठाणे महानगरपालिका आयुक्त, आरोग्य सेवा संचालनालयाचे संचालक, जिल्हा शल्यचिकित्सक, आरोग्य सेवा ( राज्यस्तर ) सहसंचालक, वैद्यकिय आरोग्य देखभाल दुरुस्ती पथकाचे सहायक संचालक, भिषकतज्ञ ( आयुक्त, आरोग्य सेवा व्दारे नामनिर्देशित ) नाचू सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर ठाणे मंडळाचे आरोग्य सेवा उपसंचालक हे या समितीचे सदस्य सचिव असणार आहेत.


स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्ष समारोपानिमित्त ऐतिहासिक देवगिरी किल्ल्याच्या मिनारवर आकर्षक रोषणाई करण्यात आली.




## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

त्या गावात कितीतरी वस्तू बनवणारे कारागीर आहेत. त्यांना बहुतेक गोष्टी गावातच मिळून जात असतील, नाही का ?' 'पिंकी, अग स्वातंत्र्यपूर्व काळात तर आपली खेडी अतिशय स्वयंपूर्ण होती. गावातील लोकांच्या सगळ्या गरजा गावातच भागवल्या जात. एवढंच नाही तर गावातील लोक विविध वस्तूंचे उत्पादन करून शहरातील लोकांना पुरवठा करीत. भारतात जवळपास साडेसात लाख खेडी होती. खेडी म्हणजे उद्योगाची उत्तम केंद्रे होती. या गावांमध्ये इतके उत्पादन व्हायचे की गावातील लोकांच्या साऱ्या गरजा भागून त्या वस्तू निर्यात व्हायच्या. ' खेड्यातील हे सगळे कारागीर शेतकऱ्याला मदत करणारे असायचे. शेतकऱ्याचे काम ज्यांच्यावाचून अडून राहायचे अशा कारागिरांना बलुतेदार म्हणत असत. आणि ज्यांच्यावाचून शेतकऱ्याचे काम फारसे अडत नसे किंवा कधीतरी त्या लोकांची गरज लागे अशा लोकांना अलुतेदार म्हणत. ' श्यामलाताई म्हणाल्या. ' अलुतेदार आणि बलुतेदार किती गमतीदार शब्द आहेत ! हे आम्हाला नवीनच कळले. ' राजेश म्हणाला. ' आई, शेतकऱ्यांना ज्यांची गरज लागत असे बलुतेदार कोण मग ?'

' राजेश आणि पिंकी, अशा बलुतेदारांची संख्या साधारणपणे बारा होती म्हणूनच त्यांना बारा बलुतेदार म्हणत. काल सोपानकाकांच्या गावात तीन चार बलुतेदारांना आपण भेटलो. आपण रामुकाकांच्या दुकानावर गेलो. ते शेतकऱ्यांना लागणाऱ्या लोखंडाच्या वस्तू बनवतात. जसे नांगर, कुदळ, फावडे,विळा इ. ते लोहार. हरीकाका कुंभार मातीच्या वस्तू बनवतात. त्या सगळ्या गोष्टी रोजच्या वापरात उपयोगी पडणाऱ्या आहेत. सुतारकाका लाकडाच्या वस्तू बनवत होते. त्याही शेतीला लागणाऱ्या असतात. अशी आणखी शेतकऱ्याच्या उपयोगी पडणारी माणसे म्हणजे परीट, न्हावी, सोनार, तेली, माळी, कोळी. मांग, महार.'' बाळांनो, इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की आपण जातींबद्दल बोलत नसून बारा बलुतेदारांबद्दल बोलतो आहोत. ते ती ती कामे करीत असत. परीट गावातील लोकांचे कपडे घरोघर जाऊन गोळा करायचे आणि ते स्वच्छ धुवून आणून द्यायचे. आजकाल आपल्या शहरातील लॉँड्री जे काम करतात, ते काम परीट किंवा धोबी करीत असत. त्यांच्याबद्दल एक गमतीदार गोष्ट सांगू ?'' हो आई, सांग ना. आम्हाला आवडेल ऐकायला, ' राजेश म्हणाला. राजेश, या परीट समाजातील लोक व्यायाम करून आपले शरीर बळकट ठेवत असत. बरेचसे लोक उत्तम कुस्तीगीर किंवा पहिलवान असायचे.



समृद्ध प्राचीन वारसा



## आनंदी पहाट

## प्रत्येकाला समजून सांगण्यापेक्षा समजून घेण्याची गरज

आधुनिक केसरी

एकमेकांचं ताळतंत्र, थोडं का होईना, पण सांभाळायला लागतं. संवादाचं सुख ही ज्याची त्यानी अनुभूती घेण्याची बाब असते. स्वतःच भावनिक, मानसिक, आंतरिक आणि शारीरिक पातळीवर प्रत्येक संवाद घडवून आणायचा असतो. ह्या सर्वच बाबींचं समीकरण कसं मांडायचं हे ज्याला माहिती होतं, त्याला संवादात पूर्णपणे सहभागी होऊन त्या संवादाचं सुख प्राप्त करून घेता येतं. संवादाचं सुख प्राप्त करण्यासाठी सकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहार अंगीकारण्याची गरज असते. खरं तर हा पूर्णपणे त्या नेतृत्वाचा प्रभाव असल्याचं दिसून येतं. नेतृत्वामध्ये समजावून सांगण्यापेक्षा समजून घेण्याची गरज लक्षात घ्यावी लागत असते. ह्याची काहीवेळा नेतृत्वाला जाणीव रहात नाही, पर्यायानं त्याच्या नेतृत्वाला कर्तुत्वाची उणिव असल्याचं समजलं जातं. नेतृत्वामध्ये वक्तृत्वाचा आभाव असून चालत नाही ह्याची जाणीव सतत ठेवणं महत्वाचं असतं. ह्यासाठी नेतृत्व कौशल्य असणं आवश्यक ठरत असतं. नेतृत्व करण्यामध्ये व्यक्तींच्या समूहाला आपलंसं करणं महत्वाचं असतं. नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीच्या वक्तृत्वामुळे आणि कर्तुत्वामुळे कोणत्याही व्यक्तींचा समूह विश्वासानं, आदरानं, प्रेमानं, काही ठराविक अपेक्षेनं एकत्र येतो, सहभागी होत राहतो, नेतृत्व म्हणेल - सांगेल ते ऐकायला तयारही होत राहतो. जेव्हा दोन पेक्षा अधिक व्यक्तींचा समूह तयार होतो, तेव्हा समूहाच्या आवश्यकतेनुसार कमी अथवा अधिक संख्या ठरत असते. समूह संवादाचे रूप म्हणजे जनसंवाद. यामध्ये संप्रेषक आणि श्रोता यांचा थेट संवाद प्रस्थापित न होता तो एखाद्या जनसंवाद माध्यमाद्वारे प्रस्थापित होतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**व्याकुळ मनाला | शांती लाभे ||**
व्याधाच्याअंगणी | व्याकुळ पाडस ||
नाही दुजी आस | आईवीना ||२||
तैसा मी व्याकुळ | संसाराच्या ठायी ||
सांग तू विठाई | भेट केव्हा ||२||
अंतरीचा धावा | ऐकणार कधी ||
विकारांची व्याधी | क्लेशदायी ||३||
तुझ्या कृपे विठु | तारिले अनाथा ||
ज्ञानेश्वरी गाथा | माय झाली ||४||
तुझ्या चरणी हा | दास लीन झाला ||
व्याकुळ मनाला | शांती लाभे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी


मे चित्तममलं देवि कुरुश्व निर्मलं कृपे |
दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम्|| ६५
|| हे कृपे, हे देवी, माझे चित्त अमल कर, निर्मल
कर. दारिद्र्यदुःख नष्ट करण्यासाठी मी तुला
दुर्गा देवीला नमन करतो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

गो मन प्रज्ञा संग में, कर्म भजन नहिं जान ।
चेतन शुद्ध उत्थान में, परम तत्त्व पर ज्ञान
।।३६।।(स्वर्वेद पंचम मण्डल षोडश
अध्याय) ०५/१६/३६
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
इंद्रिय, मन तसेच बुद्धीच्या संगतीत भक्ती होत नाही तर कर्म होते. प्रकृतीच्या पलीकडे जाऊन आत्म्याचा जेंव्हा शुद्ध विकास होतो तेंव्हा भजन (भक्ती) होते आणि सूक्ष्म परब्रह्माचे ज्ञान होते.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास
वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## तुकाराम गाथा


आधुनिक केसरी

म्हणती जाणे जीवीचें । लाजे त्यास येथें कैचें । शेष कृष्णाचें । लाभ थोरिवे ॥११॥ धन्य दिवस काळ । आजी पावला गोपाळ । म्हणती धालों रे सकळ । तुझिया नि हातें । मानवले गडी । एक एकांचे आवडी । दहीं खादलें परवडी । धणीवरी आजी ॥१२॥
तुझा संग बरवा । नित्य आम्हां द्यावा । ऐसें करूनि जीवा । नित्य देवा चालावें । तंव म्हणे वनमाळी । घ्यारे काठिया कांबळी । आतां जाऊं खेळीमेळीं । गाई चारावया ॥१३॥
तुका म्हणे प्रेमें धालीं । कोणा न साहवे चाली । गाई गोपाळांसि केली । आपण यांसरी ।आजि जाला
आनंद । आजि जाला आनंद । चाले परमानंद । सवें आम्हांसहित ॥१४॥ या हो या चला जाऊं सकळा । पाहों हा सोहळा आजि वृंदावनींचा ॥१॥ वाइला गोपाळें वेणुनाद पडे कानीं । धीर नव्हे मनीं चित्त जालें चंचळ ॥ध्रु.॥ उरलें तें सांडा काम नका करूं गोवी । हे चि वेळ ठावी मज कृष्णभेटीची ॥२॥ निवतील डोळे याचें श्रीमुख पाहातां । बोलती तें आतां घरचीं सोसूं वाईट ॥३॥ कृष्णभेटीआड कांहीं नावडे आणीक । लाज तरी लोक मन जालें उदास ॥४॥ एकाएकीं चालियेल्या सादावीत सवें । तुका म्हणे देवें रूपें केल्या तन्मय ॥५॥ फुगड्या - अभंग २
फुगडी फू फुगडी घालितां उघडी राहे । लाज सांडोनि एक एकी पाहे ॥१॥ फुगडी गे अवघें मोडी गे । तरीच गोडी गे संसार तोडी गे ॥ध्रु.॥ मागें जें शिकली होतीस पोटीं । तें चि विचारूनि आतां उच्चारी ओठीं ॥२॥ त्रिगुणांची वेणी तुझे उडते पाठीं । सावरूनि धरी घाली मूळबंदीं गांठी ॥३॥

## नाम व विकल्प !

आधुनिक केसरी

नाम घेऊ लागले की विकल्प उठतात आणि ते घेण्याबद्दलची निष्ठा कमी होते, याला काय करावे ? अशी तक्रार आपण सर्वसाधारणपणे करतो; पण असे होण्यातच नामाचे महत्त्व प्रस्थापित होते हे आपल्या लक्षात येत नाही. मनुष्य नाम घेऊ लागला की विकल्पांना असह्य होते, आणि आता हा नाम घेऊ लागला, आता आपली धडगत नाही अशा धास्तीने त्यांची चळवळ चालू होते, आणि मनुष्याला नामापासून परावृत्त करण्याचा ते प्रयत्न करतात. विकल्प हे अती सूक्ष्म आहेत. त्यांचे उच्चाटन करायला त्यांच्यापर्यंत पोहोचणारा आणि तितकाच सूक्ष्म असा उपाय पाहिजे. तो उपाय म्हणजे भगवंताचे नाम. एखाद्या बिळात सर्प शिरला तर त्याला बाहेर काढण्याकरिता त्याच्यापर्यंत पोहोचून त्याला तिथे राहणे असह्य करील असाच उपाय करणे जरूर असते. बाहेरून कितीही आरडाओरडा केला तरी त्याचा उपयोग होत नाही. बिळात धूर किंवा गरम पाणी सोडले की तो बाहेर येतो. त्याप्रमाणे नाम घेतले की विकल्प उठतात, म्हणजे विकल्पांच्या मूळ ठिकाणापर्यंत नामाची आच जाऊन पोचली असे ठरते. तर मग नाम घेऊ लागल्यावर विकल्प येऊ लागले तर गांगरून न जाता, हे सुचिन्ह आहे असे समजून विकल्पांच्या उच्चाटनाची गुरूकिल्ली मिळाली अशा जाणिवेने, जास्त आस्थेने नाम घेण्याचा निश्चय करावा हाच त्याला उपाय. नामाबद्दल सुरूवातीला सर्वांचीच वृत्ती साशंक असते, पण आपण सतत नाम घेत गेल्यानेच विकल्प कमी होतात. कोणतीही गोष्ट अभ्यासानेच साध्य होत असते. आज खरी भक्ती नाही म्हणून भगवंताचे स्मरण नाही; आणि भगवंताचे स्मरण ठेवण्याचा अभ्यास केल्याशिवाय खरी भक्ती येत नाही. शहाण्या माणसाने उगीच विकल्प न लढविता भगवंताचे स्मरण ठेवायला आरंभ करावा. विकल्प जाऊन भगवंताचे संकल्प उठू लागले की आपले काम झाले. आपण रस्त्याने चाललो की नको ती माणसे भेटायचीच; पण आपण आपले नाम चालू ठेवावे. तसे, विकल्प आले तर नाम सोडू नये. पण गंमत अशी होते की, वाईट मनुष्य भेटला आणि आपण त्याच्याकडे लक्ष द्यायचे नाही असे म्हटले तरी, तो मुद्दाम खाकरतो आणि आपले लक्ष वेधतो. अशा वेळी त्याच्याकडे पाहूनही आपण दुर्लक्ष करतो. त्याचप्रमाणे विकल्पांनी आपले लक्ष ओढून घेतले तर नावडीने लक्ष द्यावे पण आपले नाम सोडू नये. शंका घ्यायचीच झाली तर नाम चालू ठेवून घ्या, म्हणजे ते नामच शंकांचे निरसन करील आणि विकल्पांनाही हळूहळू पायबंद घालील.



## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

परंतु घ्यायचे काही जमले नाही; ते आता घेऊ लागलो हे त्याच्या कृपेने घेऊ लागलो हे नाही का समजू ? गुरूच्या इच्छेप्रमाणे आपण वागलो, म्हणजे माझी इच्छा नाहीशी च नाही का झाली ? या मध्ये अभिमान अनायासे मारला जातो. मी पणा टाकल्या शिवाय गुरु आज्ञा नाही पाळता येत. गुरु आज्ञा प्रमाण मानून माझी इच्छा मी दाबू लागलो तरी सुद्धा ती आपले डोके मधूनमधून वर काढतेच. पण तिला एकदा कळले की हा ऐकत नाही, की मग ती हळूहळू नाहीशी होत जाते. देह अर्पण करण्या पर्यंत मजल आली, तरी गुरु आज्ञा मोडू नये. देहातीत व्हायला, गुरुआज्ञेप्रमाणे वागणे या परते दुसरे काय आहे ? 'मी देही नाही' असे म्हणत राहिला, तर माणूस केव्हा तरी देहातीत होईल.गुरूने सर्व करावे ही गोष्ट सत्य आहे, आणि तो करतो ही ही गोष्ट तितकीच सत्य आहे. पण आपण खरोखर सच्छिष्य आहोत की नाही हे पाहावे. देहातीत व्हायला, गुरूआज्ञेप्रमाणे वागणे यापरते दुसरे काय आहे ? . क्रमशः

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

विद्वत्त्वं च नृपत्वं च नैव तुल्यं कदाचन ।
स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते ॥
सरलार्थ - विद्वत्ता आणि राजेपण (यांची) कधीही तुलना होऊ शकणार नाही.. राजा त्याच्या देशातच पूजिला जातो. (पण) विद्वानाची (मात्र) सर्वत्र पूजा होते. स्पष्टीकरण - आणखी एक फरक आहे. राजा किंवा सत्ताधारी पुरुष जोवर त्या सत्तास्थानावर आहे, तोवरच त्याचा आदर-सन्मान होतो. विद्वानाचे तसे नाही. कुठल्याही देशात गेला तरी त्याचा आदर होतो; आणि तो मरेपर्यंत आणि मेल्यावरही टिकून राहतो. पाणिनी, शंकराचार्य, कालिदास हे मरून शेकडो वर्षे लोटली आहेत, तरी पण विद्वान् आणि रसिक आजही त्यांच्या स्मृतीला वंदन करतात.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, १५ ऑगस्ट २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# धनगर समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सरकार कटिबद्ध

## मुनगंटीवार : चंद्रपुरात धनगर समाज मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

चंद्रपूर : धनगर समाजाच्या एकात्मिक विकासासंदर्भात मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात बैठक होणार आहे.



धनगर समाजाची प्रगती व्हावी आणि हा समाज मुख्य प्रवाहात यावा, यासाठी सरकार कटिबद्ध आहे, असा विश्वास राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

चंद्रपूर येथील धनगर समाज सेवा मंडळाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या २२८व्या पुण्यतिथीनिमित्त धनगर समाज मेळावा व गुणवंतांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळी ना. श्री. मुनगंटीवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रियदर्शनी इंदिरा गांधी सभागृहात आयोजित या कार्यक्रमाला आमदार गोपिचंद पडळकर, चंद्रपूर धनगर समाजाचे जिल्हाध्यक्ष डॉ. मगेश गुलवाडे, जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्याम वाखर्डे, सिनेट सदस्य वामन तुर्के, डॉ. तुषार मार्लावार, विलास शेरकी, साईनाथ बुच्चे, लक्ष्मीताई दरेकर, महेश देवकाते, ज्योतीताई येग्गेवार, विजय कोरेवार, श्री. गवारकर, श्री. खाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मृतिंना अभिवादन करून त्यांच्या मार्गावर चालण्याचा संकल्प करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. ते म्हणाले, 'पुण्यश्लोक अहिल्याआई होळकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्याचे काम केले. महाराष्ट्रातून मालव्यापर्यंत विजयाची पताका फडकवली. जनतेच्या मनावर राज्य केले. मालव्यातील प्रत्येक ठिकाणाने अहिल्यादेवीना परमेश्वरासमान स्थान दिले आहे. त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे आणि अभिमानही बाळगला आहे. हे चित्र मी डोळ्याने बघितले तेव्हा माझी मानही अभिमानाने उंचावली. राज्य कारभार कसा चालवावा, याचा पाठ छत्रपती शिवाजी महाराजांनंतर अहिल्याआईंनी आपल्या कर्तृत्वातून दाखविले आहे.' धनगर समाजाचे अनेक प्रश्न आहेत आणि ते सुटावे यासाठी सरकार सातत्याने प्रयत्न करीत आहे. धनगर समाजाच्या योजना एकात्मिक पद्धतीने राबविण्याचे काम व्हावे, यासाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात लवकरच बैठक होणार आहे. धनगर समाजाने देशाच्या प्रगतीत सेवा भावी वृत्तीने आपले योगदान दिले, याची पूर्ण जाणीव सरकारला आहे, असेही ना. श्री. मुनगंटीवार म्हणाले.

चंद्रपूर जनतेच्या शुभेच्छा तुमच्या सोबत

धनगर समाजाने औरंगजेबाच्या विरोधात छत्रपती शिवाजी महाराजांसोबत लढा दिला. आता धनगर समाजाची मुख्य प्रवाहात येण्याची जी लढाई आहे, त्यात चंद्रपूर जनतेच्या शुभेच्छा तुमच्या सोबत आहेत, असेही ना. श्री. मुनगंटीवार म्हणाले.

# तरुणाच्या त्रासामुळे मुलीचा आत्महत्येचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** सडक सख्याहरी तरुणाच्या त्रासामुळे शाळकरी मुलीने गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना औंध भागात घडली. याप्रकरणी चतुःशृंगी पोलिसांनी एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सागर कांबळे ( वय २८, रा. डी. पी. रस्ता, औंध ) असे गुन्हा दाखल केलेल्या आरोपीचे नाव आहे.




# आज शिवप्रतिष्ठानची हिंदवी स्वराज्य पदयात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** महात्मा गांधी यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने अडचणीत आलेल्या शिवप्रतिष्ठानचे संस्थापक संभाजी भिडे यांच्या उपस्थितीत स्वातंत्र्यदिनादिवशी सांगलीत हिंदवी स्वराज्य स्वातंत्र्यदिन पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या पदयात्रेला पोलीसांनी काही अटींसह सोमवारी परवानगी दिली. हिंदवी स्वराज्य स्वातंत्र्यदिन पदयात्रेला परवानगी देऊ नये अशी मागणी पुरोगामी संघटनांनी केली होती. पोलीस अधिकारी व संघटनेचे पदाधिकारी यांची सोमवारी बैठक झाली. या बैठकीनंतर पदयात्रेला परवानगी देण्यात येत असल्याचे पोलीसांनी सांगितले.




# पंतप्रधानांच्या हस्ते होणार सरपंच मंगला मेश्राम यांचा सत्कार

## चंद्रपूर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** पाणी हा प्रत्येकाच्याच आयुष्याचा एक अविभाज्य भाग



आहे. उन्हाळा आला की पाणी टंचाईच्या बातम्या आपण नेहमीच वाचतो नी हळहळ व्यक्त करतो. परंतू ही पाणि टंचाई कायम दुर व्हावी यादृष्टीने मात्र फार कमी लोकं प्रयत्न करतात.

चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी तालुक्यातील लाखापुर च्या सरपंच सौ. चंद्रकला मेश्राम यांनी मात्र याबाबतीत अतिशय मोलाचे काम केले असून त्यांनी केलेल्या कार्याची पावती म्हणून थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते येत्या 15 ऑगस्ट ला त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

केंद्र सरकारच्या जलशक्ती मंत्रालयाच्यावतीने जिल्हयातील " हर घर जल " योजनेअंतर्गत चांगले काम केलेल्या व्यक्तींना स्वातंत्र्यदिनी 15 ऑगस्ट ला दिल्ली येथील लाल किल्ल्यावर होणाऱ्या समारंभात सहभागी होण्यासाठी विशेष पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे. चंद्रपुर जिल्हयातील ब्रम्हपुरी तालुक्यातील लाखापुर येथील सरपंच चंद्रकला मेश्राम यांचा यात समावेश असून स्वातंत्र्यदिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते श्रीमती मेश्राम यांचा सत्कार होणार आहे.

चंद्रपुर जिल्हयात जल जीवन मिशन अंतर्गत ठीकठिकाणी कामे सुरु आहेत. अनेक ठिकाणी कामे पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत तर , काही ठिकाणी कामे पूर्ण झाली असून त्या गावात प्रत्येक घरी नळाव्दारे पाणी पोहचले आहे. जिल्हयातील अनेक गावे हर घर जल घोषित झालेली आहेत. अनेक ठिकाणी त्या गावातील सरपंच किंवा तेथील ग्रामपंचायत सदस्य समिती, स्वयं सहायता बचत गट यांनी चांगले काम केले आहे.

केंद्र शासनाने चंद्रपुर जिल्हयातील ब्रम्हपुरी तालुक्यातील लाखापुर येथील सरपंच चंद्रकला मेश्राम यांनी, जलजीवन मिशन योजनेमध्ये दिलेल्या योगदानाची दखल घेतली असून त्यांना येत्या 15 ऑगस्ट रोजी दिल्ली येथे होणा-या समारंभात सहभागी होण्यासाठी सरपंच चंद्रकला मेश्राम आणी त्यांचे पती यांना उपस्थित राहण्याबाबतचे निमंत्रण केंद्र शासनाकडून देण्यात आले आहे. या कार्यक्रमाला चंद्रपुर जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( पाणी व स्वच्छता ) नुतन सावंत यांना महाराष्ट्र राज्याकडून या कार्यक्रमाचे नोडल अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात आले आहे.

चंद्रकला मेश्राम यांच्या निवडीबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. चंद्रपुर जिल्हयातील महिला सरपंच यांचा देशाच्या स्वातंत्र्यदिनी लाल किल्यावर सन्मान होणे, ही चंद्रपुर जिल्हयासाठी अभिमानाची बाब आहे. याच पावलावर पाऊल ठेवून इतरांनी प्रेरणा घ्यावी व गावाचा विकास साधावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

चंद्रकला मेश्राम यांच्या निमित्त्याने चंद्रपुर च्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून त्यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल व होणाऱ्या सत्कार समारंभाबद्दल त्यांच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## कॅगचे ताशेरे

आधुनिक केसरी

एखाद्या प्रकल्पाला होणारा विलंब किंवा त्यातील कच्चा माल वा इतर गोष्टींमुळे प्रकल्पाच्या एकूण किंमतीत वाढ झाल्याची अनेक प्रकरणं समोर आली आहेत. या वाढलेल्या खर्चाचा भार शेवटी देशाच्या करदात्यांवरच येऊन पडत असल्याची टीकाही अनेकदा केली जाते. मात्र, आता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या खात्याच्या अर्थात रस्ते वाहतूक खात्याच्या एका प्रकल्पाची किंमत तब्बल १४ पटींहून जास्त वाढल्याचा प्रकार समोर आला आहे. यासंदर्भात कॅग अर्थात भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षकांनी मोदी सरकारवर ताशेरे ओढले आहेत. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भात सविस्तर वृत्त दिले आहे. कॅगच्या ताज्या अहवालामध्ये दिल्ली ते गुरगाव या राष्ट्रीय महामार्ग ४८ वरील २९.०६ किलोमीटरच्या टप्प्याचा उल्लेख करण्यात आला आहे. द्वारका एक्स्प्रेस वेवरील या मार्गासाठी प्रकल्प मंजूर झाला तेव्हाचा खर्च होता १८ कोटी २० लाख रुपये प्रती किलोमीटर इतका. पण आता या प्रकल्पाच्या बांधकामाचा खर्च तब्बल २५० कोटी ७७ लाख इतका वाढला आहे. अर्थात, प्रकल्प खर्चात १४ पटींहून जास्त वाढ झाली आहे. त्यामुळे या प्रकल्पाच्या किंमत वाढीची जोरदार चर्चा दिल्लीच्या राजकीय वर्तुळात रंगली आहे. या २९.०६ किलोमीटर मार्गामध्ये ८ एलिव्हेटेड मार्गिका तर सहा सामान्य मार्गिकांचा समावेश आहे. दिल्ली-गुरगाव राष्ट्रीय महामार्ग ४८ वरील वाहतूक कोंडीच्या समस्येवर उपाय म्हणून हा प्रकल्प हाती घेण्यात आला. भारत परियोजना २०१७-१८ ते २०२०-२१ चा भाग म्हणून या प्रकल्पाचं नियोजन करण्यात आलं आहे. कॅगनं आपल्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे, द्वारका एक्स्प्रेस वे आधी हरियाणा सरकारकडून बांधला जाणार होता. यासाठी हरियाणा सरकारने १५० मीटर रुंदीचा पट्टा अधिग्रहीत केला. मात्र, यानंतर या प्रकल्पासंदर्भात हरियाणा सरकारकडून कोणतीही प्रगती न झाल्यामुळे हा प्रकल्प भारत परियोजनेत समाविष्ट करण्यात आला. त्यासाठी हरियाणा सरकारने ९० मीटर रस्ता रूंदीचा पट्टा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला मोफत हस्तांतरीत केला. प्रकल्पाच्या आधीच्या नियोजनानुसार १४ सामान्य मार्गिकांचा महामार्ग बांधला जाणे अपेक्षित होते. त्यासाठी हरियाणा सरकारने हस्तांतरीत केलेला ९० मीटर रुंदीचा पट्टा पुरेसा होता. मात्र, कोणतेही स्पष्ट कारण न देताच या ठिकाणी १४ सामान्य मार्गिकांच्या रस्त्याऐवजी ८ उन्नत मार्गिका व ६ सामान्य मार्गिका असा बदल करण्यात आला. इतक्या मोठ्या बांधकामामुळेच या प्रकल्पासाठी तब्बल ७ हजार २८७ कोटी २९ लाख रुपये एवढी मोठी रक्कम मंजूर करण्यात आली. त्यानुसार प्रकल्पाच्या प्रत्येक किलोमीटरचा एकूण खर्च २५० कोटी ७७ लाख इतका वाढला, असेही कॅगने आपल्या अहवालात म्हटले आहे. यासंदर्भात नितीन गडकरींकडे असणाऱ्या वाहतूक मंत्रालयाने दिलेल्या उत्तरावरही कॅगने आक्षेप घेतला आहे. मंत्रालयाच्या सांगण्यानुसार, या मार्गाला येऊन मिळणारे इतर अनेक मार्ग येऊन मिळतात.

## अमृतमहोत्सवी स्वातंत्र्य, भारतासमोरील आव्हाने !



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**भारतीय स्वातंत्र्य दिन चिरायू होवो! आज आपला भारत स्वातंत्र्याची ७५ वर्षे पूर्ण करून उद्यापासून आपण शतकाकडे मार्गस्थ होत आहोत! आतापर्यंत भारताने अनेक स्थित्यंतरे अनुभवली आहेत. अनेक राष्ट्रीय-अंतरराष्ट्रीय संकटांचा आपण मोठ्या सामर्थ्याने सामना केला आहे. शेजारी राष्ट्रांसोबतचे संबंध आणि देशांतर्गत समन्वय या बाबतीत आपण जगात वरचढ ठरलो आहोत. पहिल्या स्वातंत्र्यदिनी आपल्यासमोर अनंत समस्यांचे पहाड उभे होते. ई.स. १९४७ च्या स्वतंत्र भारतासमोर सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि फाळणीनंतर दुभंगलेल्या मनांना एकसंध ठेवण्याचे मोठे आव्हान होते.**

भारत हे केवळ नाव होते, तो अनेक तुकड्यातुकड्यात दुभंगलेला होता. छोटे छोटे संस्थानिक आपली संस्थाने सांभाळून होते. त्यांना देश नावाची संकल्पना समजावून स्वतंत्र, एकसंध भारतात सामील करून घेणे, शासन, प्रशासन इत्यादी स्तरावर सुव्यवस्थित घडी बसवण्याचे महत्कार्य तत्कालीन कुशल प्रशासकांनी पार पाडले. स्वातंत्र्य आणि समानता या आघाडीवर देशातील लोकांची जागृती करणे आवश्यक होते. शिवाय गरिबी, शिक्षण, आरोग्य, भाषिक मतभेद याबाबतीत प्रबोधन आवश्यक होते. ते सर्वच प्रश्न त्या त्या परिस्थितीत योग्य पद्धतीने मार्गी लागले.

इंग्रजांनी स्वातंत्र्य बहाल करतांना 'तुम्ही एवढा देश कसा चालवणार ? तुम्हाला एखादी राज्यघटना निर्माण करावी लागेल' असे सवाल उपस्थित केले होते. त्या अनुषंगाने भारताने राज्यघटना लिहिण्यासाठी कौशल्यपूर्ण, ज्ञानी, दृष्ट्या, प्रज्ञावंत व्यक्तींची समिती निर्माण केली. परदेशातून उच्चशिक्षित डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ही जबाबदारी मोठ्या धैर्याने आणि दूरदृष्टीपणाने पार पाडली. बाबासाहेबांना जग आणि भारत चांगल्यापैकी कळले होते. जगातील कोणत्या गोष्टींची गरज भारताला आहे ? जगातील स्वातंत्र्य, शासन पद्धती आणि सर्व देशाच्या राज्यघटना डॉ.आंबेडकरांनी सखोल अभ्यासल्या आणि त्यातील भारताला सर्वकाळ लागू होणाऱ्या सर्वसमावेशक बाबी भारतीय राज्यघटनेत अंतर्भूत केल्या. राज्यघटना तयार होऊन ती अमलात यायला १९५० उजाडले, कारण ते काम म्हणावे तेव्हढे सोपे नव्हते. राज्यघटना अमलात आली आणि खऱ्या अर्थाने स्वतंत्र भारताचा राज्यकारभार एका नियमावलीत सुरु झाला. स्वतंत्र भारताचा १९४७ ते २०२३ हा ७५ वर्षांचा कालखंड विविध घडामोडी आणि अनेक घटनांनी भरलेला आहे. भारत पाकिस्तान युद्ध, चीन युद्ध, १९७२ चा दुष्काळ, १९९३ साली अस्थिर झालेला देश आणि उसळलेल्या जातीय दंगली, त्यातून सावरता सावरताना लोकांमध्ये सलोखा, एकात्मता रुजवताना विचारवंत, राजकारणी, लेखक, प्रबोधनकारांना मोठी कसरत करावी लागली. त्यात नुकताच भारत कोरोना सारख्या भयंकर महामारीच्या संकटातून सावरला आहे.

मागील ७५ वर्षात स्वतंत्र भारताने दळणवळण, माहिती-तंत्रज्ञान, शिक्षण, आरोग्य, सुरक्षा, गुन्हेगारी नियंत्रण, शासन, प्रशासन, उद्योगधंदे, करप्रणाली, संगणक, व्यवस्थापन, शिक्षण, आरोग्य, कार्यालयीन सेवा सुविधा इत्यादी पातळ्यांवर बऱ्यापैकी प्रगती करतांना अनेक मैलाचे टप्पे पार केले आहेत. असे असले तरी देशासमोरील समस्या आणि आव्हाने संपली नाहीत. आधुनिक जगाच्या बदलत्या परिपेक्षात देशासमोर अनेक आव्हाने आ वासून उभी आहेत. विकसनशील कडून विकसित राष्ट्रात परावर्तीत होतांना अनेक मुलभूत प्रश्न निकाली काढावे लागणार आहेत. एकीकडे माहिती तंत्रज्ञानात जगाने भरारी घेतली असतांना आपला देश सुद्धा त्यात मागे राहिला नाही. असे असले तरी इतर अनेक पातळ्यांवर देशासमोर अनेक प्रश्न अनुत्तरीत आहेत. कृषिप्रधान भारतासमोर कृषीक्षेत्रातील समस्या आ वासून उभ्या आहेत. एकीकडे शेती, जलव्यवस्थापन आणि शेतमालाच्या उत्पन्नाचे प्रमाण वाढवणे गरजेचे असतांना दुसरीकडे शेतमालाला योग्य भाव, अकाली पडणारा आणि अचानक गायब होणारा पाऊस आणि त्यातून कोलमडणारे कृषी-कास्तकाराचे जीवन! ही फार मोठी मूलगामी समस्या अजून आपण सोडवू शकलो नाही. पाण्याचे व्यवस्थापन करण्यात आपण यशस्वी झालो नाहीत. एकीकडे लाखो लिटर पाणी वाहून जाते तर दुसरीकडे गुरे-ढोरे-पिके पाण्याविना त्रस्त



आहेत! नद्याजोड प्रकल्प घोषणेच्या पलीकडे जायलाच तयार नाही. दुसरीकडे शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव मिळत नाही. परिणामी खेडी म्हणावी तेवढी विकसित झाली नाहीत. खेडोपाडी मोबाईलचे टॉवर पोहोचले. माणसांचा संवाद सोपा झाला असला तरी ग्रामीण कृषी भारताचे प्रश्न संपले नाहीत. एकीकडे राज्यकर्ते आत्मनिर्भर, स्वावलंबी भारताची जाहिरात करतांना दुसरीकडे मात्र शेतकरी गळफास जवळ करत आहे! मूलगामी विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. आज सर्वच क्षेत्रात महागाईने कळस गाठला असतांना शेतमालाला म्हणजेच शेतकऱ्याच्या कच्च्या मालाला पाहिजे तेव्हढा भाव मिळत नाही. रक्ताचे पाणी करून काढलेले टमाटे-कांदे मातीमोल भावात जातात, बऱ्याच वेळा बाजारात लाल चिखल होतो आणि शेतकऱ्याच्या जगण्याचाही चिखल होतो! एक किलो कापूस केवळ ६० ते ८० रुपयात विकला जातो आणि तिकडे कारखानदार एक किलो कापसात चार कॉटनचे शर्ट तयार करून प्रत्येकी किमान ५०० रुपये म्हटले तरी त्याचे २००० हजार रुपये करतो! एक किलो सोयाबीन ३०-४० रुपयात विकले जाते आणि कारखानदार २०० ग्राम सोयावडी कापडबंद करून ८० रुपयाला विकून एक किलो सोयाबीनचे ४०० रुपये करतो. कच्चा माल आणि त्यावरील पक्क्या मालाच्या किमतीत एवढी तफावत जर राहिली तर शेतकरी कसा वर येणार ? त्याची परिस्थिती कशी सुधारणार ? त्याच्या घरावरील पत्रे आणि अंगावरील फाटके कपडे केंव्हा जाणार ? याचा भारतीय संसदेत नक्की विचार व्हायला हवा. यावर नक्की चिंतन-मंथन व्हायला हवे. देश लोकशाही शतकाकडे वाटचाल करतांना शिक्षण, आरोग्य, नौकरी इत्यादी क्षेत्रातील समस्या आणखीनच जटील होत चालल्या आहेत. तरुणांच्या हातात मोबाईल दिला, परंतु त्याचा ३०० चा रिचार्ज ७०० वर गेला! नेमके याचे कारण काय( ? ) हे मात्र कळले नाही. युवकांना १.५० जीबी डेटाची नशा लावली, परंतु इंटरनेटवर नियंत्रणात शासन सपशेल अपयशी ठरले आहे. अनेक पोर्न साइट्स, ऑनलाईन गेम यांनी तरुणाईमध्ये हैदोष माजवला आहे. सातवी ते पीजी पर्यंतचा विद्यार्थी घरून शाळा-कॉलेजला जातोय मात्र वाटेतच त्याला इंटरनेटचे स्पीड ब्रेकर लागून तो वर्गापर्यंत पोहचत नाही. या जीवघेण्या गेम आणि पोर्न साइट्समुळे अनेक तरुणांनी जीवन संपवले आहे. घरेच्या घरे उध्वस्त झाली आहेत. इंटरनेट-मोबाईल ऐवजी तरुणांच्या हाताला काहीतरी काम हवे आहे.

असे एक ना अनेक प्रश्न अजूनही देशासमोर उभे आहेत. त्यासाठी केवळ शासनावरच अवलंबून न राहता राजकारण, शासन, समाज, शिक्षण, विविध एन.जी.वो., संस्था, शाळा, महाविद्यालये इत्यादी स्तरावर या संदर्भात मोठ्या प्रमाणात जनजागृतीची नितांत आवश्यकता आहे. याच्या जोडीला केंद्र आणि राज्य दोन्ही शासन स्तरावर मोबाईल-इंटरनेट-ऑनलाईन गेम इत्यादीवर कडक निर्बंध आणायलाच हवेत. शाळा-महाविद्यालय-सरकारी कार्यालयात सर्वांसाठी मोबाईलवर कडक बंदी आणावीच लागेल. असे झाले तरच येणारी पिढी योग्य मार्गाने चालायला लागेल. विद्यार्थी ज्ञानार्थी-परीक्षार्थी होऊन मैदानावर खेळ खेळून सक्षम होतील! ही काळाची गरज बनली आहे! असे झाले तरच भारत लोकशाहीचे शतक मोठ्या जल्लोषात साजरे करेल, अन्यथा लवकरच सर्वत्र वेड्यांचे दवाखाने उभे करावे लागतील! जय जवान! जय किसान! जय विज्ञान!

## कर्म हेच आयुष्यातील न बदलणारं दंड विधान असतं




गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**आपण जे पेरतो तेच उगवत असत. कितीही प्रयत्न केले तरी सुद्धा जे पेरल त्याव्यतिरिक्त दुसरं उगवत नाही तसंच जीवनाचं देखिल असतं. आपण जसं कर्म केल तसंच फळ आपल्याला अनुभवायला येते. उचित कर्म सार्थक जीवन अनुचित कर्म पश्चात्ताप युक्त जीवन कारण जसं कर्म तसं जीवन असल्याने आपल्या कर्माला निसर्ग साक्षीदार असला पाहिजे. बळ शक्ति ताकद आहे म्हणून अनितीने केलेल्या कर्माचे फळ योग्य वेळी टाळता येत नाही. म्हणून असं कर्म करा कि कर्म फळ स्वीकारताना पश्चात्ताप होणार नाही. दैनंदिन जीवनात आपण क्षणोक्षणी जे कार्य अथवा क्रिया करतो ते कार्य, क्रिया म्हणजे कर्म आणि दैनंदिन जीवनातील कर्म करताना जो भाव आपल्या मनात असतो.**

त्यानुसार त्या कर्माच फळ आपल्याला चांगल्या अथवा वाईट स्वरूपात निश्चित प्राप्त होत असत. आपली इच्छा असो वा नसो कर्म फळ सोडत नाही. ते गृहण करावच लागतं.कारण कर्म फळांपासून कोणीही अपवाद नाही. शरीर हे नश्वर असुन आत्मा अमर आहे. पण आपण जोपर्यंत शरिर रुपाने अस्तित्वात आहेत तोपर्यंत आपल्यासाठी कर्म हेच महत्वपूर्ण आहे म्हणून कर्म समजलं पाहिजे .कारण कर्माचे फळ भोगुनच या जगाचा निरोप मिळतो म्हणून आपलं प्रत्येक कर्म पारदर्शक स्वच्छ सत्यनिष्ठ धर्मनिष्ठ सात्विक आणि न्याय निती सुसंगत असलं पाहिजे. निसर्गाने खुप काही आपल्या अखत्यारीत दिलं असलं तरी सुद्धा कर्माच दंड विधान आपल्या अखत्यारीत दिलेलं नाही पण चांगलं कर्म करून आपण स्वतःचा बचाव मात्र नक्कीच करू शकतो. हे मात्र आपल्याला हातात नक्कीच आहे.कर्माला नितीचा आधार असेल तर हित होण निश्चित आहे पण कर्माला नितिचा आधार नसेल अथवा अनितीच कर्म असेल तर एक दिवस त्याचा दंड निश्चित आहे. चांगल वाईट कर्म कोणालाही चुकल नाही चुकणार नाही. म्हणून कर्माच दंड विधान समजलं तर जीवन समजलं. सुखी समाधानी आनंदी जीवनाचे शिल्पकार आपण स्वतः असतो आपलं कर्म आपल्या जीवनातील सुख दुःख निश्चित करत असत. आपण आपलं दैनंदिन जीवनात निहित कर्म करताना कर्म सिद्धांत पालन करत निति न्याय सुसंगत आचरण केले तर निश्चितच जीवन हित घडेल.जीवनात येणारे चांगले वाईट दिवस हे आपल्याच संचित कर्माची फळं असतात.आपण हे मान्य करत नाहीत हा विषय वेगळा आहे शेवटी ज्याच्या त्याच्या व्यक्तिगत ज्ञानाचा तो विषय आहे पण कर्म हेच अंतिम दंड विधान आहे. चांगलं कर्म चांगलं फळ वाईट कर्म वाईट फळ पण हा नियम पुर्व लक्षी प्रभावाने नाही तर थोडा दिरंगाईने लागु होतो. म्हणजे कर्म अनितीच असेल तर दंड मिळतो पण आपण केलेल्या कर्माचा विसर पडल्यावर म्हणून आपण कर्म करताना गंभीर नसतो. योग्य वेळी कर्म



कोणालाही सोडत नाही हेच कर्माच दंड विधान आहे. आपणच सगळं काही आहोत या आविर्भावात आपण वागत असतो. पण निसर्ग आणि नियती फिरली तर भल्या भल्याची क्षणात माती होते .कोणाची ताकद बळ किती आहे किंवा नाही हे महत्वाचं नसुन कर्म चांगलं कोणाच आहे हेच शेवटी महत्वपूर्ण ठरत. जसं कर्म तसं फळ आपण जसं कर्म केल आहे तसं फळ भविष्यात मिळण निश्चित आहे. पण त्या साठी कर्म समजलं पाहिजे.अहंकार स्वार आहे म्हणून सत्य समजणार नाही पण योग्य वेळी पश्चात करून अर्थ नाही म्हणून विचार पुर्वक कर्म केल पाहिजे. आपलं कर्म चुकलं तर त्याचा फटका निश्चित आहे.कारण कर्माचे दंड विधान कोणालाही बदलता येत नाही ते बदलत नाही. जीवनात मानलं तर सर्व काही असतं आणि नाही मानलं तर मग मात्र काहिच नसतं. शेवटी आपण आस्तिक आहेत नास्तिक या नुसारच आपण आपली विचारसरणी विकसित होत असते .या त्यानुसारच आपण निकष निष्कर्ष लावतो काढतो. पण शेवटी आस्तिक असो कि नास्तिक जसं कर्म केल आहे तसं फळ निश्चित आहे कर्माच फळ कोणालाही बदलता येत नाही.मग संबंधित व्यक्ती हा कितीही बलाढ्य शक्तिशाली शक्तिमान असला तरी सुद्धा कर्माच दंड विधान हे सगळ्यांना सम प्रमाणात लागु आहे त्या मध्ये कोणत्याही प्रकारचा भेद नाही. लहान मोठा छोटा असं काही नाही ज्याचं कर्म उत्कृष्ट त्याला फळ उत्कृष्ट ज्याचं कर्म निकृष्ट त्याला फळ निकृष्ट हे निश्चित आहे या मध्ये बदल होत नाही म्हणून कर्म करताना सदैव सावध जागृत असल पाहिजे जेणेकरून करून आपल्या कडुन कर्म करताना चुक होणार नाही.याची जाणिव ठेवून कर्म केल तर जीवन सार्थकी लागत . आणि वास्तविक पाहिलं तर याच वेगळं असं समाधान असतं पण जीवनात योग्य वेळी योग्य बाबी लक्षात येत नाहीत हेच दुर्दैव आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739




# शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील अढळ ध्रुव तारा : राम राऊत

आधुनिक केसरी

१५ ऑगस्ट हा स्वातंत्र्य दिन आणि तुमचा वाढदिवस हा एक दैवी योगायोगच म्हणावा लागेल. काही माणसं जन्माला येतानाच एक वेगळ्याच प्रकारचं वलय घेऊन येत असतात, असामान्य असं. माणसाची परिस्थिती, आजुबाजूच वातावरण माणसाला घडवत असत हे आपण ऐकत आलोय आणि तुमच्या रूपानं ते खरही आहे हे अनुभवत आलोय. मनात काहीतरी करण्याची जिद्द असल्याशिवाय आणि ते पूर्ण करण्याची चिकाटी असल्याशिवाय माणूस एवढ्या कठीण परिस्थितीत आपल्या धेयापर्यंत पोहचू शकत नाही. संघर्ष पाचवीला पुजलेला असताना त्यामध्ये तग धरून राहून टिकून राहणे महाकठीण काम पण तूम्ही ते सातत्याने करत आहात.

खरतर लहान पणापासूनच प्रचंड कष्ट करण्याची तयारी. आय.पी.एस. व्हायचं हे ध्येय उराशी घेऊन तशी वाटचाल ही ठरेलेली पण नियतीच्या मनात काहीतरी वेगळच होत.आपण नेहमी म्हणत असतो जे होत ते चांगल्या साठी होत. त्याच पद्धतीनं आय.पि.एस. होण्याची संधी हुकल्यावर निराश न होता उलट पुन्हा नव्यानं नवीन काही तरी करण्याची उमेद घेऊन वाटचाल करणं आजच्या तरुणाई साठी खरचं खुप प्रेरणादायी आहे.

एक संधी हुकली की दुसरी संधी आपली वाटच पाहत असते. फक्त आपल्याला ती संधी ओळखून तीच सोन बनवता आल पाहिजे. ते तुम्ही खूप खुबीने दाखऊन दिले आहे.

आपण विद्यार्थ्यांना नेहमी शिकवण देत असतात की, जीवनात सदैव आनंदी राहायचं असतं कारण इथ दु:खाच गाठोड प्रत्येकाच्या नशिबात असतं.परंतु आपण परिस्थितीला समोर न करता परिस्थितीला सामोरं जायचं असतं. प्रत्येकाने आयुष्यात खूप व्यस्त असावं जे पैशाने नाही मिळणार ते कमावून बघावं. जे व्यक्ती निस्वार्थपणे कार्य करतात तेच व्यक्ती आयुष्यात खरे यशस्वी होतात.



याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे प्रा. राम राऊत सर.कारण वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी आपण सद्गुरू मैथ्स अँड सायन्स अकॅडमीचे संचालक झाले आणि एका सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष. तुमच्या आयुष्यात आज पुन्हा संघर्षमय वर्ष संपून पुढचं संघर्षमय वर्ष सुरू झालं.. आणि तुमच्या बद्दलचा अभिमान वाढला.. आम्हाला कळतंय तेव्हा पासून तुमचा संघर्ष, लढण्याची जिद्द, सामान्य माणसाच्या प्रति असलेली सचोटी हे सगळं आम्ही बघतोय, अनुभवतोय, आमच्या सारख्या अनेक सहकारी मित्रांना मार्गदर्शन करताय त्यांना शैक्षणिक, सामजिक दृष्ट्या सक्षम करताय.. हा तुमचा प्रामाणिकपणा तुम्हाला यशाची उंच शिखरे नक्की दाखवेल.. एक गोष्ट लक्षात ठेवा तूम्ही योद्धा आहात, नशिब दुश्मन बनुन तुमच्या समोर उभा राहील तुम्ही मात्र हार मानू नका, तूम्ही श्रीकृष्ण आहात, गुरुत्वाकर्षण सोडले तर तुम्हाला खाली खेचण्याची ताकद कुणात नाही. माझ्या प्रत्येक यशाचा साक्षीदार असणारे, सामान्य माणसासाठी लढणारे, विद्यार्थ्यांसाठी बोलणारे, अनेकांना निस्वार्थी-सढळ हस्ते मदत करणारे बंधु... जन्मदिवसाच्या खूप साऱ्या शुभेच्छा !!

**(प्रा.राम राऊत हे एस.एम.एस. अकॅडमीचे संचालक आणि विक्रमराजे प्रतिष्ठान बहुउद्देशिय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष आहेत)**

**शब्दांकन:- ज्योती राऊत-वाघमारे**

# बाबासाहेबांचे विचार कृतीमधून वामनदादा कर्डक व कांशीराम यांनी अंगिकारले : प्रा. प्रदीप रोडे

आधुनिक केसरी न्यूज

**राजरत्न भोजने**

**औरंगाबाद :** बाबासाहेबांचे विचार कृतीमधून वामनदादा कर्डक



आणि कांशीराम यांनी अंगीकारले. या समाजाला एकत्रीत आणून उद्धार करायचा आहे, बाबासाहेबाचे ग्रंथ बऱ्याच जणांनी वाचून इतरांना माहिती देण्याच काम केले. मात्र वामनदादा कर्डक आणि कांशीराम यांनी कृतीतून बाबासाहेबांचे विचार अनेकांपर्यत पोहचवण्याचे कार्य केले आहे. कांशीराम यांनी विचार आणि मंथन केले. हा समाज आर्थिक दृष्ट्या कमकुवत आहे.मग कर्मचाऱ्यांना एकत्रित करून समाजाला पुढे आणण्याचे काम कांशीराम यांनी केले. तुमच्यासाठी संसदेमध्ये भांडणारा एकही नेता नाही, म्हणून तुमचे प्रश्न सोडवल्या जात नाहीत.या व्यवस्थेला रोखण्यासाठी फुले शाहू आंबेडकर विचारांचे शासन आणणे गरजेचे आहे. रोडे पुढे म्हणाले, समाजातील काही लोकांनी ठरविले, तर आपल्या विद्यार्थ्यांना योग्य तो न्याय देऊ शकतो.विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण देणे, त्यांना विदेशात शिक्षणासाठी पाठवणे, अशा प्रकारचे उपक्रम राबवले जाऊ शकतात. विद्यार्थ्यांनी स्वाभिमानी बनून चळवळ चालवली पाहिजे असेही ते म्हणाले. भाकरीपेक्षा स्वाभिमान महत्वाचा आहे.समाज स्वाभिमानी माणसांची कदर करतो. कांशीराम यांनी साडेचार हजार किलोमीटरचा पायी प्रवास केला. हाच तर मोठा आदर्श आपल्यापुढे आहे.म्हणून आपल्याला कोणाकडे जाण्याची गरज नाही.असे प्रतिपादन प्रा.प्रदीप रोडे यांनी साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे आणि महाकवी वामनदादा कर्डक यांच्या जयंती निमित्त प्रबोधन पर कार्यक्रमात बोलत होते.

बहुजन विद्यार्थी आघाडी, आयोजित "कही हम भूल न जाये" या कार्यक्रमांतर्गत रविवार, ( ता.१३ ) रोजी साहित्यसम्राट आण्णाभाऊ साठे व महाकवी वामनदादा कर्डक यांच्या संयुक्त जयंती निमित्त प्रबोधन पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उदघाटक डॉ.निशिकांत आल्टे ( प्राचार्य राजर्षी शाहू कॉलेज बजाजनगर ), अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे ( सामाजिक कायकर्ते बीड ), प्रमुख उपस्थिती प्रा.टी.एस कदम ( पि.ई.एस. पॉली कॉलेज औरंगाबाद ), प्रमुख मार्गदर्शक मा.रविंद्र जोगदंड ( जीएसटी उपायुक्त औरंगाबाद ), यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम पि.ई.एस.पॉलीटेक्निक महाविद्यालयात पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष प्रणित भोजने यांनी केले तर, सूत्रसंचालन प्रा. प्रल्हाद तारूनी केले.आभार विनोद खरात यांनी मानले. संघटन समीक्षा बांधणी करून राज्य सचिव पदी प्रा संतोष प्रधान, मराठवाडा झोन प्रभारी ॲड राहुल ढेंबरे औरंगाबाद, जालना परभणी जिल्हा प्रभारी पदी प्रा प्रल्हाद तारू, औरंगाबाद व हिंगोली जिल्हा प्रभारी प्रा रवी मोरे तर औरंगाबाद येथे दहा कॉलेजमध्ये विद्यार्थी संघटन बांधणी करून नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर लिखित विद्यार्थ्यांनो जागृत व्हा हे पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा.योगीराज आनंद, प्रा.संतोष प्रधान, प्रा.प्रल्हाद तारू, अँड राहुल ढेंबरे, विनोद खरात, प्रकाश प्रधान, गजाजनन प्रधान, संदीप अबगड, आशिष सरकटे, किरण कांबळे, संतोष लहाने, दिपक प्रधान, शामदे सह आदींनी परिश्रम घेतले.

# वैद्यकीय अभ्यासक्रमातील पुत्रकामेष्टी यज्ञाचा उल्लेख वगळा

## अंनिसची आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात भारतीय वैद्यकशास्त्र ( आयुर्वेद ) शाखेच्या पदवी बी. ए. एम .एस. व पदव्युत्तर पदवी ( एम. एस. प्रसूतीशास्त्र, स्त्रीरोग ) अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना, पुत्र कामेष्टी यज्ञ व इच्छित पुत्र प्राप्ती कशी करावी, हे शिकवले जाते. त्यामुळे गर्भधारणापूर्व व प्रसूती पूर्व गर्भधारणा निदान तंत्र या कायद्याचा भंग होत आहे, म्हणून ही बाब भारतीय संविधानाच्या पूर्णपणे विसंगत आहे, असे महाराष्ट्र अंनिसने निवेदनाद्वारे आरोग्य विद्यापीठाला कळविले आहे.

निवेदनात पुढे असेही म्हटले आहे की, हा पाठ्यभाग सदर अभ्यासक्रमातून वगळण्याबाबत विद्यापीठाने त्यांच्या वरिष्ठांना तत्काळ अवगत करावे. वास्तविक पीसीपी एनडीटी कायद्यान्वये निवृत्ती इंदुरीकर यांच्यावर दाखल असलेला गुन्हा पुढे चालवावा असे स्पष्ट आदेश मा.सर्वोच्च न्यायालय यांनी नुकतेच पारीत केलेले आहेत असे असतानाही महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातून मात्र अद्याप कालबाह्य व अवैज्ञानिक भाग वैद्यकीय अभ्यासक्रमात शिकवला जातो. त्यामुळे लोकांचे अज्ञान वाढते व ते दैववादाकडे झुकतात त्यामुळे साहजिकच भोंदूगिरीला त्यामुळे बळ मिळते व ती फोफावते. म्हणून विद्यापीठाने आयुष मंत्रालयाला सदर अभ्यासक्रमातील पाठ्यांश वगळण्याबाबत तत्काळ कळवावे. त्यांच्यामार्फत सेंट्रल कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिनला कळवले जाईल आणि सदर अवैज्ञानिक, कालबाह्य भाग अभ्यासक्रमातून वगळला जाईल, अशा प्रकारची तजवीज तत्काळ करावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनावर अंनिसचे राज्य प्रधान सचिव डॉ. ठकसेन गोराणे, राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे, डॉ.सुदेश घोडेराव, राज्य सदस्य प्रल्हाद मिस्त्री, जिल्हा प्रधान सचिव नितिन बागूल यांच्या सह्या आहेत.

महाराष्ट्र Business Katta












# स्वातंत्र्यदिनाला घरोघरी तिरंगा...



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी भारतामध्ये स्वातंत्र्य दिन साजरा केला जातो. १९४७ रोजी १५ ऑगस्ट रोजी भारताला ब्रिटिशांकडून स्वातंत्र्य मिळाले. हा दिवस प्रत्येक भारतीय नागरिकांसाठी गर्वाचा दिवस आहे. देशभरात उत्साहाने हा दिवस साजरा केला जातो. हा दिवस फक्त देशाला स्वातंत्र्य मिळाल्याचा आनंद म्हणून नव्हे तर देशाला स्वतंत्र करण्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांना, क्रांतिकारकांना अर्पण केला जातो आणि त्यांच्या स्वातंत्र्या प्रतीचे बलीदानाचे स्मरण ठेवले जाते. त्यांना वंदन करतो. जेव्हा लाल किल्ल्यावर राष्ट्रध्वज फडकवला जातो, तेव्हा घरोघरी हा सोहळाच्या बघत असतात. स्वांतत्र्य दिवस जवळ आला की, लोकांच्या मनात प्रश्न असतो की, यंदा भारताला स्वातंत्र्य मिळून किती वर्ष झाले? भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले आणि पुढील वर्षी याच दिवशी म्हणजे १५ ऑगस्ट १९४८ रोजी या दिवसाचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला.**

त्यावर्षी भारताला स्वातंत्र्य मिळून पूर्ण एक वर्ष झाले होते. म्हणजेच यंदा २०२३ मध्ये, भारत ७६वा स्वातंत्र्यदिन साजरा करत आहे आणि भारताने स्वातंत्र्याला ७६ वर्षे पूर्ण केली आहेत.

१९४७ मध्ये देशाने पहिला स्वातंत्र्यदिन साजरा केला होता. आणि म्हणूनच यंदा ७७ वा स्वातंत्र्यदिन साजरा केला जावा, असे मत मांडणारेदेखील अनेक लोक आहेत. पण, अधिकृतरीत्या यंदा ७६ वा स्वातंत्र्यदिन साजरा होत आहे. काही दिवस आधीच सर्वत्र स्वातंत्र्य दिनाची तयारीही सुरू होते.. यंदाच्या स्वातंत्र्य दिनाची थीम 'राष्ट्र प्रथम, नेहमीच प्रथम' (नेशन फर्स्ट, ऑल्वेज फर्स्ट') अशी आहे.

स्वातंत्र्यदिनी केंद्र सरकारने देशभरात हर घर तिरंगा,घर घर तिरंगा अभियानाची दुसरी आवृत्ती सुरू केली आहे. याशिवाय त्याच बरोबर 'माझी माती, माझा देश' ही मोहिम देखील यंदा राबविण्यात येत आहेत.

१५ ऑगस्ट हा प्रत्येक भारतीयासाठी सन्मानाचा आणि अभिमानाचा दिवस आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपल्या सर्व स्वातंत्र्यसैनिकांनी आणि क्रांतिकारकांनी आपला देश ब्रिटीश साम्राज्यातून आपला जीव धोक्यात घालून मुक्त केला आणि त्यांच्या बलिदानाने देशाला स्वातंत्र्यप्राप्ती झाली आहे. म्हणूनच त्यांच्या स्मरणार्थ आणि आदर म्हणून आपण हा दिवस ऐतिहासिकरित्या साजरा करतो. जवळपास २०० वर्षे भारतीयांवर अत्याचार करणाऱ्या ब्रिटीश राजवटीतून या दिवशी आपल्याला स्वातंत्र्य मिळाले, जे अतुलनीय आहे.

ब्रिटिश सरकारने अनेक वर्षे आपण भारतीयांवर अत्याचार केले आणि आपल्याला गुलामीत ठेवले. १५ ऑगस्टला आपल्याला इंग्रजांच्या गुलामगिरीतून स्वातंत्र्य मिळाले आणि आपण पूर्ण स्वतंत्र झालो. स्वातंत्र्याच्या या अथक लढ्यात आपण आपल्या देशाच्या अनेक महान व्यक्तींना गमावले. आपल्या देशात अशा अनेक महान व्यक्तींचा जन्म झाला, ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणाचीही पर्वा न करता, हसत हसत देशासाठी बलिदान दिले. आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीअनेकांनी महत्वाचे योगदान दिले आहे. ज्यांनी ब्रिटीश राजवटीविरुद्ध लढा उभा केला. आणि त्यांना भारत सोडण्यास भाग पाडले. देशाच्या स्वातंत्र्यात स्वा.सावरकर, लोकमान्य टिळक, सरदार वल्लभभाई पटेल, सुभाषचंद्र बोस, भगतसिंग,राजगुरू,सुखदेव, चंद्रशेखर आझाद, चाफेकर बंधू, म.गांधी, यांसारखे अनेकांनी प्राण पणाला लावले.पं.नेहरू, पं.मालवीय,लालबहादूर शास्त्री,असा अनेकांचा सहभाग होता.

आपण खूप भाग्यवान आहोत की आपल्याला इतिहासात असे महान स्वातंत्र्यसैनिक आणि क्रांतिकारक मिळाले आणि त्यांनी केवळ देशालाच नव्हे तर येणाऱ्या पिढ्यांना इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त केले. यामुळे आज आपण मुक्तपणै आणि दिवसेंदिवस नवीन यश आणि उंची गाठत आहोत.

आज स्वातंत्र्याच्या ७६ वर्षानंतर आपला देश प्रत्येक क्षेत्रात प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहोत. संरक्षण सामर्थ्य, शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, क्रीडा,शेती,सहकार, वैद्यकीय, आणि इतर अनेक क्षेत्रात आपला देश पुढे जात आहे. आज आपले लष्करी सामर्थ्य इतके चांगले आहे की त्याचे उदाहरण जगभर दिले जाते आणि कोणताही देश भारताकडे त्या दृष्टीने बघायला घाबरतो. आज आपले लष्करी सामर्थ्य आधुनिक शस्त्रांनी सुसज्ज आहे, ज्यामध्ये शत्रूला नष्ट करण्याची ताकद आहे.

आपला देश प्राचीन काळापासून कृषिप्रधान देश आहे हे आपण जाणतो आणि १५ ऑगस्ट १९४७ नंतर आपल्या कृषी क्षेत्रात खूप बदल झाले आहेत. स्वातंत्र्यानंतर शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून आणि पिकांच्या वाढीच्या नवीन तंत्रज्ञान वापरून आपण अधिक पीक घेतो आणि आज आपला देश अन्नधान्य निर्यात करण्यात आघाडीवर आहे. १९६५ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्धादरम्यान तत्कालीन पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी "जय जवान जय किसान" ही घोषणा दिली होती. आणि आज ही घोषणा बऱ्याच अंशी सिद्ध झाली आहे. राष्ट्राच्या प्रगतीत हे दोन्ही घटक खूप महत्त्वाचे आहेत.

आज स्वातंत्र्यानंतर आपण विज्ञानाच्या क्षेत्रातही खूप प्रगती केली आहे. या वैज्ञानिक तंत्रज्ञानामुळे आज भारताने चंद्र आणि मंगळापर्यंतचा प्रवास केला आहे. रोज नवनवीन वैज्ञानिक तंत्रज्ञान शोधून आपण देशाला एका नव्या प्रगतीकडे नेत आहोत. आपण प्रत्येक क्षेत्रात विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा अवलंब करत आहोत. सैन्य, शेती, शिक्षण या क्षेत्रात विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा अवलंब करून आपण प्रगतीशील देशांच्या बरोबरीने स्वतःला उभे करू शकलो आहोत. स्वातंत्र्यानंतर आपण प्रत्येक क्षेत्रात प्रगती केली आहे.

आपल्या महान स्वातंत्र्यसैनिकांनी स्वातंत्र्यासाठीचे बलिदान कधीही विसरता कामा नये. आजही त्यांच्या स्मरणाने आपले डोळे पाणावतात. आजच्या नव्या भारताच्या झगमगाटात ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पण केले त्या महान आत्म्यांना आपण कधीही विसरता कामा नये.

गेल्या वर्षी घरोघर तिरंगा हर घर तिरंगा अभियान



राबवण्यात आले त्याचप्रमाणे यावर्षी "माझी माती माझा देश" हे अभियान राबवण्यात येत आहे. जिल्हा आपण मातृभूमी असे म्हणतो ज्या मातीत आपण राहतो अर्थातच त्या भूमीला नमन आणि त्यासाठी ज्या वीरांनी बलिदान दिले त्यांना वंदन करणे हाच त्यामुळे उद्देश आहे.पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांच्या कल्पनेतून हे अभियान साकारत आहे.

नऊ ऑगस्ट च्या क्रांती दिना पासून या अभियाना सुरुवात झाली असून 15 ऑगस्ट 23 पर्यंत ते साजरे केले जाणार आहेत. त्यात शिलाफलक, वसुधा चंदन, स्वातंत्र सैनिक वीरांना वंदन, पंचप्राण म्हणजे शपथ घेणे, आणि ध्वजारोहण असे कार्यक्रम आहेत. शहरातील एका योग्य ठिकाणी वसुधा चंदन म्हणून 75 देशी वृक्षांच्या रोपांची लागवड करणे ज्यांनी देशासाठी स्वातंत्र्यासाठी आणि मातृभूमीच्या सुरक्षेसाठी परिश्रम केले ते सेवानिवृत्त जवान पोलीसदल, स्वातंत्र सैनिक, यांचा सन्मान तसेच लोकप्रतिनिधी अधिकारी कर्मचारी शहरवासीय यांना पंचप्राण म्हणजे शपथ घेणे असे कार्यक्रम आयोजित केले गेले होते. निरनिराळे ठिकाणी ते साजरे केल्याचे आपण बघितले वाचले.13 ऑँगस्ट ते 15 ऑँगस्ट असा तीन दिवस तिरंगा झेंडा फडकवायचा आहे. गतवर्षी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करताना व यावर्षी 76 स्वातंत्र्याचा महोत्सव साजरा करत असताना असे अनेक विविध कार्यक्रम त्यानिमित्ताने आयोजित केले गेले आहे.

76 वर्ष स्वातंत्र्य मिळून झाल्यावर अनेक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी झाली असली तरी विकास झाला असला तरी अजून बराच पल्ला गाठायचा आहे. अजूनही शेतकरी आत्महत्या होतच आहेत. त्यांच्या बऱ्याच प्रश्नाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. भारतात युवकांची संख्या फार मोठ्या प्रमाणात आहे परंतु बेरोजगारीमुळे ते वणवण फिरत आहे. आपण बघितले असेल की तलाठ्याच्या परीक्षेला सुद्धा उच्चशिक्षित युवकही अर्ज करीत आहेत. तर दुसरीकडे शिक्षण क्षेत्रात निवृत्त शिक्षकांना परत कामावर बोलवण्यात येत आहे. असे अनेक क्षेत्र आहे त्या ठिकाणी कंत्राटी पद्धतीने कामकाज करून घेतले जाते परिणामी बेरोजगारी वाढत आहे. कितीही म्हटलं तरी आपण अद्याप पर्यंत भ्रष्टाचार कमी करू शकलो नाही असं कुठलंही क्षेत्र नाही की त्या ठिकाणी भ्रष्टाचार नाही. त्यासाठी कडक भूमिका घेणे आवश्यक आहे. परंतु भ्रष्टाचाऱ्यांना सत्तेत सामील करून घेतले जात असेल तर मग काय उपयोग ? अधिकारीही मागे नाहीत.

महागाई वाढतच आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचे जीवन कठीण झाले आहे. एकीकडे सरकारी कर्मचाऱ्यांना भत्त्यात, पेन्शनमध्ये भरपूर वाढ मिळत आहे तर दुसरीकडे सहकारी बँका, एस टी महामंडळ, वीज महामंडळ, तसेच इतर काही हजारो संस्था मध्ये कर्मचारी पेन्शनसाठी लढा देऊन थकले आहे. त्यांना नाम मात्र पेन्शन मिळत आहे. आपले आमदार- खासदार मोठा पगार त्यानंतर भरीव पेन्शन असे अनेक लाभ मिळवत आहेत.तात्विक भांडण नाही, राजकारणात एकमेकांना संपवण्याची भाषा, तत्व,पक्षनिष्ठा राहीली नाही. सत्तेच्या हव्यासापोटी तत्व,निष्ठा,बाजूला ठेवून राजकीय समीकरण सोडविली जात असल्याचे बघतो.

शहरांचा विकास करतांना खेडी मात्र भकास होत आहे. शहराकडे येण्याचा कल वाढत आहे याचे कारण खेडोपाडी असलेल्या असुविधा हे पण आहे.

स्त्रियांवरील अत्याचार कमी होत नाहीये. मुलींना पळवून नेण्याचे, गायब होण्याचे प्रमाण वाढते आहे.हे का घडत आहे. ? कुठलेही अभियानाची सुरुवात झाली की, शाळा, कॉलेज, सरकारी कार्यालये, मंत्रालय आदी ठिकाणी शपथ घेण्याचा कार्यक्रम होतो. परंतु शपथ घेऊनही या अभियानांची काय परिस्थिती आहे. शपथ घेऊन जैसे थे. म्हणजेच शपथ घेऊन व्यवहारात खोटेपणा सुरू आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ज्यांच्या ज्यांच्या हातात या देशाचा कार्यभाग स्विकारला आहे ही त्यांची नैतिक जबाबदारी आहे असे म्हणायला हरकत नाही. तेव्हा किमान आपण जी शपथ घेतो त्याच्याशी प्रामाणिक रहायला हवे.सगळ्याच गोष्टी कायदे नियम करुनही साध्य होत नाही हे बघतो. आपणही नैतीकता पाळायला हवी.

13ऑँगस्ट ते 15 ऑँगस्ट आपण तिरंगा घरोघर फडकविणार आहोत आणि आपल्या मातृभूमीला नमन आणि वीरांना वंदन करणार आहोत तेव्हा आता तरी सगळ्यांनीच शपथ घेऊन खोटे बोलणे बंद करावे ही अपेक्षा करावी का. ?

# मानवी स्वातंत्र्याचे संरक्षण कोण करेल ?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**कुंपणानेच शेत खाल्ल तर विश्वास ठेवायचा कोणावर? हा प्रश्न निर्माण होतो. शेतकरी स्वतः च्या शेतातील पिकांचे संरक्षण होण्यासाठी शेताच्या भोवताल कुंपनाचे आवर करत असतात. मग ते कुंपन कशाने ही बनवले असले तरी मुळ मुद्दा असतो शेतातील पिकांचे संरक्षण. परंतु जर कुंपनच शेत खात असेल, जर कुंपनच पिकांची नासाडी करत असेल तर शेतकऱ्यांने दोष कोणाला द्यायचा? हा महत्वाचा प्रश्न उपस्थित राहतो. शेतकऱ्यांच्या कुंपनासारखीच गोष्ट आज देशात घडत आहे. ज्यांनी राष्ट्र, राष्ट्रीय प्रतिके व राष्ट्रातील जनता यांचे संरक्षण करून त्यांच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी घ्यायला पाहिजे तेच लोक देशाला पोखरून कमकुवत करत आहेत. म्हणून देशामध्ये अनेक समस्यांचे थैमान माजले आहे. देशाची राज्याची जबाबदारी ज्यांच्या वर आहे तेच लोक देश व राज्याला खात असतील तर सर्वसामान्य जनतेला काय मिळणार म्हणून सर्वात जास्त समस्या ह्या सर्वसामान्य जनतेच्या समोर आहेत.**

भारतामध्ये अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण या मुलभूत गरजे विषयी समस्या तर आहेत. परंतु अजून दोन महत्वाच्या समस्या आहेत त्या म्हणजे समता आणि सामाजिक न्याय. समता आणि सामाजिक न्याय ह्या व्यापक व मानसाला विकासाच्या शिखरावर नेणाऱ्या संकल्पना भारतीय संविधानात असुनही त्यावर अंमलबजावणी केली जात म्हणून अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. ब्रिटीश पंधरा ऑगस्ट एकोनीससे सत्तेचाळीस ला भारत देश सोडून गेले म्हणजे आपण त्याला स्वातंत्र्य दिन म्हणतो. पंधरा ऑगस्ट ला देशाला परकीय सत्तेपासून स्वातंत्र्य मिळाले, ब्रिटिश देश सोडून निघून गेले. ब्रिटीशांनी देश सोडून निघून जावे आणि भारतीय लोकांच्या हाती सत्ता द्यावी या साठी भगतसिंग, सुखदेव, राजगुरू, सुभाषचंद्र बोस, अशपाकुल्ला खान यांनी जिवाचे बलिदान दिले व यांच्या बलिदानाला यश मिळाले आणि ब्रिटिशांनी देश सोडला. राजकीय दृष्टीने, सत्तेच्या दृष्टीने आपल्याला पंधरा ऑगस्ट ला स्वातंत्र्य मिळून देश स्वातंत्र्य झाला. परंतु देशातील जनता हजारो वर्षापासून वर्णाव्यवस्थेने धार्मिक ग्रंथाच्या आधारे गुलाम बनवून ठेवले होते. आणि ह्या गुलामीतून भारतीय लोकांना स्वातंत्र्य मिळवून देणे आव्हानाचे काम होते. याच गुलामगिरी मुळे जातियता, विषमता, अस्पृश्यता, अंधश्रद्धा, पाखंड यांचा जन्म झाला. समता, बंधुता, न्याय, स्वातंत्र्य, शिक्षण अशा सर्वच बाबी धार्मिक ग्रंथानी व उच्च वर्णीय लोकांनी नाकारुन केवळ लोकांना अज्ञानी ठेऊन त्यांच्या टाळूवरचे लोणी खाऊन स्वतः ला विद्वान समजणाऱ्या वर्गाची गुलामगिरीतुन स्वातंत्र्य मिळवून देणे अवघड असताना. २६ जानेवारी १९५० पासून देशातील धर्मग्रंथ व वर्णाने लादलेली गुलामीतुन स्वातंत्र्य मिळाले. म्हणजेच लोकांच्या स्वांतत्र्याचा दिवस २६ जानेवारी व देशाच्या स्वातंत्र्याचा दिवस हा १५ पंधरा ऑगस्ट आहे. म्हणून आम्ही दोन्ही दिवस अगदी धुमधडाक्यात साजरे करतो. मानवी स्वातंत्र्यानूसार देशातील प्रत्येक नागरिकांना विचार व्यक्त करण्याचे, म्हणजे मत मांडणे, सभा घेणे याचे स्वातंत्र्य, देशात भ्रमण करणे, सार्वजनिक संपत्तीचा वापर करणे जसे बस, रेल्वे, शिक्षण संस्था, इतर सार्वजनिक ठिकाणी जात धर्म वर्ण पंथा नुसार भेद न करणे अशा प्रकारचे मुलभूत हक्क भारतीय संविधानाने दिले व जनतेला स्वातंत्र्य मिळवून दिले. जनतेच्या मुलभूत हक्क अधिकाराचे संरक्षण करण्यासाठी आपल्याकडे लोकशाही पद्धती स्विकारून कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायपालिका अशा व्यवस्थेची निर्मीती करून माणसाच्या स्वातत्र्यांची हमी भारतीय संविधानाने जनतेला दिली आहे. स्वातंत्र्य अर्थात स्वैराचार मुळीच नाही. जसे मत व्यक्त करण्याचे, सभा घेण्याचे स्वातंत्र्य आहे तर मनात येईल ते मुळीच बोलता येत नाही. मत व्यक्त करताना बोलण्यातुनच कोणत्याही प्रकारची तेढ, वाद निर्माण होईल, राष्ट्र व राष्ट्रीय प्रतीकांचा अवमान होईल, बोलण्यातुन दंगल होईल असे बोलता येणार नाही. परंतु चुकिच्या गोष्टींना, सरकारच्या ध्येयधोरनांना व तत्सम बाबीं बद्दल मत मांडण्याचा अधिकार संविधानाने कोणत्याही प्रकारचा भेद न करता प्रत्येक भारतीय नागरिकांना दिला आहे. मनोहर कुलकर्णी नावाचा वयोवृद्ध व्यक्ती महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी कार्यक्रम घेऊन खोटा इतिहास सांगुन तरुणांची माथी धर्मांधता पेरत आहे. अनेक गुन्हे दाखल असणाऱ्या व्यक्तीला पुर्ण महाराष्ट्र सभा घेऊ दिल्या जातात. भिमाकोरेगाव प्रकरणा पासून अनेक वादग्रस्त विधाने करून डोक्यात मेंदु व देशाप्रती आपुलकी नसल्याचे अनेक उदाहरण मनोहर कुलकर्णी यांनी स्वतः सिद्ध करून दिले. कुलकर्णी च्या शेतातील आंबे खाल्याने मुलगा होतो असे विधान करून महिलांचा अवमान तर केलाच परंतु विज्ञानाला पायाखाली तुडवले. राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज न मानणारा मनोहर कुलकर्णी राष्ट्रद्रोही नाही का ? राष्ट्रद्रोही लोकांना अटक करून तुरुंगात डांबुन ठेवून त्याचे नागरिकत्व नष्ट करण्याचे काम कोणाचे आहे. जो राष्ट्रध्वज फडकवूच नका म्हणतो आणि ठिकठिकाणी सभा घेतो अशा देशद्रोही व्यक्तीला सभा कशा घेऊ दिल्या जातात ? जो व्यक्ती गांधी, नेहरु व महात्मा फुले यांच्या बद्दल तुच्छ विधान करतो आणि वैचारिक व पुरोगामी लोकांना चिड निर्माण करून देतो अशा कुलकर्णी ला सरकार अटक का करत नाही ? एखाद्या व्यक्तीमुळे सामाजिक व धार्मिक तेढ निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असेल तर सरकार त्याला अटक करू शकते मग कुलकर्णी ला हा नियम का नाही ? बर सरकारला स्वतः हुन माहिती नाही झाले मनोहर कुलकर्णी नेमका काय करतो परंतु अनेक सामाजिक संघटना, राजकीय पक्ष व सर्वसामान्य जनता यांनी मनोहर कुलकर्णी हा देशद्रोहाचे विधाने करत आहे म्हणून पुराव्यांनीशी तक्रार दाखल करतात, अजामीनपात्र गुन्हा दाखल होऊन तात्काळ अटक व्हायला पाहिजे परंतु त्याला अटक न करता पोलीस संरक्षण दिले जाते. नेमका हा मनोहर कुलकर्णी आहे तरी कोण ? मनोहर कुलकर्णी देशद्रोहाचे वक्तव्य करून, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत व स्वातंत्र्य न मानता महापुरुषांचा अवमान करून नेमकं समाजात काय पेरत आहे हे सरकार ला माहिती आहे का ? देशद्रोह करणारा व्यक्ती बाहेर पोलीस संरक्षणात फिरतो यातुन जनतेचे काय ? मनोहर कुलकर्णी व सामाजिक संघटना, सामाजिक कार्यकर्ते व सर्वसामान्य जनता यांच्यात वैयक्तिक कोणताही वाद नाही, केवळ कुलकर्णी समाजात द्वेष पेरत असुन चुकिचा इतिहास सांगुन राष्ट्रद्रोह करत आहे. आणि हे थांबायला पाहिजे म्हणजे अनेक लोक समोर येऊन सरकार ला विनंती करत आहेत. तरीही सरकार कुलकर्णीला कार्यक्रमाची परवानगी देत आहे. कुलकर्णी चा कार्यक्रम होऊ नाही म्हणून संविधानीक मार्गाने विरोध करणाऱ्या तरूणांवर सरकार गुन्हे दाखल करून सर्वसामान्य लोकांना अटक करत आहे. आणि ज्याचा मुळे हे घडत आहे त्याला पोलीस संरक्षण दिले जात आहे. चुकिच्या बाबींविरूद्ध मत मांडण्याचा, चुकीच्या घटनेचा निषेध करण्याचा अधिकार येथे असताना कुलकर्णी चे मनोरुग्ण चले कुलकर्णी विरोधात कोणी काही बोलले तर आम्ही पाहून घेऊन, अशा प्रकारच्या धमक्या दिल्या जात आहेत, कुलकर्णी बद्दल एकही शब्द खपवून घेणार नाही म्हणजे समाजात तेढ निर्माण होण्यासाठी कुलकर्णी प्रयत्न करत आहेच परंतु सर्व सामान्य तरुण जे केवळ धर्माच्या नावाखाली कुलकर्णी सोबत आहेत ते कुलकर्णी बद्दल एकही शब्द ऐकायला तयार नाही परंतु कुलकर्णी ने काहीही सांगितले तरी ते सत्य मानून कुलकर्णी साठी ते लोकांना धमक्या देत आहेत. याचा अर्थ कुलकर्णी याच्या बद्दल कोणी बोलायच नाही का ? लिहायचे नाही का ? उघडपणे धमक्या देणारे खुलेआम आहेत आणि भीडे राष्ट्रद्रोह करून महापुरुषांच्या बद्दल चुकीचे बोलतो असे म्हणणे आज गुन्हा ठरत आहे. मनोहर कुलकर्णी सह त्याचे जे धमकी देणारे चलेचपाटे आहेत त्यांना पोलीस पकडत नाहीत. परंतू देशात व राज्यात कायदा व सुव्यवस्था कायम रहावी यासाठी जे लोक प्रयत्न करत आहेत त्यांच्या वर मात्र कारवाई करून गुन्हे दाखल केले जात आहेत. याचाच अर्थ मत व्यक्त करण्याचा मुलभूत हक्क येथे सरकार कडूनच दाबल्या जात आहे. ज्यांनी मुलभूत हक्काचे संरक्षण करायला पाहिजे तेच जर मुलभूत हक्कांवर बेकायदेशीर पणे बंधने आणत असतील आणि ज्यांना तुरुंगात पाहिजे त्यांना पोलिस संरक्षण देऊन कार्यक्रम घेतले जात असतील तर अशा कृत्यामुळे भविष्यात शातंता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन अनेक तरुणांचे आयुष्य अंधकारमय होण्याची चिन्हे दिसत आहेत. देशद्रोही कृत्ये करणाऱ्याच्या विरोधात तक्रार दाखल असुनही त्याला पोलिस संरक्षण आणि संविधाधानीक मार्गाने कायदा व सुव्यवस्था टीकुन राहण्यासाठी प्रयत्न करणाऱ्यांना तुरुंगात जावे लागत असेल तर मानवी स्वातंत्र्याचे रक्षण कोण करेल हा प्रश्न तर समोर येणारच आहे.

# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होताना

आधुनिक केसरी

**"एकच तारा समोर, आणिक पायतळी अंगार, गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार!" कवी कुसुमाग्रज यांनी केलेल्या या आवाहनाचे सार्थक होण्यास 15 ऑगस्ट 1947 चा दिवस उजाडला पक्षी पिंजऱ्यातून उडाला. स्वातंत्र्याची रम्य प्रभात झाली. असंख्या बलिदानांचे सार्थक झाले आणि भारताला पारतंत्र्यातून मुक्तता मिळून स्वातंत्र्य मिळाले. बघता-बघता स्वातंत्र्याचा प्रवास 75 झाला आज आपण भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला.एखाद्या राष्ट्राच्या जीवनात 75 वर्षांचा कालखंड हा जरी फार मोठा टप्पा नसला तरी, राष्ट्रातील नागरिकांच्या जीवनात स्वातंत्र्याची 75 वर्ष पूर्ण करणे अनन्यसाधारण महत्वाचे आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आपली स्वातंत्र्याविषयी कोणती स्वप्ने होती?**

स्वातंत्र्याकडून आपल्या कोणत्या अपेक्षा होत्या, ? आज सत्य "काय आहे ? कुठे होती आपण आणि आता कुठे आहोत ? उणिवा काय राहिल्या आणि आता भविष्यात कशी पावले उचलावी लागतील ? याचा विचार आपल्याला करायला लागेल. स्वातं त्र्याच्या अमृत महोत्सवात आपण काय कमावलं आणि काय गमावलं ? याचे सिंहावलोकन करण्याच्या टप्प्यावर आपण येऊन पोहोचली आहोत. भारत हा नैसर्गिक साधनसंपत्ती आणि खनिज समृद्ध देश आहे. माथी हिमालय उभा आहे. पायी सागराच्या लाटा लोळण घाळत आहेत. देशातून गंगा-गोदावरी, ब्रह्मपुत्रा सारख्या रक्त वाहिन्या वाहत आहेत. निजीत पक्षी आकाशी भरारी मारतो आहे. सैनिक आणि जवान डोळ्या त तेल घालून देशाची सीमा रक्षण करत आहेत. किसान लोकराजा बनला आहे. आपल्या देशाला शिमला, कुलु, मनाली, उटी सारखी समृद्ध पर्यटन स्थळे लाभली आहेत. एकूणच आपला भारत "देश" सुजलाम सुफलाम आहे.

आपल्या देशाला पैराणिक आणि ऐतिहा - सिक संस्कृतीचा वारसा लाभला आहे. अनेक जाती, धर्मांचे, भाषांचे लोक येथे गुण्यागोविंदाने एकत्र नांदत आहेत. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत कबीर यांच्यासारख्या थोर संतांची समी असलेल्या आपल्या देशाची संस्कृती आज जागतिक पातळीवर सर्वश्रेष्ठ संस्कृती मानली जाते. भारत एकाच वेळी अध्यात्मात आणि विज्ञानातही अग्रेसर होत आहे. अनेक खेळ प्रकारात भारताने जागतिक दर्जाची कामगिरी केळी आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात गेली 15 वर्ष साहित्य, कला, क्रीडा, संस्कृती या क्षेत्रामध्ये नामवंत लेखक, साहित्यिक व कलावंतांनी आपला अमीट ठसा उमटवला आहे. पण असे असले तरी एकीकडे प्रगती होत आहे आणि दुसरीकडे अनेक गोष्टी आपल्याला वेदना देत आहेत. स्वातंत्र्यासाठी अनेक शूर वीरांनी ऐन तारुण्यात बलिदान दिले. आपले संपूर्ण आयुष्य स्वातंत्र्यासाठी खर्च केले. स्वातंत्र्यासाठी त्यांनी रक्ताचा सडा सांडला.पण आम्ही मात्र रक्ताचा धाऊक बाजार मांडला.. . असं कधीकधी उगाचच वाटते. आज चीन-पाकिस्तान सारख्या परकीय शक्ती सीमेवर आक्रमणाच्या तयारीत असतात. देशांमध्ये दहशतवादी हल्ले होतात. उरी, पुलवामा सारख्या रक्ताळलेल्या आठवणी आपल्याला दुःख देतात. मणिपूर सारख्या घटना घडणे हे दुर्दैव च आहे.या देशातल्या शेतकऱ्याला आपल्या हक्कांसाठी आंदोलन करावे लागते. अनेक गरिबांना एक वेळचे जेवण सुद्धा मिळत नाही. फक्त घोषणा केल्या जातात पण प्रत्यक्ष्यात कधीच उतरवत नाहीत.स्वर्गासारखा काश्मीर गुलाबाच्या सुगंधाने दरवळत रहाण्याऐवजी रक्तात रंगताना पाहायला मिळतो. धर्माच्या नावावरून जातीय दंगली होतात, तेव्हा भारत मतिच्या हृदयाचे शेकडों तुकडे होतात. एकाच आईची लेकरे एकमेकांच्या रक्तासाठी तहानलेली असतील तर...... त्या आईची काय अवस्था होत असेल... ... ? या सा-या आक्रमणांमध्ये अतिशय सामान्य माणूस भरडला जातो. जळणारी झोपडी आणि करपणारे रक्त मात्र भारतीयच आहे..... हे आपण का विसरती ? हा खरा प्रश्न आहे. भ्रष्टाचाररूपी यंत्रणेमुळे मोठी व्यवस्था पीखरली जाते. रीज मोठ्या अधिकाऱ्यांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली अटक होते, तेव्हा ज्यांच्या हाती आपण देशाची प्रशासन व्यवस्था सोपवली आहे... तेच भ्रष्टाचाराने बरबटलेले पाहून असंख्य वेदना होतात. तुरूंगात असताना अनेक गुन्हेगार निवड णुका जिंकतात दरवर्षी मोठमोठे घोटाळे उघडकीस येतात. सामान्य माणसाच्या हक्काची भाकरी गिळंकृत करणारी मंडळी या देशाचे मरिकरी आहेत सत्यमेव जयत हे ब्रीदवाक्य आपल्या देशाची शान आहे. परंतु अशा दुष्ट प्रवृत्तींमुळे देश शोकग्रस्त होती. कधीकधी देशासाठी फासावर चढणारे तरुण, अवघ्या चौदाव्या वर्षी शरीरावर गोळी करणार शिरीष कुमार सारखे तरुण पाहिले तर आजच्या या तरुण पिढीकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या स्वातंत्र्याचा अर्थ त्यांना कधी कळेल का ? असा प्रश्न पडतो. आपल्या ला फक्त 15 ऑगस्ट आणि 26जानेवारी याच दिवशी अगदी देशा विषय प्रेम उपाळून येते. फक्त घरोघरी देशाचे झेंडे लावून प्रगती होणार नाही. तर देश्यातील प्रत्येक नागरिकाला आपली उपजीविका चालवीण्यासाठी मदतीचा हातभार लागला पाहिजे. प्रत्येक नागरिकांना देश सेवा करावी ही भावना निर्माण झाली पाहिजे. हीच खरी देश सेवा होय. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आप ल्याला एक गोष्ट मान्यच करावी लागेल की- भारतीय स्वातंत्र्याने आपल्याला खूप काही दिले आहे. परंतु जी असमाधानाचा, असंतोषाचा सूर निघत आहे... त्याला आपणच जबाबदार आहोत आपली आर्थिक, सांस्कृतिक, औद्योगिक प्रगती झाली.. पण पण मूल्यांचा -हास होत गेला. म्हणूनच एकीकडे आपण वैज्ञानिक प्रगतीच्या मार्गान झपाट्याने परिवर्तन करीत आहोत. परंतु त्याच वेळी दुसऱ्या बाजूने वेगाने वाढणाऱ्या भौतिक व अभौतिक समस्यांच्या दुष्ट विळख्यात आपण अडकल्याने स्वातंत्र्याचा श्वास गुदमरतोय, अशी अवस्था झाली आहे. म्हणूनच स्वातंत्र्याच्या या अमृत महोत्सवी सांगता वर्षानिमित देशातील जनतेला हार्दिक शुभेच्छा.




**रवि जाधव कोतापकर, डोंबिवली,**
**9869978736**

# स्वातंत्र्य प्राप्तीची ७६ वर्षे



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**आज आपण आपल्या देशाच्या ७७ वा स्वातंत्र्यदिन साजरा करत आहोत. आजच्याच दिवशी ७६ वर्षापूर्वी म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश इंग्रजांच्या गुलामीतुन मुक्त झाला. त्यापूर्वी आपल्या देशावर इंग्रजांचे राज्य होते. व्यापारी म्हणून आलेले इंग्रज बघता बघता या देशाचे मालक बनले आणि कोट्यावधी भारतीयांना त्यांनी गुलाम बनवले. देश पारतंत्र्यात गेला. सुमारे दीडशे वर्ष इंग्रजांनी आपल्या देशावर राज्य केले. तेवढ्या काळात त्यांनी आपला इतिहास, आपला पराक्रम आपला स्वाभिमान नष्ट करण्याचेच काम केले.**

ज्या देशात सोन्याचा धूर निघत होता त्या देशाला कंगाल करण्याचेच काम त्यांनी केले. देशातील नागरिकांना गुलामीची वागणूक दिली. गोरगरीब, सरळ साध्य मार्गाने जगणाऱ्या भारतातील नागरिकांवर त्यांनी अनन्वित अत्याचार केला. इंग्रजांच्या या अन्याय अत्याचाराने त्रस्त झालेल्या जनतेने इंग्रजांविरुद्ध पहिला उठाव केला तो १८५७ साली. दुर्दैवाने हा उठाव यशस्वी होऊ शकला नाही तरी इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठी भारतीयांना प्रेरणा देणारा हा उठाव ठरला. या उठावातूनच प्रेरणा घेऊन पुढे हजारो देशभक्त निर्माण झाले. काहींनी सशक्त क्रांतीने तर काहींनी अहिंसेच्या विधायक मार्गाने इंग्रजांशी लढा पुकारला. देश स्वातंत्र्य करण्यासाठी हजारो क्रांतिकारांनी स्वतःचे रक्त सांडले, काही फासावर चढले तर काही इंग्रजांच्या गोळीने शहीद झाले. कित्येकांनी तुरुंगवास भोगला. काहींनी काळ्यापाण्याची तर काहींनी जन्मठेपेची शिक्षा भोगली. अशा कित्येक ज्ञात अज्ञात वीरांच्या बलिदानाने देश स्वातंत्र्य झाला. १५ ऑगस्ट १९४७ ला रात्री १२ वाजता दिल्लीच्या लाल किल्यावर पंतप्रधान पंडित नेहरू यांनी तिरंगा फडकवला आणि देशात स्वातंत्र्याची नवी पहाट उगवली. देश स्वातंत्र्य होऊन आज ७६ वर्ष पूर्ण होऊन ७७ व्या वर्षात पदार्पण करत आहोत. ७६ वर्ष हे कोणत्याही देशाचे मूल्यमापन करण्यासाठी तसा अतिशय कमी कालावधी पण इतक्या कमी कालावधीतही आपला देश जगातला सर्वाधिक प्रगत देश म्हणून ओळखला जात आहे. गेल्या ७६ वर्षात आपल्या देशाने सर्वच क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली आहे. कला, क्रीडा, विज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य, शिक्षण, अर्थकारण, राजकारण, समाजकारण अशा सर्वच क्षेत्रात भारताने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. जो देश सुई ही बनवू शकत नाही असे मानले जात होते तो देश आज चंद्रावर स्वारी करत आहे. भारताने घेतलेली ही गरुड झेप कोणालाही हेवा वाटेल अशीच आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारतीय लोकशाहीकडे पाहिले जाते. देश स्वातंत्र होऊन ७६ वर्ष उमटली तरी आपल्या लोकशाहीला अजून कशाचेही गालबोट लागले नाही. २६ जानेवारी १९५० पासून आपला देश प्रजासत्ताक बनला. भारताचे संविधान डॉ बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महान व्यक्तीने लिहिले. त्या संविधानानुसारच देशाचा कारभार चालू आहे. विविध, जाती, धर्म, पंथाचे लोक या देशात गुण्या गोविंदाने राहतात. प्रत्येक प्रांताची भाषा वेगळी, पेहराव वेगळा, संस्कृती वेगळी असे असले तरी भारतवासीय म्हणून सर्व एक आहोत हीच एकी आपली ओळख आहे. वेगवेगळ्या भाषा बोलणारे, वेगवेगळ्या जाती, धर्माच्या १४० कोटी लोकांना एकत्र बांधून ठेवण्याचे काम आपल्या संविधानाने केले आहे. म्हणूनच भारतीय संविधानाला जगातील सर्वोत्तम संविधान असे समजले जाते. भारतासोबतच स्वातंत्र्य झालेल्या आपल्या शेजारील राष्ट्राची आज काय अवस्था आहे हे आपण पाहतोच आहे. अवघ्या ७६ वर्षात भारत एक शक्तिशाली राष्ट्र म्हणून उदयास आले. जागतिक महासत्ता बनण्याकडे आपण पाऊले टाकत आहोत. प्रगतीची हीच घोडदौड अशीच चालू राहिली तर आगामी २५ वर्षात भारत जागतिक महासत्ता बनेल यात शंका नाही. देशाच्या अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिनाच्या देशवासीयांना मनापासून शुभेच्छा! जय हिंद!! जय भारत!!!



# बेट्यांनो, दुर्गंधी गेली नाही, ती तुमच्या रक्तात मुरली आहे !



दत्तकुमार खंडागळे
संपर्क क्र. 9561551006


आधुनिक केसरी

**जेष्ठ लेखक, संशोधक व इतिहास अभ्यासक हरि नरके यांचे काल दुःखद निधन झाले. त्यांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रातून हळहळ व्यक्त करण्यात आली. नरके सरांशी मतभेद असणारेही त्यांच्या जाण्याने दुःखी झाले. अवघा महाराष्ट्र हळहळला. एका बाजूला ही स्थिती असताना दुसरीकडे पुण्यातील काही जातीयवादी भटांनी आपल्या मानसिक आणि वैचारिक दुर्गंधीचे प्रदर्शन केले आहे. नरके सरांच्या मृत्यूनंतर त्यांनी आनंद व्यक्त करत हरि नरके सरांना अश्लाघ्य शब्दांनी संबोधले आहे. या जातीयवादी विकृतांच्याकडून या पेक्षा वेगळी अपेक्षा काय करणार ? पण त्यांचे विशेष कौतुक करावे लागेल. कारण त्यांनी ही दुर्गंधी पिढ्यानपिढ्या जपली आहे.**

१८९० साली ज्यावेळी महात्मा फुले यांचे निधन झाले होते तेव्हाही पुण्यात अशाच प्रतिक्रीया उमटल्या होत्या. ग. वा. बेहरेंच्या 'सोबत' या साप्ताहिकात डॉ बाळ गांगल यांनी महात्मा फुलेंच्याबद्दल गरळ ओकली होती. "हे कसले महात्मा ? ही तर फुले नावाची दुर्गंधी !" असे म्हंटले होते. नेमका तोच वारसा पुण्यातील काही जातीयवादी लोकांनी जोपासला आहे. पिढ्यानपिढ्या जातीयवादाचे स्तन्य प्यायलेले हे विकृत लोक हरि नरके सरांच्या मृत्यूनंतरही तेच बोलत आहेत.

बेट्यांनो, दुर्गंधी गेली नाही, खरेतर ती तुमच्या रक्तात भिनली आहे. एखादी विकृती, घाण पिढ्यानपिढ्या जपणे सोपी गोष्ट नाही. विकृतीची परंपरा तेव्हाच टिकते जेव्हा ती रक्तात भिनलेली असते. पुणेरी विकृतांचे जातीयवादी चाळे पाहता ही विकृती त्यांच्या नसानसात भिनलेली दिसते आहे. केंद्रात जसे मोदींचे सरकार आले आहे तसे ही मंडळी मस्तावली आहे. ते समाज माध्यमातून अतिशय निंदनीय पध्दतीने आपल्या जातीयवादी विकृतीचे प्रदर्शन करत असतात. त्याचाच प्रत्यय त्यांनी नरके सरांना त्यांच्या मृत्यूनंतर शिव्यांची लाखोली वाहून दिला आहे. या आगळ्या वेगळ्या परंपरेबद्दल या विकृतांचे कौतुक करावे लागेल. कारण त्यांनी हा वारसा अखंडीतपणे जोपासला आहे.

नेहमी आपल्या उज्वल संस्कृतीच्या गपड्या ठोकणा-या या हलकटांना संस्कार व संस्कृतीशी काही देणेघेणे नाही. त्यांच्या सोईप्रमाणे त्यांचे संस्कार व संस्कृती असते. दुबळ्या माणसाच्या अंगावर मुतणारा हरामखोर याच पंगतीतला तर सेक्ससाठी देशाची माहिती शत्रू राष्ट्राला पुरवणारा कुरूलकर याच पिलावळीतला. हेच भामटे नेहमी संस्कार व संस्कृतीचे अवडंबर माजवत असतात. "जय श्री राम" चे नारे लगावणारे हेच भामटे आहेत. हेच भामटे संस्कृतीच्या गप्पा मारताना "मरणांत्ती वैराणी !" या रामायणातील युध्द कांडातील श्लोकाचा संदर्भ देतात. रावणाच्या मृत्यूनंतर रामाने बिभिषणाला रावणाच्या मृतदेहावर योग्य पध्दतीने संस्कार करण्यास सांगितले. रावणाच्या मृत्यूसोबत माझे वैर संपले हा संदेश रामाने दिला. पण त्याच रामाचा वारसा सांगणारे हे भामटे प्रचंड विकृत आहेत. त्यांना रामाचे राजकारण करायचे असते. राम समजून घ्यायचा नसतो. त्यांनी नरके सरांच्या मृत्यूनंतर




आपल्या विकृतीचे सोशल माध्यमात जाहिर प्रदर्शन केले आहे. विकृतीचे वारसदार या पेक्षा वेगळे वागणार नाहीत किंवा बोलणार नाहीत.

पुण्यातले सदाशिव पेठी विकृत असेच मस्तवालपणे वागत राहिले, बोलत राहिले तर अनर्थ अटळ आहे. समाज माध्यमात ज्यांनी नरके सरांच्याबद्दल अतिशय हिनकस प्रतिक्रीया व्यक्त केल्या आहेत त्यात सगळे कुलकर्णी, जोशी, ओक, पाठक, भावे, जोशी अशाच आडनावांची लोकं आहेत. पुर्वी सार्वजनिक ठिकाणीही कानात कुजबुज करणारी ही भेकड प्रवृत्ती केंद्रातल्या सत्तेच्या जोरावर मस्तावली आहे. त्यांना भान यायला तयार नाही. ते जर असेच माजत राहिले तर अनर्थ ओढवू शकतो. खवळलेला बहूजन समाज गांधी हत्येनंतर जसा खवळला होता तशाच पध्दतीने तो पुन्हा खवळू शकतो. धर्मांध मुसलमान जसे स्वतःच स्वतःचे शत्रू ठरत आहेत. स्वतःच स्वतःच्या विनाशाचे कारण ठरत आहेत तसेच या विकृतांचे होवू शकते. असा अनर्थ कधीच घडू नये. कुणाच्याही बाबतीत घडू नये. पण पिसाळलेल्या सदाशिवपेठी विकृतांना याचे भान कधी येणार ? हा खरा प्रश्न आहे.

# स्वातंत्र्यदिन साजरा करताना



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**१५ ऑगस्ट १९४७ साली भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले. भारताला स्वातंत्र्य मिळून ७६ वर्ष पूर्ण झाली. स्वातंत्र्य दिन भारतभर मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. खरंतर स्वातंत्र्य हे अनेक लाखो लोकांच्या बलिदानातून मिळाले आहे. इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला मुक्त केले. त्यामुळे प्रत्येकाच्या मनात देशाविषयी आणि स्वातंत्र्यवीरा विषयी कृतज्ञतेची भावना आहे. ती असली ही पाहिजे. त्याचबरोबर भारताने या ७५ वर्षात नानाविध क्षेत्रात नेत्रदीपक अशी कामगिरी केल्याची दिसून येते. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, कृषी, उद्योग, रस्ते, वीज अशा विविध क्षेत्रात भारताने खूप प्रगती केली आहे.**

आज भारत सुजलम सुफलम करण्यासाठी अनेक राज्यकर्त्यांनी, स्वातंत्र्यसैनिकांनी, तरुणांनी आपले योगदान दिले आहे, हे नाकारता येण्यासारखे नाही, त्याचबरोबर भारताने काय कमावले आणि काय गमावले याचाही विचार होणे गरजेचे आहे. इंग्रजांच्या गुलामगिरीच्या खाईतून भारत देश मुक्त झाला. भारतीयांच्या डोक्यावरील विविधांगी ओझे कमी झाले. अनेकांच्या चेहऱ्यावर हसू फुलले. आनंदाचे भाव दिसू लागले. १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन साजरा करताना अनेक शाळांमध्ये गावातून फेरी काढली जाते. भारत माता की जय.. हम सब एक है... जोडो जोडो भारत जोडो, जात-पात के बंधन तोडो भारत जोडो..अशा घोषणा दिल्या जातात. गुरूजी शाळेत भाषण करतात. मुलांना आणि जमलेल्या गावकऱ्यांना स्वातंत्र्याचा थोडक्यात तोडका मोडका इतिहास समजून सांगतात. या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक जणांनी बलिदान दिले आहे. तोही इतिहास मनापासून आणि खरा सांगताना नाहीत. त्यामधील दलित, आदिवासी, भटक्यांचे योगदान सांगत नाहीत. तसे तर तोही इतिहास त्यांना माहित नसतो. आम्ही अशा अनेक गोष्टी हातचे राखून सांगत असतो. पुढे २६ जानेवारी १९५० रोजी भारत देशाने लोकशाहीचा स्विकार केला. सगळ्यांना स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्यायाचे तत्व आले. ज्यांना माणूस म्हणून जगू दिले जात नव्हते,मानवी अधिकार नाकारले होते, शिक्षणापासून वंचित ठेवले जात होते, विषमतेने वागवले जात होते. त्या सर्वाला संविधानामुळे चपराक बसली.त्यामुळे अनेकांचे जीवन बदलले. प्रगतीपथावर वाटचाल करू लागले. जात-धर्म, स्त्री-पुरुष, गरीब - श्रीमंत, आपला - परका, याला कुठेही थारा नव्हता. माणूस महत्त्वाचा होता. संविधानानेही माणूस महत्त्वाचा मानला. त्यामुळेच माणूस प्रगती करू लागला. चंद्र, सूर्यावर जावू लागला. कारण संविधानाने सगळ्यांना अधिकार दिला म्हणून. पण आज हा स्वातंत्र्यदिन साजरा करताना सर्वांनी विचार करायला हवा की आपण भारत देशाला कोणत्या प्रगतीपथावर घेऊन जात आहोत ? जात धर्माच्या नावावर राजकारण करून सामान्य माणसांचे खच्चीकरण करत आहोत. प्रगतीपथावर नेलेल्या भारताला खाली खेचत तर नाहीत ना ? असे असंख्य प्रश्न डोळ्यात अंजन घालणारी आहेत ? पण याबाबत कुणी बोलायला तयार नाही ? लिहायला तयार नाही ? आवाज उठवायला तयार नाही ? हे खरं आहे. कारण आमचं स्वातंत्र्य हिरावून घेतले जात आहे. अन्याय अत्याचाराची दखल घेतली जात नाही. सामान्य माणसाला न्याय मिळवून दिला जात नाही. सगळ्यांना दडपणाखाली जीवन जगावं लागत आहे. बोलायला लिहायला बंदी असल्यासारखी. सगळी मुस्कटदाबी चालू आहे. शेतकरी आत्महत्या करतो आहे. खरे बोलणा-यांना, लिहिणारांना इथे जीवानशी संपवले जात आहे. स्त्रीयांवर अन्याय अत्याचार केले जात आहेत. दलितांच्या जीवनांची राखरांगोळी केली जात आहे. खोट्यांना साथ दिली जात आहे. भ्रष्टाचाराला खतपाणी घातले जात आहे. अन् जो लढतो, ख-यांची बाजू घेतो त्याला मात्र त्रास दिला जातो. खोटे मात्र राजरोसपणे उथळ माथ्याने फिरत आहेत. हे कुठेतरी थांबायला हवे. आम्ही शिकणारांनी या गोष्टींचा विचार करून या स्वातंत्र्याची होत असलेली गळचेपी थांबवायला हवी. सत्याच्या बाजूने उभे राहायला हवे. अनेक लेखक, कवी, साहित्यिक, विचारवंत सत्याला भिडताना किंवा कवेत घेताना दिसत नाहीत. उलट पद, प्रतिष्ठा मिळवण्यासाठी खोटा मान, सन्मान मिळवण्यासाठी खोट्यांच्या गोठ्यात जाऊन बसणे पसंत करत आहेत. खरे तर शिकलेल्या लोकांकडून, साहित्यिक, विचारवंताकडून ही अपेक्षा नाही. उलट त्यांनी सामान्याला न्याय मिळवून देण्यासाठी, भ्रष्टाचार रोखण्यासाठी, स्वातंत्र्यावरील होत असलेल्या हल्ल्याच्या विरूद्ध आवाज उठविण्यासाठी आपली लेखनी झिजवायला हवी.पण आजची अवस्था भयानक आहे. शिकलेल्या लोकांकडून, विचारवंत, साहित्यिकांकडून, अधिका-यांकडून, लोकप्रतिनिधीकडून या स्वातंत्र्याची पायमल्ली होताना दिसते आहे . संविधानाप्रमाणे कारभार करताना दिसत नाहीत. त्यांनी स्वातंत्र्याची मूल्य समाजात स्वार्थासाठी पेरलीच नाहीत . ते संविधानाने घालून दिलेल्या नियमाने वागताना दिसत नाहीत.



मूग गिळून गप्प बसली आहे ? कुणी बोलत नाही ? आवाज काढत नाही ?कारवाई केली जात नाही. उलट पाठिशी घातले जात आहे.कुणी लिहितही नाही ?जिकडे तिकडे असहिष्णू वातावरण. हे पारतंत्र्य नव्हे काय ? हुकूमशाही नव्हे काय ? बोटावर मोजण्या इतक्या माणसांकडेच देशाची संपत्ती आहे. गरीब भुकेने मरत आहे. मंदीर - मस्जिद च्या नावाने राजकारण चालू आहे. असे अनेक प्रश्न मनात आणल्याशिवाय राहत नाहीत. पण हे देशहितासाठी धोकादायक आहे. मानवतेसाठी आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी धोकादायक आहे. अण्णा भाऊ साठे म्हणाले होते की,

**'ये आजादी झुठी है!**
**देश की जनता भुखी है!'**

हे लक्षात घ्यायला हवे. कारण आजही देशातील बहुतांशी जनता अन्न अन्न करून कुपोषणाच्या विळख्याने मरत आहे. त्यात पुन्हा कोरोनाची जास्तीची भर पडली आहे.सामान्य ,गरीब माणुस भेदरून गेला आहे. पूर परिस्थितीमुळे अनेक जण हैराण झाले आहेत.अनेक गावं उद्ध्वस्त झाली आहेत. अनेकांचा संसार उध्वस्त झाला आहे. रोजगार नाही. नोक-या नाहीत. स्वातंत्र्याचा अर्थ त्यांच्यापर्यंत पोहचू दिला जात नाही.शिक्षण बंद केले जात आहे. शिष्यवृत्ती बंद केली जात आहे. जाती - जातीत, धर्मात तेढ निर्माण केली जात आहे. तरीही आम्ही सारे सहन करतो आहे. आजही खोटा इतिहास तरूणांच्या माथी मारला जातो आहे . त्याला भरकटविले जाते. हे कुठेतरी थांबायला हवे. आजच्या तरूणांनी सत्य इतिहास जाणून घ्यायला हवा. मोठ्या कष्टाने मिळवलेल्या स्वातंत्र्याचा अभ्यास करून, लोकशाही मूल्याची जपणूक करण्यासाठी झगडायला हवे.याविषयी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश एन.व्ही.रमणा यांनीही खंत व्यक्त केली आहे. ते म्हणतात की," स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतरही मोजक्या नागरिकांना आपल्या संविधानिक अधिकाराची माहिती आहे, हे देशाचे दुर्दैव आहे, पाश्चात्य देशात लहान शाळकरी मुलगाही तिथल्या संविधान आणि कायद्याबद्दल जागरूक असतो, ही संस्कृती आपल्याकडे असायला हवी."खरे तर ही संस्कृती आपल्याकडे रुजविण्यासाठी शासकीय पातळीवर कुठल्याही प्रकारचे प्रयत्न केलेले दिसून येत नाहीत.

माणसांचा उदोउदो करण्याऐवजी भलत्याच गोष्टीचा उदोउदो केला जात आहे. हे भयानक आहे. भगवंत देशमुख नावाचा कवी म्हणतो की,

**"वाटले होते की,**
**स्वातंत्र्याच्या वातावरणात**
**गाव मोकळा श्वास घेईल**
**लोकशाहीचे वारे पिऊन**
**आकाशात झेप घेईल ."**

आजही स्वातंत्र्याच्या वातावरणात माणूस मोकळा श्वास घेईनासा झाला आहे. त्याला घेऊ दिला जात नाही हे वास्तव सुर्यप्रकाशाइतके सत्य आहे. जिकडे तिकडे माणसांची अडवणूक आणि फसवणूक केली जात आहे. माणूस मारला जात आहे. जाती, धर्माला प्रोत्साहन दिले जात आहे. घोषणेच्या नावाखाली माणसं मारली जात आहेत. तरीही सगळी यंत्रणा

लोकप्रतिनिधी ही उदासीन दिसतात. उलट त्यांनाच संविधानाचा अर्थ कळलेला नसतो. ते संविधानाच्या विरोधातच वागताना दिसतात. तेच नियमाचे उल्लंघन करताना दिसतात हे वाईट आहे. हे जर असे असेल तर मग तिरंगा रॅली काढून , हर घर तिरंगा लावून काय उपयोगाचे ? उलट तिरंगा वरील अशोक चक्र बाजूला काढून संविधानाची पायमल्ली केली जाते. त्यावर कुठल्याही प्रकारची कारवाई केली जात नाही ही शोकांतिका आहे. शासनाने समाजहित आणि देशहितासाठी कार्य करून राष्ट्रीय एकात्मता निर्माण करायला हवी. असहिष्णू वातावरण नाहिसे करायला हवे. जात धर्मापेक्षा माणूस महत्त्वाचा मानायला हवा. या सगळ्या गोष्टींचा विचार आम्ही देशाचे नागरिक म्हणून स्वातंत्र्यदिन साजरा करताना करायला हवा. यातच देशाचे भले आहे.

# खरचं आपण स्वतंत्र आहोत काय ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**दरवर्षीप्रमाणे पुन्हा एकदा १५ ऑगस्ट म्हणजेच स्वातंत्र्यदिन आपण साजरा करत आहोत. १५ ऑगस्ट म्हणजे आपल्या स्वातंत्र्याचा दिवस. या दिवशी आपल्याला ब्रिटिशांच्या वसाहतवादी राजवटीतून स्वातंत्र्य मिळाले. १५ऑगस्ट १९४७ रोजी इंग्रजांपासून स्वातंत्र्य मिळाल्यापासून दरवर्षी हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. शाळा, महाविद्यालये, सरकारी कार्यालये आणि इतर ठिकाणी स्वातंत्र्य उत्साहात साजरे केले जाते. यावेळी पुन्हा एकदा आपण सर्वजण स्वातंत्र्याचा जल्लोष साजरा करण्यासाठी सज्ज आहोत. जगातील सर्वात मोठे प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आपल्या भारत देशाचे स्वातंत्र्य आणि प्रजासत्ताक हे स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेल्या महान वीरांचे स्वप्न होते, जे त्यांनी आपल्यासाठी प्रत्यक्षात आणले. कायदेशीर स्वातंत्र्य असो की वैचारिक स्वातंत्र्य असो किंवा सामाजिक आणि धार्मिक स्वातंत्र्य असो, आज आपण सर्वच बाबतीत स्वतंत्र आहोत.**

पण आपण खरंच मुक्त आहोत का ? आमची प्रजासत्ताकता आम्हाला प्रजासत्ताक राष्ट्राचे स्वतंत्र नागरिक म्हणण्याइतकी आहे का ?स्वातंत्र्याचा खरा अर्थ आपल्याला कळतो का ? स्वातंत्र्याचा खरा अर्थ आपल्याला कळला आहे का ? आपण खरच मुक्त आहोत का ? हे सर्व प्रश्न आपल्या स्वातंत्र्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण करत नाहीत, तर समाजातील बुद्धिजीवी वर्गाला आणि सामान्य जनतेला स्वातंत्र्याचा खरा अर्थ शोधण्याची प्रेरणा देतात.

स्वातंत्र्याच्या इतक्या वर्षांनंतरही देशात असे अनेक वर्ग आहेत जे आपल्या स्वातंत्र्याच्या प्रतीक्षेत आहेत. देशातील वाढता भ्रष्टाचार, बेरोजगारी, उपासमार, कुपोषण आणि गरिबीमुळे स्वातंत्र्य या शब्दाचा अर्थच संपत चालला आहे. जिथे जनतेला पोटभर अन्नही मिळत नाही तिथे स्वातंत्र्याची चर्चाही गुलामगिरीत झालेली दिसते. या वंचितांपासून आपण मुक्त आहोत असे कसे म्हणता येईल. आज आपण कुठे नक्षलवादाशी, कुठे दहशतवादाशी, कुठे जातीयवादाशी, कुठे भ्रष्टाचाराशी लढत आहोत आणि आपल्या देशातील बहुतांश महिला केवळ आपल्या अस्तित्वासाठी लढत आहेत. स्वतंत्र भारत म्हणून घेणाऱ्या देशात आजही धर्म,जातीवरून संघर्ष सुरू आहे. धर्माधतेला खतपाणी घातल्या जात आहे.प्रादेशिक वाद वाढतच आहे.अल्पसंख्याकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न प्रादेशिकतेचा प्रश्न , जातीयतेचा प्रश्न अधून मधून उपस्थित होत आहे.यावरून देशात तेढ निर्माण होत आहे.मणिपूर व हरियाणातील हिंसाचार काय दर्शविते. ? याचा साकल्याने विचार करण्याची गरज आहे. स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव आपण साजरा करत आहोत परंतु आजही देशातील अनेक भागात प्राथमिक सुविधा आपण देऊ शकलो नाही असे आज खेदाने म्हणावे लागत आहे.



आजही ते त्या स्वातंत्र्याची वाट पाहत आहेत, जे स्त्रीला तिची खरी ओळख मिळवून देईल, देशाची अर्धी लोकसंख्या त्या स्वातंत्र्याची वाट पाहत आहे, जे त्यांच्या कलागुणांना फुलण्याची पूर्ण संधी देईल, देशाच्या भगिनी आणि मुली आहेत. त्या स्वातंत्र्याची वाट पाहत आहे, जिथे ते निर्भय राहून त्यांच्या सन्मानाचे रक्षण करू शकतात. आपल्या स्वतंत्र भारतात, आपल्याच कुटुंबाचा एक महत्त्वाचा भाग आजही त्या स्वातंत्र्यासाठी लढत आहे, जे स्वातंत्र्याच्या इतक्या वर्षानंतरही त्यांच्यापासून कोसो दूर आहे. त्यांना समानतेचा अधिकार देणे तर दूरच, सामान्य नागरिक म्हणूनही आपल्याला मान मिळत नाही. त्यामुळे त्यांचे अस्तित्व आणि स्वाभिमान पुन्हा पुन्हा चिरडला जातो. दामिनी, गुडिया यांसारख्या घटना स्त्रीस्वातंत्र्य उघड करायला पुरेशा आहेत. याशिवाय या पुरुषप्रधान समाजाला महिलांना कधी हुंड्यासाठी तर कधी मुलीला जन्म दिल्याबद्दल शिक्षा करण्याचा अधिकार आहे, मग निम्म्या लोकसंख्येने त्याही मोकळ्या आहेत असे कसे म्हणायचे ?

देशातील इतर घटकांबद्दल बोलायचे झाले तर आपला विकास होत आहे एवढेच म्हणावे लागेल, देशाची सध्याची परिस्थिती पाहता व्यवस्थेत किंवा अर्थव्यवस्थेत काही बदल झाल्याचे दिसत नाही. होय, परिस्थिती निश्चितच बिकट झाली आहे. आपला देश विकसित होत आहे आणि आपल्या प्रगतीचे आणि यशाचे नवे अध्याय लिहित आहे, असे म्हणायचे आहे, पण ही कसली प्रगती आहे, जिथे देशातील लोकसंख्येचा एक मोठा भाग दोन वेळच्या भाकरीसाठीही झगडत आहे, इतर मूलभूत सुविधा मिळतात हे सांगायला नको. त्यांच्यासाठी ते खूप दूर आहे. एकीकडे देशातील तरुण सुशिक्षित होऊनही नोकरीसाठी तळमळत आहेत, तर दुसरीकडे काही मुले प्राथमिक शिक्षणापासूनही वंचित आहेत. ज्या तरुणांना नोकऱ्या मिळत नाहीत किंवा ही मुले शिक्षणापासून दूर राहतात, त्यांच्यात कौशल्याचा अभाव आहे, असे नाही. कमतरता त्यांच्यात नाही तर आपल्या व्यवस्थेत आहे. जिथे प्रत्येकाला त्यांचे मुक्त जीवन समानतेने जगण्याचा अधिकार आहे, मात्र ते हक्क मिळवण्यासाठी कोणत्याही सुविधा नाहीत. आज देशात जशी श्रीमंतांची संख्या वाढत आहे, त्याचप्रमाणे दारिद्र्यरेषेखालील लोकांची आणि त्यांची असहायताही वाढत आहे.

आजही देशातील मागासवर्गीयांना जातीवादाचा सामना करावा लागत आहे. सरकार आणि व्यवस्थेने दुखावलेले लोक नक्षलवादी होत आहेत. या ना त्या मुद्द्यावरून सरकारविरोधी आंदोलने होत आहेत. नवीन राज्यांची मागणी देशाचे तुकडे करत आहे. दुसरीकडे देशातील नेते सर्व काही जाणूनही अज्ञानी होऊन शांत झोपलेले आहेत. हे लोक हजारो कोटींचा भ्रष्टाचार करून जनतेची फसवणूक करत आहेत. त्यामुळे दुष्यंत यांच्या ओळीतून शिकून आपण सर्वांनी मिळून व्यवस्था बदलण्यासाठी प्रभावी पुढाकार घेतला पाहिजे ही काळाची गरज नाही का ? आणि या सुधारणेसाठी पुढाकार प्रथम फक्त एकाच व्यक्तीकडून येईल. प्रथम आपली जबाबदारी आणि कर्तव्य समजून घेतले पाहिजे, तरच इतर सर्वजण या मोहिमेत सामील होतील आणि तेव्हाच आपल्याला स्वातंत्र्याचा खरा अर्थ समजू शकेल. या बदललेल्या व्यवस्थेतूनच आपल्याला आपले स्वातंत्र्य, आपले स्वातंत्र्य मिळेल.

# महानगरपालिकेने फक्त पाणी वितरण व्यवस्था सक्षम करावी : आ.फारुख शाह

## महानगरपालिका प्रशासनाच्या विरोधात २८ ऑगस्ट रोजी जनआक्रोश मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील नागरिकांना एक दिवसाआड नियमित व शुद्ध पाण्याचा पुरवठा व्हावा यासाठी आ. फारुख शाह यांनी महानगरपालिका महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक आमदार कार्यालयात बोलाविली होती या बैठकीत २५ सप्टेंबर पर्यंत 33 केव्ही सबस्टेशन चे काम पूर्ण करून आणि येत्या आठ दिवसात पाणी वितरण व्यवस्थेवर विशेष काम करून पाणी वितरण व्यवस्था सक्षम करणेबाबत चर्चा करण्यात आली.दि.१७ ऑगस्ट रोजी ३३ केव्ही सबस्टेशन ची नेमकी स्थिती आणि अक्कलपाडा योजनेची स्थिती याची पाहणी दौरा आयोजित करण्यात आला आहे. यादौऱ्यात महानगरपालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि वीज वितरण कंपनीचे अधिकारी सहभागी असतील. यावेळी मनपा प्रशासनाने अशोकनगर जलकुंभ नवीन बांधनेसाठी आणि व्हॉल्व बसविनेसाठी २कोटीची मागणी केली.त्यानुसार आ.फारुख शाह यांनी राज्य शासनाकडून तत्काळ २ कोटीचा निधी उपलब्ध करून देणार असल्याचे सांगितले.धुळे शहरातील नागरिकांना एक दिवसाआड नियमित व शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यास अपयशी ठरलेल्या महानगरपालिका प्रशासनाच्या विरोधात२८ सप्टेबर रोजी जन आक्रोश मोर्चा काढून मनपा अधिकारी - पदाधिकारी यांचे कुकर्तुत्व जनतेच्या



दरबारात मांडणार असल्याचे आ.फारुख शाह यांनी सांगितले.

बैठकीस धुळे महानगरपालिकेचे देविदास टेकाळे आयुक्त, धुळे मनपा, विजय सनेर, उपायुक्त, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे दिलीप पाटील, वीज वितरण कंपनीचे पवार तसेच अभियंता कैलास शिंदे, सहाय्यक अभियंता चंद्रकांत उगले, नरेंद्र बागुल आदी उपस्थित होते.

# पतीने पत्नीच्या डोक्यात घातली कुऱ्हाड

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** घरात पाणी भरण्यास सांगितल्याचा राग आल्याने पतीने पत्नीच्या डोक्यात कुऱ्हाड घालून खून केला. ही घटना रविवारी सकाळी आठ वाजता शंभूनगरात उघडकीस आली. मुकुल कुमारी सिन्हा ( ६३ ) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे तर पुरुषोत्तम कुमार सिंह ( ६५ ) असे आरोपीचे नाव आहे. मुकुल कुमारी या केंद्रीय विद्यालयात शिक्षिका होत्या तर पती पुरुषोत्तम कुमार हा केंद्र शासनाच्या सीएमपीडीआय विभागात मुख्य व्यवस्थापक पदावर कार्यरत होते. लग्न झाल्यापासूनच दोघेही एकमेकांच्या चारित्र्यावर संशय घेत होते. मुकुल कुमारी यांचे शाळेच्या मुख्याध्यापकासोबत प्रेमसंबंध असल्याचा आरोप पुरुषोत्तम घेत होते. त्यामुळे वाद होऊन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. मात्र, काही वर्षानंतर ते पुन्हा एकत्र आले. त्यांना दोन मुले आणि एक मुलगी असून ते सर्व नोकरीवर आहेत. हे दोघे पती-पत्नी शंभूनगरात राहत होते. रविवारी सकाळी पत्नीने पाणी भरण्यास सांगितल्यामुळे पतीला राग आला. त्यावरून दोघांत वाद झाला. पती पुरुषोत्तम याने घरातून कुऱ्हाड आणली आणि पत्नीच्या डोक्यात घातली. पत्नीचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी कोराडी पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली.

# भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव तिरंगा ध्वज फडकवून शिवाजी विद्यालयात आरंभ

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील शिवाजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय व कै.लक्ष्मणराव भीमराव कोलते पाटील वरीष्ठ महाविद्यालयात शासनाच्या आदेशानुसार रविवार( ता,१३ ) ते १५ऑगस्ट पर्यंत संपूर्ण देशात आझादी का अमृत महोत्सव शासकीय कार्यालये, संस्था, शाळा, महाविद्यालए व घरा, घरावर तिरंगा ध्वज फडकून साजरा करा अशा सूचना आहेत त्या नुसार नगर परिषद कार्यालय शिवाजी विद्यालयात येथे प्राचार्य पंजाबराव कोलते पाटील यांच्या हस्ते रविवार ता,१३ रोजी सकाळी साडेसात वाजता तिरंगा ध्वज फडकविन्यात आला व प्रण प्रतिज्ञा ही घेण्यात आली शाळेचे प्राचार्य पंजाबराव कोलते पाटील यांनी तीन ध्वजारोहण करून अमृत महोत्सव साजरा करावा असे आवाहन केले या प्रसंगी केले. यासाठी शाळेतील प्रा जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते, विकास पाटिल, विजयसिंग राजपूत, विनोद जाधव, भास्कर ससाणे, संजय जोशी, श्रीकृष्ण सोनुनू, भास्कर खमाठ, सुदाम राठोड, मुकुंदा व्यहारे, ज्ञानेश्वर राठोड, पोपटराव



सोनवणे, श्याम जाधव, अजबराव चव्हाण, बाबासाहेब कोलते, राहुल बडक, शिक्षकवृंद, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आमदार श्रीकांत भारतीय यांच्याकडून सुधीर कोर्टीकर सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्य



मराठी पत्रकार संघ मुंबई यांचे वतीने सोशल मिडीया प्रशिक्षण कार्यशाळा व वसंत मुंडे यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आलेले होते.कार्यक्रमाचे उद्घाटन विधानपरिषदेचे आमदार श्रीकांत भारतीय यांनी केले.दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी , दैनिक पुढारीचे कार्यकारी संपादक धनंजय लांबे तसेच दैनिक आधुनिक केसरीचे संपादक प्रभू गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. सोशल मिडिया प्रशिक्षण कार्यशाळेच्या निमित्ताने सुप्रसिद्धरांगोळी कलावंत सुधीर कोर्टीकर यांनी सजवलेल्या फुलांच्या नी रंगाच्या रांगोळ्या विलक्षण नयनरम्य नी मनोवेधक होत्या.त्यामाध्यमातून एक ज्येष्ठ पत्रकार आणि जेष्ठ कलावंत म्हणून विधान परिषदेचे आमदार श्रीकांत भारतीय यांच्या हस्ते शाल..श्रीफळ.. स्मृती चिन्ह देऊन यथोचित सन्मान करण्यातआला.दैनिक पुढारीचे कार्यकारी संपादक धनंजय लांबे.. दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी तसेच दैनिक आधुनिक



केसरीचे संपादक प्रभू गोरे यांनी देखील सुधीर कोर्टीकरांच्या रांगोळ्यांची मुक्त कंठानी प्रशंसा केली. सुधीर कोर्टीकर यांची ज्ञानसंपन्न कलावंत म्हणून त्यांचा नावलौकिक आहे.कोर्टीकर यांनी शिल्पकला .. पाककला..चित्रकला.. हस्तकला ..शिवणकला..फोटोग्राफी.. मेहंदी..रांगोळी..कथा..कविता.. स्तंभलेखन..मिमिक्री..नाणे संग्रह..टपाल तिकिट व काडेपेटी लेबल संग्रह .. उत्तम क्रिकेटीअर..अशा तीसहून अधिक कला अवगत केलेल्या आहेत.आपले कला गुण छंद समाजासाठी.. निस्वार्थी भावनेने अर्पण करीत असतात. छत्रपती संभाजी नगर मधील बहुतेक सगळ्या वृत्तपत्राच्या वर्धापनदिनी.. विशेष कार्यक्रमावेळी सुधीर कोर्टीकर मनापासून फुलांच्या .. रंगांच्या रांगोळ्या सजविताना दिसतात. सुधीर कोर्टीकरांचे वय आज ७१ वर्षं आहे.आजही ते नथकता.. कंटाळता विलक्षण आनंदानी.. उत्साहानी बारा ..बारा तास सहजपणे फुलांच्या रांगोळ्या... तेही निस्वार्थी भावनेने काढताना दिसतात. नुकतीच सुधीर कोर्टीकरांची दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर ". विचारांच्या पलिकडे " यामध्ये अर्ध्या तासाचीमुलाखत सिनेकलावंत रोहन गुजर यांनी घेतलेली प्रसिद्ध करण्यात आलेली होती.अशा अनेक कला गुण संपन्न..चतुरस्त्र कलावंताला त्याच्या भविष्यातील वाटचालीसाठी दैनिक आधुनिक केसरीच्या वतीने खूप साऱ्या शुभेच्छा.



# मेरी माटी अभियानांतर्गत ध्वजवंदन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** ( ताः खुलताबाद ) येथे भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त मेरी मिट्टी मेरा देश या अभियानांतर्गत विविध ठिकाणी ध्वजवंदन करण्यात आले. पोलीस चौकीतील ध्वजवंदन जमादार संजय सपकाळ यांच्या हस्ते झाले तंटामुक्ती माजी अध्यक्ष पुंजाजी नलावडे पोलीस पाटील कारभारी नरवडे भाजपा जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर नलावडे श्रीधर पाटील सय्यद लाल चांद का पठाण विनोद नलावडे सह ग्रामस्थांची उपस्थिती होती.

सहकार सेवा संस्थेचे ध्वजवंदन संचालक भाऊसाहेब काटकर यांच्या हस्ते झाले चेअरमन किशोर नलावडे वसंतराव नलावडे भिकन घुले श्री जाधव भागिनाथ निकम पंडित नलावडे लहू नलावडे सर्व संचालक व ग्रामस्थांची उपस्थिती होती.

ग्रामपंचायत कार्यालयातील ध्वजवंदन सरपंच आप्पाराव नलावडे यांच्या हस्ते झाले ग्रामसेवक श्री बनसोड पोपट काटकर अरुण गायकवाड अजिनाथ धुमाळ योगेश गायकवाड भाऊसाहेब नलावडे शिवाजी काटकर व ग्रामस्थ उपस्थित होते

ज्ञान कुंज कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील ध्वजवंदन निवृत्त आदर्श शिक्षक श्रीधर पाटील यांच्या हस्ते झाले प्राचार्य योगेश झिंजुर्के शरद निकम प्राध्यापक मनोज राणे योगिता पारनेरे नितीन पवार राम राठोड योगेश सुरडकर विनोद निकम अविनाश कोलते भूषण जाधव व शिक्षकांची उपस्थिती होती

गीता बाल विद्या मंदिर इंग्रजी शाळेचे ध्वजवंदन संस्थापक अध्यक्ष दत्तात्रय गंडे यांच्या हस्ते झाले शिक्षकांची उपस्थिती होती

साई पब्लिक स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे ध्वजवंदन प्राचार्य गिरिधर जाधव यांच्या हस्ते झाले

प्राथमिक आरोग्य केंद्रातील ध्वजवंदन वैद्यकीय अधिकारी डॉक्टर अंजुमन निलोफर यांच्या हस्ते झाले कर्मचारी उपस्थित होते

जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचे ध्वजवंदन मुख्याध्यापक हरिभाऊ दहिफळे यांच्या हस्ते झाले यावेळी शिक्षक पालक व विद्यार्थी उपस्थित होते

जिल्हा परिषद केंद्रीय उच्च प्राथमिक शाळेचे ध्वजवंदन रमेश नलावडे यांच्या हस्ते झाले मुख्याध्यापक श्रीकृष्ण मगर शिक्षक व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.



# ढोरकीन येथे ड्रेनेजलाइन नादुरूस्त

## दुर्गंधीमुळे अहिल्यानगर येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकिन :** ढोरकीन येथील अहिल्यानगर भागात ड्रेनेजचे पाणी साचल्याने दुर्गंधी वाढली आहे. त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या नाक दाबून जावे लागते. अहील्यानगर परिसरात मागील काही दिवसांपासून ड्रेनेजलाइन नादुरूस्त असल्याने घाण पाणी रस्त्यावर साचले आहे. या पाण्याचा उग्र असा वास येत असून परीसरात दुर्गंधी पसरलेली आहे. ड्रेनेज दुरूस्तीचे काम रखडल्याने नागरिक त्रस्त आहेत. त्यामुळे अहिल्यानगर येथील रहीवाशी नागरीकांनी ग्रामसेवक एच एम बांगर यांना निवेदन देऊन लवकरात लवकर ड्रेनेज लाईन दुरूस्त करण्याची मागणी निवेदन देऊन नागरिकांनी केली होती. पण ग्रामपंचायत प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याने परीसरातील लहान मुले,गरोदर महीला ,वृद्ध यांचे आरोग्य यामुळे धोक्यात आले आहे.तसेच

येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना, शाळेतील मुलांना , वृद्धांना,गरोधर महीलांना या दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे तुंबलेले ड्रेनेज दुरुस्त करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.तरीही ग्रामपंचायत प्रशासनाने या निवेदनाची दखल न घेतल्याने



अहील्यानगर येथील रहीवाशी नागरीकांनी ग्रामसेवक एच एम बांगर यांना स्मरण पत्र देऊन दिलेल्या निवेदनाची आठवण करून दिली आहे.

सविस्तर माहिती अशी की तालुक्यातील ढोरकीन ग्रामपंचायत हद्दीतील अहिल्यानगर भागात ड्रेनेज लाईन नादुरूस्त असल्याने बऱ्याच महिन्यांपासून अस्वच्छ, दुर्गंधीयुक्त पाणी परीसरात ,तसेच नागरीकांच्या घरात साचले आहे. त्यामुळे लहान मुले,गरोदर महीला ,वृद्ध यांचे आरोग्य यामुळे धोक्यात आले आहे तसेच परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. तरी त्यामुळे रोगराई पसरू नये यासाठी वेळीच ड्रेनेज लाईन दुरूस्ती करून अहिल्यानगर येथील रहीवाशी यांचा प्रश्न कायमचाच मार्गी लावावा अशी मागणी निवेदनाद्वारे ग्रामसेवक बांगर यांच्याकडे केली होती. अनेक दिवसांपासून केलेल्या मागणीकडे ग्रामपंचायतीने लक्ष न दिल्याने या भागातील नागरिकांच्या जिवाशी ग्रामपंचायत प्रशासन खेळत असल्याचे दिसून येत आहे.

अहील्यानगर येथील भागात ड्रेनेज लाईन नादुरूस्त असल्याने बारमाही पाणी थांबलेले असतानाही ग्रामपंचायत प्रशासन यांची दखल घेत नसल्याचे दिसून आल्याने ग्रामसेवक एच एम बांगर यांना येथील रहीवाशी यांनी स्मरणपत्र दिले. ग्रामपंचायत प्रशासन कधी दखल घेणार असा प्रश्न उपस्थित होऊन . प्रशासन सध्या तरी या भागातील नागरिकांच्या आरोग्याशी खेळ खेळला जात आहे असेच चित्र दिसून येत आहे.

त्यामुळे येथील रहिवासी यांनी दिलेल्या स्मरणपत्राद्वारे ग्रामपंचायत प्रशासनाने लवकरात लवकर या ड्रेनेज दुरूस्तीचे काम करून येथील नागरीकांच्या होत असलेले हाल थांबवावे अशी मागणी केली आहे.तसेच लवकरात लवकर या ड्रेनेज लाईन दुरूस्तीचे काम पूर्ण झाले नाही तर लोकशाही मार्गाने आंदोलन करू असा इशारा यावेळी ग्रामपंचायतीला निवेदनाद्वारे तसेच स्मरणपत्राद्वारे नागरीकांनी दिला आहे. दिलेल्या निवेदनावर विजय पवार, शेख समिर, मल्हार भावले, युनूस शेख,शेख कासीम, शेख अफसर, जगदिश खुणे, अक्तार शेख,दगडू भावले, किशोर भावले, पांडुरंग भावले, खाजा शेख, सावता, बाळू मगर, गोरख भावले आदी ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# खुलताबाद तालुका कार्यकारिणी अध्यक्ष लक्ष्मण गुंजाळ

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुका कृषी निविष्ठा विक्रेता दुकानदारांची



बाजार सावंगी ( ताः खुलताबाद ) येथील विकास कॉटन इंडस्ट्रीजच्या सभागृहात बैठक घेण्यात येऊन विक्रेत्यांना सखोल मार्गदर्शनासह तालुका कार्यकारणीची निवड करण्यात आली.

याप्रसंगी माफदाचे महाराष्ट्र कार्यकारिणी अध्यक्ष जगन्नाथ काळे हे अध्यक्ष स्थानि होते. संभाजीनगर जिल्हा कृषी विविष्ठा कार्यकारणी अध्यक्ष प्रकाश मुथा, सचिव सुदाम राऊत, दानिथ अग्रवाल, उकिरडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांनी कृषी साहित्य बी बियाणे कीटकनाशके खते रासायनिक औषधी कृषी साहित्य विक्री व व्यवहार शासकीय नियमावलीचा आढावा घेण्यात येऊन मार्गदर्शन करून नियमांचे पालन व तंतोतंत अंमलबजावणी व्हावी असे सांगितले. काळे यांच्या अध्यक्षतेखाली तालुका कृषी बियाणे कीटकनाशके खत विक्रेत्यांची स्वतंत्र बैठक घेण्यात येऊन तालुका कार्यकारिणीची निवड सर्वानुमते करण्यात आली. अध्यक्ष लक्ष्मण गुंजा ळ बाजार सावंगी उपाध्यक्ष कैलास झारेकर प्रवीण चव्हाण विलास सुराशे सचिव संजय पुंड बाजार सावंगी सहसचिव सुरेश गायकवाड योगेश खंडेलवाल किशोर जाधव कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर जाधव दीपक काळे नानासाहेब चंद्र टिके, उपकोषाध्यक्ष विजय काळे नारायण बर्डे अशोक राठोड मधुकर बोडके गुलजार पठाण यांचा त्यात समावेश आहे. सूत्रसंचालन कैलास नलावडे यांनी करून आभार मानले.

# गुत्तेदाराकडून साप्ताहिकात बदनामी, खंडणी प्रकरणी संपादकावर गुन्हा

## निकृष्ट कामाची चौकशी लावल्याने गुन्हाः सुरेश अहिरे

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** पाचोरा येथील आमदार-पत्रकार संघर्ष समोर आला असतानाच गुत्तेदार व संपादक यांचा संघर्ष समोर आला असून गुत्तेदाराने साप्ताहिकच्या संपादकाविरोधात काम सुरळीत चालावे यासाठी तीन लाख रुपयांची खंडणी मागितली व त्या अनुषंगाने गुत्तेदाराचा साप्ताहिकात फोटो छापून बदनामी केल्याप्रकरणी गुत्तेदाराच्या फिर्यादीवरून निफाड टाइम्सचे संपादक सुरेश आहिरे यांच्याविरोधात लासलगाव पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे. मात्र आपण संबंधित गुत्तेदाराच्या विरोधात तक्रार अर्ज केल्याने त्यातून गुन्हा नोंद केल्याचे तसेच आपल्या जीविताला धोका असल्याबाबत संबंधित संपादकाने जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन पाठवले आहे.

फिर्यादी शेखर राजाराम शेलार ( वय ३९ ) व्यवसाय, सरकारी गुत्तेदार रा.निफाड यांनी लासलगाव पोलीस स्टेशनमध्ये दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, आरोपी सुरेश अंतू आहिरे यांनी दि.१८ ऑगस्ट २०२२ ते दि.३० मार्च २०२३ पोवतो वेळोवेळी फोनद्वारे त्यानंतर दि.१२ ऑगस्ट २०२३ रोजी लासलगाव येथील गुंजाळ पेट्रोलपंपाजवळ समक्ष, पत्रकार असल्याचा गैरफायदा घेऊन फिर्यादी करत असलेल्या सरकारी योजनेअंतर्गतचे ग्रामपंचायत टाकळीविंचुर येथील सौर ऊर्जा प्रकल्प, भूमिगत गटार, सिमेंट रस्ते, साहित्य पुरवठ्याचे कामाची निविदा या कामाची पूर्तता होण्यासाठी व सदर काम सुरळीत चालू ठेवण्यासाठी खंडणी स्वरूपात ३ लाख रुपयांची वेळोवेळी मागणी केली व त्या अनुषंगाने फिर्यादीची त्यांच्या निफाड टाइम्स साप्ताहिकात फोटो छापून बदनामी केली अशी फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून आहिरे यांचे विरोधात गु.र.नं.२०२/२०२३ भा. दं. वि.कलम ३८४,५०६ प्रमाणे लासलगाव पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी स.पो.नि.राहुल वाघ यांचे मार्गदर्शनाखाली पो.उ.नि. एम.के.सुरासे अधिक तपास करीत आहेत.

दरम्यान टाकळी विंचुर ता.निफाड येथील विकास कामासंदर्भात सन २०२०/२१/२२ मध्ये विकासकामे नियमबाह्य, बेकायदेशीर, नित्कृष्ट होत असल्याने दि.६ फेब्रुवारी रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प.नाशिक यांचेकडे मी तक्रार अर्ज केला असता त्यांनी चौकशीचे आदेश दिले. त्यानुसार गटविकास अधिकारी महेश पाटील यांनी सहा. गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, शाखा अभियंता यांची त्रीसदस्यीय समिती नेमली आहे. ती चौकशी प्रलंबित आहे. टाकळी विंचुर ग्रा.प.साहित्य पुरवठा ऑनलाईन निविदा प्रक्रियेत माझ्या यश कंट्रक्शनने निविदा भरली असता अशोकस्मृती बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स फर्मचे शेखर शेलार यांनी निविदा व्यवस्था करून माझी निविदा बाद केली. याबाबत मी गटविकास अधिकारी यांचेकडे ४ ऑगस्ट २३ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. या फर्मचे मालक सूरज मोकळ असतांना शेलार काम पाहत आहेत.

माझ्या तक्रारी व त्यांची चौकशी समिती यांचा अहवाल प्रलंबित असल्याने मला माघार घ्यावी म्हणून आमिष दाखवले मात्र, मी त्याला बळी पडलो नाही त्यामुळे माझ्यावर दबाब आणला जात आहे. त्यामुळे माझ्या जीविताला धोका आहे अशी तक्रार संपादक सुरेश अहिरे यांनी नाशिक जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांचेकडे निवेदन पाठवून केली आहे.



# चारठाणा येथील लेक गावातच वैद्यकीय अधिकारी

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** येथील मूळ रहिवासी असलेली गावाची लेक डॉ. वैष्णवी विकास भुते ही गावातील आरोग्य केंद्रात बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी म्हणून रुजू झाल्याने संत जनार्धन विद्यालयातील शिक्षकांनी तिचा सत्कार करून अभिनंदन केले आहे. विकास केशव भुते हे सेलू तालुक्यात जिल्हा परिषद शाळेवर शिक्षक असून मूळ चारठाणा येथील रहिवासी असलेले भुते कुटुंब नोकरीनिमित्त सेलू येथे स्थायिक झाले आहे. त्यांना दोन अपत्ये असून दोन्ही वैद्यकीय क्षेत्रात शिक्षण घेत आहेत. पैकी त्यांची कन्या कु. वैष्णवी विकास भुते हिने वैद्यकीय क्षेत्रातील एमबीबीएस पदवी नुकतीच पूर्ण केली असून एक वर्षाचे बंधपत्र पूर्ण करण्यासाठी तसेच आपल्या शिक्षणाचा फायदा आपल्या गावातील नागरिकांना व्हावा यासाठी आपली जन्मभूमी असलेले चारठाणा हे गाव निवडले आहे. बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी म्हणून ती प्राथमिक आरोग्य केंद्र चारठाणा येथे नुकतीच रुजू सत्कार केला. झाली आहे. तिच्या या यशाबद्दल गावातील नागरिक व संत जनार्धन विद्यालयातील शिक्षक जयराम राऊत, अशोक घुगे, महिंद्र फटके आदींनी प्राथमिक आरोग्य केंद्रात येऊन वैष्णवीचा यावेळी डॉ. श्वेता रावळे, सोमनाथ खके, औषध निर्माण अधिकारी विजय ढाकणे, सीमा सातपुते, वैजनाथ मुंजे,आदी उपस्थित होते.

# सेवानिवृत्ताची ७७ लाखांची फसवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**डोंबिवली :** येथील एका सेवानिवृत्ताची कल्याण मधील खडकपाडा भागात राहणाऱ्या दाम्पत्याने वाढीव व्याजाचे आमीष दाखवून ७७ लाख ७३ हजार रुपयांची फसवणूक केली आहे. पूजा विशांत भोईर (३३), पती विशांत भोईर (३५) अशी गुन्हा दाखल झालेल्या पती, पत्नीची नावे आहेत. डोंबिवलीतील शिवमंदिर भागात राहणारे शांताराम गणपत निलख (६०) यांची या दाम्पत्याने फसवणूक केली आहे. पोलिसांनी सांगितले, शांताराम निलख हे सेवानिवृत्त आहेत. कल्याण मधील खडकपाडा भागात राहणाऱ्या पूजा आणि विशांत या पती, पत्नीने




शांतराम यांचा विश्वास संपादन केला. त्यांना दर आठवड्याला ७७ लाख रुपयांच्या रकमेवर वाढीव व्याज देण्याचे आमीष दाखविले. दर आठवड्याला मोठी रक्कम हातात पडणार असल्याने शांताराम यांनी भोईर दाम्पत्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवला. गुंतवणुकीनंतर ठरल्याप्रमाणे भोईर दाम्पत्याने शांताराम यांना दर आठवड्याला ठराविक रक्कम देणे आवश्यक होते. ती रक्कम देण्यास ते टाळाटाळ करू लागले. सतत तगादा लावूनही आरोपी भोईर दाम्पत्य वाढीव व्याज नाहीच पण मूळ रक्कमही परत करत नसल्याने आपली फसवणूक त्यांनी केली असल्याची खात्री शांताराम यांची झाली.



# शेकडो दिव्यांगांना मोफत कृत्रिम हात-पाय अवयवांचे वाटप

## दिव्यांग बांधवांनी मानले राधा- मोहन साथी प्रतिष्ठान, साधू वासवानी मिशन पुणे यांचे आभार!

आधुनिक केसरी न्यूज




**परळी :** येथील औद्योगिक वसाहत सभागृहात राधा-मोहन साथी प्रतिष्ठान व साधू वासवानी मिशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आर्टिफिशियल लिंम्ब कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. या कॅम्प अंतर्गत अपंग बांधवांसाठी मोफत हात पाय कृत्रिम अवयवाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी अनेक अपंग बांधवांना मोफत कृत्रिम हात पाय मिळाल्याने ते अक्षरशा भारावून गेले होते. अनेकांच्या डोळ्यात आनंद अश्रू आले होते. "कृत्रिम अवयव" वाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. दरम्यान या शिबिरात शेकडो दिव्यांग बांधवांना हर घर तिरंगा या अभियाना अंतर्गत राष्ट्रध्वजाचे वितरण करण्यात आले.

या शिबिराचे उदघाटन दिप प्रज्वलन करून तसेच संपादक स्वर्गीय मोहनलालजी बियाणी यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. या प्रसंगी माजी नगराध्यक्षा तथा राधा-मोहन साथी प्रतिष्ठांच्या मार्गदर्शिका राधाबाई मोहनलाल बियाणी, राधा-मोहन साथी प्रतिष्ठानचे अध्यक्ष चंदुलाल बियाणी, प्राचार्य सचिन धूत, युवा उद्योजक लोकेशजी राठी,अभिषेकजी झंवर, सौ.छाया सचिन धूत, सौ.कल्पना चंदुलाल बियाणी, साधू वासवानी मिशन पुणे प्रोजेक्ट हेड मिलिंद जाधव, टेक्निशियन सुशील ढगे, सलील जैन, ज्ञानेश्वर पाटील, जितेंद्र राठोड, दत्तात्रेय राक्षे, संपादक सतीश बियाणी, कार्यकारी संपादक तथा राधा-मोहन साथी प्रतिष्ठानचे संचालक ओमप्रकाश बुरांडे, संपादक आत्मलिंग शेटे, पत्रकार जगदीश शिंदे, जयप्रकाश बियाणी आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

अनेक दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम हात, पाय विकत घेणे शक्य होत नाही ही बाब लक्षात घेत राधा-मोहन साथी प्रतिष्ठान परळी व साधू वासवानी मिशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 13 ऑगस्ट 2023 रोजी मोफत कृत्रिम हात-पाय, कृत्रिम अवयव शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरामध्ये सहभागी झालेल्या 70 लाभार्थ्यांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून हात-पायांचे माप घेण्यात आली होती. दुर्घटनेत हात-पाय गमावणारे, मधुमेहाने त्रस्त, रक्तवाहिनींच्या विकाराने पीडित व्यक्ती आणि गँगरीन झालेल्या व्यक्ती सर्वसामान्य जीवन जगण्यात असमर्थ असतात. अशा व्यक्ती कृत्रिम हात-पायांच्या सहाय्याने सामान्य जीवन जगू शकतात. सर्वसामान्यांप्रमाणे चालू फिरू शकतात. सर्व कामकाज करू शकतात. एवढेच नव्हेतर सायकल, रिक्षा चालवू शकतात. राधा- मोहन साथी प्रतिष्ठान च्या पुढाकाराने चंदुलाल बियाणी यांच्या बियाणी यांच्या प्रयत्नाने या शिबिरातून अपंग नागरिकांना सामान्य जीवन जगण्याची मदत तसेच उमेद मिळाली असून शेकडो अपंग बांधवांना दिलासा मिळाला आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सोमनाथ गडेकर, अनंत ढोपरे,शरद कावरे, प्रकाश वर्मा, मुरलीधर बंग, आनंद तूपसमुद्रे, आनंद हाडबे, जगन्नाथ रामदासी,महेश शिवगण, करण आदीनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार धनंजय आरबुने यांनी केले.

**साधू वासवानी व राधा मोहन साथी प्रतिष्ठानचा पुढाकार**

वेगवेगळ्या अपघातांत हात किंवा पाय गमावलेल्यांच्या आयुष्यात नवी उमेद जागविण्याचे काम राधा– मोहन साथी प्रतिष्ठान परळी व साधू वासवानी मिशन पुणे हे करीत आहेत . दिव्यांगांना आधार देण्यासाठी कृत्रिम अवयव व सहायक साधने देण्यासाठी बियाणी मित्र परिवार व साधू वासवाणी मिशन यांनी पुढाकार घेतला आहे . या शिबिराच्या माध्यमातून शेकडो दिव्यांग गरजूंची तपासणी करून मोठ्या प्रमाणात साहित्य देण्याचे लक्ष हाती घेण्यात आले होते .

**दिव्यांग व्यक्तींना जगण्यासाठी उभारी मिळेल–चंदुलाल बियाणी**

राधा मोहन साथी प्रतिष्ठान व साधू वासवानी मिशन पुणे यांच्या माध्यमातून शेकडो अपंग व्यक्तींना कृत्रिम हात, पाय बसविण्यात आले असल्यामुळे दिव्यांग व्यक्तींना निश्चितच जगण्यासाठी नवी उभारी मिळेल . आर्टिफिशल लिंम्ब कॅम्प यापुढे संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात आयोजित करून अपंग बांधवांच्या जीवनात आनंद निर्माण करणार असल्याचे राधा –मोहन साथी प्रतिष्ठानचे अध्यक्ष चंदुलाल बियाणी यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले .

**दिव्यांग बांधवांना दिलासा**

मोफत कृत्रिम पाय व हात वाटप शिबिर आयोजित केल्यामुळे या शिबिराच्या माध्यमातून दिव्यांग बांधवांना अद्यावत तंत्रज्ञानाने बनविलेले कृत्रिम हात व पाय फायबरचे असून वजनास अत्यंत हलके टिकावू व मजबूत असून प्रत्यारोपण केल्यानंतर अपंग व्यक्ती चालू शकते तसेच सर्व दैनंदिन कामे करू शकते . सर्व वयोगटातील पुरुष आणि स्त्री रूग्णांचे मधुमेहामुळे, गेंगरीनमुळे किंवा कुठल्याही प्रकारच्या अपघातामुळे हात व पाय गमावले गेले असतील अशा सर्व रुग्णांची तपासणी करून त्या सर्व दिव्यांग बांधवांना मोफत हात पाय बसविण्यात आले असून शेकडो दिव्यांग बांधवांना दिलासा मिळाला .

**असंख्य अपंग बांधव शिबिरात सहभागी**

राधा मोहन साथी प्रतिष्ठान व साधू वासवानी मिशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या मोफत हात पाय अवयव शिबिरास बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातून असंख्य अपंग बांधवांनी उपस्थिती दर्शवली होती .यात लोणार जिल्हा बुलढाणा, उमरगा, लातूर,औराद शहाजानी,बार्शी, लोहा,वाशी, भूम, परंडा,गंगाखेड, जालना, परभणी, औंढा नागनाथ, परळी वैजनाथ, आंबेजोगाई आधी परिसरातील दिव्यांग बांधवांनी या शिबिराचा लाभ घेतला .

शेतातील पिकांचे खळे सुरू असताना मळणी यंत्रात माझा हात मला गमवावा लागला होता . हात पूर्णता निकामी झाल्याने अनेक अडचणीचा सामना मला करावा लागत होता . शिबिरात मला कृत्रिम हात मिळाला असून यामुळे वाऱ्यावर उडणारी माझ्या शर्टची बाही वारंवार मला दु :ख देत होती . पण आज मिळालेल्या हातामुळे मला नवचैतन्य मिळाले आहे .

**पंढरी भाऊराव सानप, लोणार ,जिल्हा बुलढाणा**



## शिवसंग्राम पक्षाचे संस्थापक अध्यक्ष विनायकराव मेटे यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्याच्या बिडकिन येथील स्वराज्य नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित यांच्या वतीने बहुजननायक, लोकनेते, शिवसंग्राम पक्षाचे नेते विनायकराव मेटे यांना प्रथम स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. प्रथमता मेटे यांच्या प्रतिमेचे पूजन करत पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी मनोज पेरे, विजय शेजुळ, लहुअण्णा कांतबने, तमीजोद्दीन इनामदार, सिताराम आव्हाड, कल्याण शिंदे , स्वप्निल देशमुख, राजेश भवर, राजु डुबे, अजय भिवसाने, ज्ञानेश्वर औटी, हसन चाऊस, सचिन हाडे, सुमित त्रिभुवन, मिलिंद जाधव आदींसह स्वराज्य नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित शाखाधिकारी,कर्मचारी उपस्थिती होती.



## दिव्यांगांना संसारोपयोगी वस्तू वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** तालुक्यातील पागोटे ग्रामपंचायत तर्फे सण 2023 -24 या आर्थिक वर्षा मध्ये 5% दिव्यांग कल्याण निधी अंतर्गत पागोटे गावातील सर्व दिव्यांग व्यक्तींना 'शासन दिव्यांगाच्या दारी' या योजने अंतर्गत उत्तम असे संसारोपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी पागोटे ग्रामपंचायतचे सरपंच कुणाल पाटील, उपसरपंच सुजित तांडेल, ग्रामपंचायत सदस्य-मयूर पाटील,सतिश पाटील, अधिराज पाटील, सदस्या- प्राजक्ता पाटील, करीष्मा पाटील, सुनीता पाटील, सोनाली भोईर, समृद्धी तांडेल,ग्रामसेविका अनिता म्हात्रे आदी ग्रामपंचायतचे सर्व सदस्य उपस्थित होते.एकूण 14 अपंग व्यक्तींना उत्तम असे संसारोपयोगी साहित्य वाटप करण्यात आले.विविध शासकीय योजना, सेवा, सुविधा तळागाळात सर्वसामान्य व्यक्ती पर्यत पोहोचविण्यात येत असून सरपंच कुणाल पाटील, उपसरपंच व ग्रामपंचायतचे सर्व सदस्य शासनाच्या विविध योजना, सेवा सुविधा तळागाळात पोहोचविण्यासाठी विशेष मेहनत घेत आहेत.

## बिलोली तालुक्यातील मौजे अटकळी गावामध्ये विविध कामांचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज



**बिलोली :** बिलोली तालुक्यातील मौजे अटकळी या गावा मध्ये विविध विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले आहे. दि १२ रोजी ठिक ५ वाजता माझी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर यांच्या अध्यक्षतेखाली माजी जिल्हा परिषद सदस्या डॉ मिनलताई खतगावकर यांच्या हस्ते अटकळी गावातील सर्वांगिण विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यात जलजिवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजना व जिल्हा परिषद सदस्या डॉ मिनलताई खतगावकर यांच्या स्थानीक निधीतून दवाखाना बांधकाम साठी ८० लक्ष नीधी दिला आहे विकासाच्या दृष्टीने गावातील रस्ते नाली कामाचे उद्‌घाटन माजी जिल्हा परिषद सदस्या डॉ मिनलताई खतगावकर यांच्या हस्ते करण्यात आले आहे सविस्तर वृत्त असे की अटकळी गावचे सरपंच प्रतिनीधी शिवाजी पाटील डोंगरे यांनी सतत माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांना निवेदन देऊन पाठपुरावा करून गावच्या विकासाची पायाभूत सुविधा गावांसाठी मिळाला पाहिजे या पंचक्रोशीत अटकळी या गावचे नाव लौकिक होत आहे.या उद्देशाने शासनाकडे पाठपुरावा करून १ कोटी ४० लक्ष नीधी आनुन रस्ते नाली या कामाला सुरुवात झाली आहे यावेळी मिनलताई खतगावकर यांनी कार्यक्रम आयोजित प्रसंगी बोलत होते की लघु उद्योग व रोजगार मिळण्यासाठी प्रयत्न करु असे आश्वासन दिले यावेळी माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, बाळासाहेब पाटील खतगावकर, माजी जि. प. सदस्या डॉ मिनलखतगावकर, माजी सरपंच विनोद देशमुख, अटकळीच्या सरपंच पुष्पाबाई घोडके, उपसरपंच रनवीर पाटील डोंगरे, शिवाजी पाटील, ग्रामसेवक हाबीरे साहेब, अंबादास शिनगारे, माधवराव कंधारे, संतोष पुय्यड, गळेगावचे सरपंच गुंडेराव नाईक, भुजंगराव फुलारी, श्रीपत पाटील शिंदे, संभाजी पाटील, अमोल शेरे, सुधीर वाघमारे, गंगाधर गायकवाड, राजु पोलकमवाड, किसन पाटील, आयुब पटेल, संतोष जाधव, संभाजी जाधव, गुंणवत जाधव, बाजीराव जाधव, बालाजी पांचाळ आदी गावांतील नागरीक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. अटकळी या गावची विद्यार्थिनी श्रावणी जाधव हिचा एमबीबीएस साठी नंबर लागलेला असून तिचा सत्कार डॉ. मीनल खतगावकर यांच्या हस्ते करण्यात आला आहे. उपस्थित पत्रकार बंधू महा लाइव चैनल चे संपादक यादव लोकडे, काशिनाथ वाघमारे व युवा राज्य प्रतिनिधी विलास शेरे तसेच गावातील अनेक मान्यवर उपस्थित होते व शेतकरी वर्ग खूप मोठ्या प्रमाणात उपस्थित होता.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# राष्ट्रभक्ती मनामनात कायम तेवत राहावी : आ. जोरगेवार

आधुनिक केसरी न्यूज

**श्याम हेडाऊ**

**चंद्रपूर :** स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव देशात सर्वत्र साजरा होत असतांना चंद्रपूरमधे सुद्धा या अमृत महोत्सवानिमित्त 100 फूट उंच तिरंगा ध्वज सतत फडकत राहावा व राष्ट्रभक्तीची भावना कायम मनामनात धगधगत रहावी, असा संकल्प चंद्रपूर विधानसभा निर्वाचन क्षेत्राचे आमदार किशोर जोरगेवार यांनी केला होता.

यासंदर्भात त्यांनी स्थानिक जिल्हाधिकारी विनय गौडा, जिल्हा पोलीस अधीक्षक रविद्रसिंह परदेशी, मनपा आयुक्त विपीन पालीवाल यांच्याशी चर्चा करून त्या दृष्टिने प्रयत्न सुरु करण्यात आले होते.

या संकल्पनेला आज मुर्त स्वरूप प्राप्त झाले. स्थानिक पोलीस मुख्यालय परिसरात हा 100 फूट उंच तिरंगा ध्वज उभारण्यात आला असून या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी विनय गौडा , पोलीस अधीक्षक रविद्रसिंह परदेशी , मनपा आयुक्त विपीन पालीवाल , सहाय्यक पोलीस अधिक्षक मिना जनबंधू , तहसीलदार विजय पवार , सा.बा. वि. उपविभागीय अभिनंदन प्रकाश अमरशेट्टीवार, यंग चांदा ब्रिगेड शहर अध्यक्ष पंकज गुप्ता , महिला आघाडी अध्यक्ष वंदना हातगावकर आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना आमदार किशोर जोरगेवार यांनी राष्ट्र भक्ती ही क्षणिक न राहता ती कायम मनामनात तेवत राहावी असे आवाहन करीत भारताच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांचे स्मरण आपण करायला हवे असे मनोगत व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाच्या औचित्याने जिल्हाधिकारी विनय गौडा , पोलीस अधीक्षक रविद्रसिंह परदेशी , मनपा आयुक्त विपीन पालीवाल आदिंनीही आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या औचित्य साधत ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प चंद्रपूर येथील पशुवैद्यकीय अधिकारी डॉक्टर रविकांत खोब्रागडे, पोलीस नाईक, शुटर अजय मराठे, वाहन चालक अक्षय दांडेकर, अमोल कोरपे यांनी आजवर 58 वाघ पकडण्यात यशस्वी कार्य केल्यामुळे त्यांच्या अतुलनीय कामगीरी बद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाखा अभियंता भट्टड, बोधनवार, डोंगरे यांच्यासह राखीव पोलीस निरीक्षक किसन नवघरे आणि संपूर्ण पोलीस विभाग यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाला शहरातील गणमान्य नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वृत्तपत्रांनी विश्वासार्हता जपावी : न्या. अंबादास जोशी

## इनस्टिट्युट मिनेझिस ब्रागांझातर्फे तिघा पत्रकारांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**पणजी :** गोव्यातील पत्रकारितेतही नवनवीन प्रवाह येत आहे. मुद्रित माध्यमांबरोबर इतर प्रसारमाध्यमे प्रचलित होत आहे. कालच्या बातमीत आज बदल होतात. कालची घटना इलेक्ट्रानिक्स माध्यमे देत असतात. त्यात भडकपणा अधिक असतो. मुद्रित माध्यमे साधकबाधक विचार करून बातम्या देत असतात. इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांपेक्षा मुद्रित माध्यमांची विश्वासार्हता जास्त असते. ती विश्वासार्हता जपली पाहिजे, असे प्रतिपादन गोव्याचे लोकायुक्त न्या. अंबादास जोशी यांनी केले.

पणजी येथील इन्स्टिट्युट मिनेझिस ब्रागांझा या राज्य सरकारच्या संस्थेतर्फे पत्रकार साहित्यिक प्रकाश रामचंद्र क्षीरसागर, विजय डिसोझा आणि भांगरभूंयचे संपादक महेश दिवेकर यांचा शाल, श्रीफळ, झाडसमई व रोख रक्कम देऊन सन्मान करण्यात आला या वेळी ते बोलत होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष दशरथ परब, कार्यक्रमाचे समन्वयक दै. तरुण भारतच्या गोवा आवृत्तीचे संपादक सागर जावडेकर व ब्रागांझा संस्थेचे सदस्यसचिव मिलिंद घाटे हेही व्यासपीठावर होते. प्रदीप नाईक यांनी सूत्रसंचालन केले. प्रारंभी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेला मान्यवरांनी गुलाबपाकळ्या अर्पण केल्या. सोशल मीडियामुळे वृत्तपत्रांचा लेखकवर्ग कमी होत आहे. परंतु न डगमगता तरुण पत्रकरांना वृत्तपत्रांकडे आकर्षित करायला हवे. अभ्यासेन प्रकटावे हे सूत्र अंमलात आणले पाहिजे. लोकांना शिकवण्याची गरज आहे. विश्वासू आणि वास्तविकता जपावी. बातमी देताना सकारात्मकता जपून सत्य तेच प्रतिपादन केले पाहिजे, असेही जोशी यांनी सांगितले. लोकमान्यांनी सडेतोड आणि व्यासंगपूर्ण वक्तव्याने देश जागवून सोडला असे दशरथ परब म्हणाले. टिळक महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण देशाचे ते नेते होते. ब्रिटिशांना त्यांनी सळो की पळो करून सोडले ते कृतीने असेही परब यांनी सांगितले. आपले व्यक्तिमत्त्व प्रारंभी सोलापूर तरुण भारत ( रा. स्व. संघाचा ) , नंतर तुळजापूरचा सिद्धेश्वर समाचार, पुणे लोकसत्ता आणि १९९३ पासून दै. गोमन्तक मध्ये संपादकीय खात्यात काम केले. चंद्रकांत घोरपडे, जयंत संभाजी यांच्या हाताखाली तसेच शरद कारखानीस व संजय ढवळीकर यांच्यासह अनेक संपादकांनी पत्रकारिता शिकवली. सुरेश नाईक यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. न्यायालयातील वार्तांकनाची जबाबदारी दिली. आजवरची पत्रकारितेतील अनेक स्थित्यंतरे पाहायला मिळाली अनुभवायला मिळाली असे सन्मानाच्या उत्तरात प्रकाश क्षीरसागर यांनी सांगितले. कोणत्याच भाषेतील तरुण वृत्तपत्रात काम करण्यास उत्सुक नसतात. अभ्यासाची तयारी नसलेले नवखे तरुण वृत्तपत्रांना तयार करावे लागतात ते नंतर ते प्रसारमाध्यमाच्या व डिजिटल माध्यमांकडे आकर्षित होतात असे प्रतिपादन भांगरभूंयचे संपादक महेश दिवेकर यांनी केले.




# मंडल आयोग अंमलबजावणी दिनानिमित्त धरणे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** ओबीसीच्या विविध मागण्यांसाठी भारतीय पीछडा( ओबीसी ) शोषित संघटन च्या वतीने विभागीय आयुक्त कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. 13 ऑगस्ट 1990 रोजी मंडल आयोगाची अंमलबजावणी प्रधानमंत्री विश्वनाथ प्रतापसिंग यांनी केली या दिनाचे निमित्त साधून हे धरणे आंदोलन ठेवण्यात आले होते. स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतरही 3743 जातीमध्ये विभागलेल्या ओबीसी समाजाची जात नाही. जनगणना होत नाही त्यामुळे या समुदायासाठी कल्याणकारी योजना राबवण्यात



व आरक्षण निश्चिती करण्यात अनेक अडचणी येतात .याकरिता ओबीसीची जातनिहाय जनगणना करावी. मंडल आयोगाची संपूर्ण अंमलबजावणी करावी. केवळ ओबीसी करता असलेली घटनाबाह्य क्रिमिलियरची अट रद्द करण्यात यावी.

ओबीसींचा शासकीय निमशासकीय नोकऱ्यातील अनुशेष तात्काळ भरण्यात यावा. इत्यादी प्रमुख मागण्या करण्यात आल्या याप्रसंगी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष एस जी माचनवार, विभागीय अध्यक्ष प्रा सुदाम चिंचाणे विभागीय महासचिव डॉ कालिदास भांगे जिल्हा सचिव डॉ देवराज दराडे महानगराध्यक्ष डॉ वसंत हारकळ,ओबीसी विचारवंत स सो खंडाळकर ,मंडल आयोग लागू करण्यात मा.शरद यादव, लालूप्रसाद यादव, कांशीरामजी यांचे प्रचंड योगदान असल्याचे सुशीलताई मोराळे यांनी सांगितले.

सरस्वती हरकळ, ऍड. महादेव आंधळे, प्रा. गोरे, विजय महाजन, शरद बोरसे,निशांत पवार,विलास ढंगारे, संदीप घोडके, सुरेश आगलावे, अंबादास रगडे, डॉ. ज्ञानदेव घुगे, अमोल वाघमारे, विष्णू वखरे, प्रकाश मालकर, डॉ. विश्वनाथ कोक्कर, वैजनाथ शिंदे, संतोष काळे, सुरेखा आढागळे, प्राचार्य ग. ह. राठोड, व्यंकटराव आहेर, संजय गादीवार, मुस्तगीर बेलदार, तुषार अहिरे, डॉ गजानन श्रीमंगले, राजपाल सिंह राठोड इत्यादींची उपस्थिती होती.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

प्रासंगिक

# केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन अमरावती झोन उपाध्यक्षपदी राजेश पाटील सिरसाट

## एका शेतकरी पुत्राची फिनिक्स भरारी

आधुनिक केसरी

देशाची निम्म्याहून अधिक जनसंख्या ही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या शेती व शेतीशी निगडित



व्यवसायावर आधारित आहे. संपूर्णतः निसर्गावर अवलंबून असलेला शेती व्यवसाय हा आजही बेभरवशाचा व कायमचा अंदरबट्ट्यात असणारा व्यवसाय म्हणून संबोधला जातो. मग तो अल्पभूधारक असो या सधन शेतकरी सर्वांची गत एकच. परिणामी, जगाचं पोट भरणाऱ्या बळीराजाकडे पाहण्याचा सुशिक्षित समाजाचा दृष्टिकोन हा नेहमी मागासलेला असायचा. याची खंत एका सधन व प्रगतिशील आदर्श कुटुंबात जन्मलेल्या राजेश तुकाराम सिरसाट ( पाटील ) यांना नेहमी बोचायची. घरी सहा बैलांची शेतीवाडी असतांना सुद्धा त्यांनी आपल्या पारंपरिक व्यवसायाला जोड देण्याचा चंग बांधला.आणि औषध शस्त्रातून आपले शिक्षण पूर्ण करून वाशिम शहरात माऊली मेडिकलच्या माध्यमातून व्यवसायास सुरुवात केली. पाहता पाहता आपल्या मनमिळावू व विनम्र स्वभावाच्या बळावर ते एक यशस्वी व्यावसायिक म्हणून केवळ वाशिम शहरातच नव्हे; तर संपूर्ण



वसंत खडसे
9373578429

विदर्भ, मराठवाड्यात नावारूपास आले. नुकतीच त्यांची केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन अमरावती झोनच्या उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. त्या अनुषंगाने एका शेतकरी पुत्राच्या फिनिक्स भरारीचा हा आढावा.

शेतकरी म्हणजे अशिक्षित, अडाणी, व्यवहार शून्य, गावठी असं म्हणून उच्चभ्रू सुशिक्षित समाजातील लोक आजही शेतकऱ्यांना हिनवत असल्याचे अनेकदा पहावयास मिळते.मात्र, शेतकरी कुटुंबातून आलेले सुशिक्षित शेतकरीपुत्र सुद्धा व्यावसायिक उच्चभ्रू समाजाप्रमाणे यशस्वी व्यावसायिक बनू शकतात हे राजेश पाटील सिरसाट यांनी सिद्ध करून दाखवले आहे. त्यांनी केवळ व्यवसायच केला नाही, तर आपल्या परिवाराकडे सुद्धा शिक्षणाच्या बाबतीत लक्ष दिले. त्यांची एक मुलगी कु. वैष्णवी राजेश सिरसाट ही एमबीबीएस झाली आहे,तर दुसरी मुलगी कु. धनश्री ही BDS झाली आहे.शिवाय भावांच्या मुलामुलींना सुद्धा मेडिकल क्षेत्रात उभे केले आहे. तर बहिणीचे मुलं मंगेश मोरे आणि सुनिल खडसे या दोन भाच्यांना अनुक्रमे कस्तुरी फार्मा आणि माँ रेणुका एजन्सी असे मोठे व्यवसाय करण्यासाठी मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन केले आहे. एवढेच नव्हे; तर गजानन निंबाजी खडसे हा त्यांचा भाचा वेणू सन्सलाईफ सायन्सेस प्रायव्हेट लिमिटेड या माध्यमातून आपल्या भाच्याला एक सफल उद्योजक बनवले आहे.

राजेश पाटील हे मूळचे मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्यात येत असलेल्या माहेरखेड या छोट्याशा गावातील रहवाशी आहेत.त्यांनी १९९७ साली वाशिम शहरात माऊली मेडिकलच्या माध्यमातून व्यवसायास सुरुवात केली. यातूनच त्यांना समाज सेवेची आवड निर्माण झाली. समाज सेवेची व्याप्ती वाढावी म्हणुन केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या माध्यमातून जनसेवेस सुरुवात झाली. केमिस्टांच्या प्रश्नांची जाण व कामाची आवड बघून वरिष्ठांनी त्यांची २०१२ मधे जिल्हाकोषाध्यक्ष म्हणून नियुक्ती केली. आपल्याला दिलेली जबाबदारी पार पाडत असताना त्यांनी केमिस्टांचे प्रश्न सोडविण्यावर भर दिला. परिणामी राजेश पाटील सर्वांच्या विश्वास पात्र ठरले. त्याची पावती म्हणून, २०१६ च्या निवडणुकीत त्यांच्या सर्व उमेदवारांचा दणदणीत विजय झाला आणि राजेश तुकाराम सिरसाट हे वाशिम जिल्हाध्यक्ष पदावर विराजमान झाले. तेंव्हापासून ते एक कुशल संघटक म्हणून पुढे आले आणि संघटनेचे प्रदेशाध्यक्ष जगन्नाथजी शिंदे, प्रदेश सचिव अनिल भाऊ नावंदर आणि प्रदेश उपाध्यक्ष मुकुंद भाऊ दुबे यांच्या आशीर्वादाने दि. १२ अगस्ट २०२२ रोजी राजेश सिरसाट पाटील यांची अमरावती झोनच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. एका शेतकऱ्याच्या मुलाने घेतलेली ही फिनिक्स भरारी पाहून मराठवाडा आणि संपूर्ण विदर्भातून राजेश पाटील यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# चांदा पब्लिक स्कूल येथे स्टुडंट कॅबिनेट कौन्सिलची स्थापना

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चांदा पब्लिक स्कूल येथे दि. 12/08/2023 रोजी विद्यार्थी मंत्रीमंडळ व इंटरअॅक्ट क्लब ऑफ चांदा पब्लिक स्कूलची स्थापना करण्यात आली. तसेच या कार्यक्रमाचे औचित्य साधून शाळेच्या आवारात वृक्षारोपणही करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून रोटरी क्लब ऑफ चंद्रपूर चे अध्यक्ष अनुप यादव, सचिव कुंजबिहारी परमार, रोटरी क्लब ऑफ चंद्रपूर चे युथ डायरेक्टर नेहा कोठारी, श्री. सुरज वाघ, बालक-पालक संघटनेचे सचिव श्री. हेमंत वांढरे, तसेच शाळेच्या संचालिका श्रीमती स्मिता संजय जिवतोडे, प्राचार्या सौ. आम्रपाली पडोळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरवात मान्यवरांच्या स्वागताने करण्यात आली. तद्वतच स्टुडंट कॅबिनेट कौन्सिल मधील सर्व विद्यार्थ्यांना तसेच नवनियुक्त आचार्य चाणक्य हाऊस मास्टर साधना वाढई, महर्षी पाणिनी हाऊस मास्टर संघपाल भसारकर, महर्षी वेदव्यास हाऊस मास्टर जास्मिन हकीम, महर्षी चरक हाऊस मास्टर रूहीना तबस्सुम या सर्व सदस्यांना शपथ दिल्या गेली.

स्टुडंट कॅबिनेट कौन्सिल मधील सर्व विद्यार्थ्यांना आपली पात्रता सिद्ध करतांना बौद्धीक, मानसीक, शारिरीक अशा चाचण्यांमधून जावे लागते तेव्हाच विशिष्ट पदाकरीता त्यांची नियूक्ती




करण्यात येते. स्टुडंट कॅबिनेट कौन्सिल मधील नवनियुक्त सदस्यांमध्ये विद्यार्थी प्रमुख ध्रुव मुंगोले, उपविद्यार्थी प्रमुख सृष्टी जाधव तसेच आचार्य चाणक्य हाऊस कॅप्टन इशना साहारे व सिमरन गंडले, महर्षी पाणिनी हाऊस कॅप्टन युगांती रायपूरे व अश्मित मक्कड, महर्षी वेदव्यास हाऊस कॅप्टन अभिनव पोडे व अदिती बैस, महर्षी चरक हाऊस कॅप्टन शौर्य प्रसाद व मिथीलेश देशपांडे तसेच, स्पोर्ट क्लब इशद बोराडे व मयंक मोडीलवार, लिटरसी क्लब क्रितीका गोडबोले व खुशी तेलंग, सोशल सायंस क्लब अवनी खोब्रागडे व रजत गुलघाने, आर्ट अॅण्ड अॅस्थेटिक क्लब अक्षर टोकला व दिपीका टोंगे, हेल्थ अॅण्ड वेलनेस क्लब अंकिता रंजन व अर्थ राहाटे, इको-प्रो क्लब नीहा चिवंडे व आँचल मांडवकर, कम्युनिटी आउटरीच क्लब अंशुल नवरखेले व कृष्णा घाटे, हेरीटेज क्लब बिमलेंदू हलधर व अभिलेश धात्रक, अर्थमेटीक क्लब आर्या ढवस व चेतना राजगीरे या विद्यार्थ्यांची नियुक्ती करण्यात आली.

यादरम्यान गतवर्षीय स्टुडंट कॅबिनेट कौन्सिल मधील सदस्यांना त्यांच्या कार्याबद्दल प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी रोटरी क्लबच्या युथ डायरेक्टर नेहा कोठारी यांनी नवनियुक्त सदस्यांना शुभेच्छा दिल्या व युवा पिढी ही उज्वल भारताचे भविष्य आहे, त्याकरिता युवापिढीने सतत कार्यशील असायला हवे. समाजाप्रती असलेली आपली कर्तव्ये पार पाडतांना इंटरअॅक्ट क्लबचे सहकार्य नेहमीच लाभेल असे वक्तव्य केले.

यावेळी कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले रोटरी क्लब चे अध्यक्ष श्री. अनुप यादव यांनी विद्यार्थ्यांना समाजात जर आपली ओळख बनवायची असेल तर समाजासाठी काहितरी केले पाहिजे. समाजकार्य, करणे हे आपले आद्यकर्तव्य आहे. इंटरअॅक्ट क्लब च्या माध्यमातून तुम्हाला सामाजिक समस्या सोडविण्याची संधी मिळते. समाजासाठी चांगले कार्य करून तुम्ही आपल्या शाळेचा व आपल्या कुटुंबाचा नावलौकीक वाढवा असे संबोधन केले व भविष्यातील उपक्रमाकरिता शुभेच्छा दिल्या.

शाळेच्या संचालिका श्रीमती स्मिता संजय जिवतोडे यांनी नवनिर्वाचीत स्टुडंट कॅबिनेट कौन्सिल मधील सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी प्राचार्या सौ. आम्रपाली पडोळे आपल्या स्वागतीय भाषणात म्हणाल्या की, स्वतःवर विश्वास ठेवून सकारात्मक दृष्टीकोन बाळगा. आपल्या स्वप्नपूर्तीसाठी सतत प्रयत्नशील रहा. परिश्रम व अभ्यासाने सर्व साध्य होऊ शकते. त्यांनी आपल्या भाषणातून उपस्थित विद्यार्थ्यांमध्ये जबाबदार नागरीक होण्यासाठी कर्तव्याची जाणीव निर्माण करून दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका सौ. मंजुषा गौरकार व सौ. निलिमा पाऊनकर सह विद्यार्थी तन्वी धात्रक, अंशिका भट्टाचार्या, खुशी दमके, नीधि भगत आणि ईश्वरी फरांडे यांनी तर आभार प्रदर्शन सौ. शुभांगी वाकडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी कार्यक्रम प्रमुख श्री. फहीम शेख, स्मृती मून व सर्व शिक्षकांचा सहभाग होता.

# भद्रावती - वरोरा येथील रानभाज्या महोत्सवाचे आ. प्रतिभा धानोरकर यांच्या हस्ते उदघाटन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** सध्याच्या पिढीला रानभाज्यांची माहिती व गोडी लागावी याकरिता रानभाज्या महोत्सवाचे आयोजन भद्रावती व वरोरा येथे करण्यात आले. आमदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या हस्ते या महोत्सवाचे उदघाटन पार पडले.

याप्रसंगी भद्रावती येथे न. प. चे नगराध्यक्ष अनिल धानोरकर, भद्रावती पंचायत समिती माजी सभापती प्रवीण ठेंगणे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी एस. एम. तोटावार, कृषी उपसंचालक चंद्रकांत ठाकरे, उपविभागीय कृषी अधिकारी सुशांत लव्हटे, तालुका कृषी अधिकारी मोहिनी जाधव, कृषी अधिकारी यु बी झाडे, मंडळ कृषी अधिकारी व्ही जे चवले, दत्तात्रय गुंडावार, पी एम ठेंगणे, व्हि बी कवाडे, पांडुरंग सरवदे, एम एन ताजने, एच एल इददे, सुधीर हिवसे, मोहिनी जाधव, अनिल भोई तसेच वरोरा येथे माजी जि प सदस्य सुनंदाताई जीवतोडे, वरोरा तालुका कृषी अधिकारी तथा उपपविभागीय कृषी अधिकारी सुशांत लव्हटे, डॉ सुहास पोतदार, भानुदासजी बोधाने यांची उपस्थिती होती.



महोत्सवात विविध रानभाज्या व पौष्टिक भरडधान्ये तसेच रानभाज्या व भरडधान्यांची विविध व्यंजने, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उन्नयन योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या नवउद्योजकांना उत्पादने प्रदर्शनी व विक्रीकरिता उपलब्ध होते. उत्तम आरोग्याकरिता रानभाज्या व भरडधान्ये उत्तम पर्याय असल्याचे प्रतिपादन आमदार प्रतिभाताई धानोरकर यांनी आपल्या उद्घाटनीय भाषणातून केले. रानभाजी महोत्सव चे महत्व व विविध रानभाज्यांचे उपयोग तसेच अन्न प्रक्रिया उद्योगात सहभागी होण्याविषयी तालुका कृषि अधिकारी सुशांत लव्हटे यांनी शेतकऱ्यांना संबोधित केले. कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुहास पोतदार यांनी कृषि महाविद्यालयाची शेतकऱ्यांविषयी भूमिका स्पष्ट केली तसेच कांचणी शेतकरी उत्पादक कंपनीची शेतकऱ्यांविषयी भूमिका यशवंतजी सायरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून मांडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय काळे मंडळ कृषि अधिकारी शेगाव यांनी केले. महोत्सवात मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थिती लावली व रानभाज्यांची खरेदी केली.

# कात्रज-कोंढवा रस्त्यावर अपघात

आधुनिक केसरी न्यूज


**पुणे :** कात्रज-कोंढवा रस्त्यावर अपघातांचे सत्र कायम असून, रविवारी रात्री अवजड ट्रकच्या चाकाखाली सापडून ज्येष्ठ महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली. प्रभावती पांडुरंग अनभुले ( वय ७०, रा. विघ्नहर्तानगर, कात्रज-कोंढवा रस्ता ) असे मृत्युमुखी पडलेल्या महिलेचे नाव आहे. अनभुले रविवारी रात्री दहाच्या सुमारास कात्रज-कोंढवा रस्त्यावरुन निघाल्या होत्या. त्यावेळी भरधाव ट्रकने ( कंटेनर ) पादचारी अनभुले यांना धडक दिली. ट्रकच्या चाकाखाली सापडून त्यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर काही काळ कात्रज-कोंढवा रस्त्यावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. याप्रकरणी ट्रकचालकाविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

गेल्या काही दिवसांपासून कात्रज-कोंढवा रस्त्यावर अपघातांचे सत्र सुरू आहे. ५ ऑगस्ट रोजी भरधाव ट्रकने ११ वाहनांना धडक दिली. अपघातात एका दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाला होता. ट्रकने विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनाला धडक दिली. सुदैवाने शाळकरी मुलांना दुखापत झाली नाही. दरम्यान, अपघाताच्या घटनांमुळे स्थानिक रहिवासी संतप्त झाले आहेत. गेल्या आठवड्यात झालेल्या दोन अपघातात दोघांचा मृत्यू झाला होता तसेच पाच जण गंभीर जखमी झाले होते. या पार्श्वभूमीवर गोकुळनगर चौकात अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# मुंबई रेल्वे पोलिसांची हद्द सिंधुदुर्गापर्यंत

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गावर सुरक्षा देण्याची



जबाबदारी असलेल्या मुंबई रेल्वे पोलिसांची हद्द आता सिंधुदुर्गापर्यंत वाढवण्यात येणार आहे. याबाबतचा प्रस्ताव नुकताच राज्य सरकारकडे पाठवण्यात आला आहे.

प्रस्तावानुसार सध्या कोकण रेल्वेच्या सुरक्षिततेची जबाबदारी मुंबई रेल्वे पोलिसांकडे सोपवण्यात येणार असून त्यासाठी कोकणात तीन नवी रेल्वे पोलीस ठाणी स्थापन करण्यात येणार आहे. ४४७ किलोमीटरच्या या अतिरिक्त मार्गाच्या सुरक्षेसाठी कोकण रेल्वे पोलीस उपायुक्त हे पद निर्माण करण्यात येणार आहे. तर कोकण रेल्वेच्या सुरक्षिततेसाठी ८०० पोलिसांचे संख्याबळ देण्याची मागणी करण्यात आली आहे.

कोकण रेल्वेच्या सुरक्षेसाठी कोकण रेल्वे पोलीस उपायुक्त हे नवे पद निर्माण करण्यात येणार आहे. या उपायुक्तांच्या मार्गदर्शनाखाली ८०० पोलीस कर्मचाऱ्यांची गरज असल्याचे प्रस्तावात म्हटले आहे. कोकण रेल्वे पोलीस उपायुक्त मुंबई रेल्वे पोलीस आयुक्तांच्या अखत्यारीत काम करतील.

# सोयगाव परिसरात कापसावरील उपाययोजना करा : कृषी साहाय्यक मानसिंग भोळे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरातील सध्यास्थितीमध्ये गेल्या पंधरा दिवसांपासून पाहिजे त्या प्रमाणात पाऊस पडलेला नाही. ढगाळ वातावरण आणि क्वचित रिमझिम पाऊसामुळे सोयाबीन, कपाशी, तूर पिकांची वाढ कमी झालेली आढळून येत आहे. त्यावर विविध प्रकारच्या किडीचा आणि रोगाचा प्रादुर्भाव आपणास पहावयास मिळत आहे, त्यादृष्टीने शेतकऱ्यांनी उपाययोजना कराव्यात, असे आवाहन सोयगाव कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी सहाय्यक मानसिंग भोळे यांच्या कडून करण्यात आले आहे. कपाशीवर तुडतुडे व फुलकिडे यांच्या नियंत्रणासाठी उपाययोजना कराव्यात. यात प्रादुर्भाव कमी असल्यास पाच टक्के निंबोळी अर्क किंवा बाजारात उपलब्ध असलेली निमयुक्त कीटकनाशकाचा वापर करावा. पिवळे व निळे चिकट सापळ्याचा वापर प्रति एकरी २० प्रमाणे करावा. रसशोषक किडीनी



आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यास प्रति १० लि पाणामध्ये बुप्रोफेजान टक्के प्रवाही २० मिली किंवा डायफैथुरान ५० टक्के पा. मी भुकटी ही १२ ग्रॅम किंवा फेपौनिल ५ टक्के ही ३० मिली याप्रमाणे फवारणी करावी. आकस्मिक मर रोगाचा प्रादुर्भाव सर्वसाधारणपणे सतत पाऊस असल्यानंतर एकदम उघडी मिळाल्यानंतर कपाशीमध्ये आढळतो. याच्या व्यवस्थापनासाठी कपाशीची झाडे ७२ तासाच्या आत आपल्या पायाच्या बोटांनी दाबून घ्यावी. त्यानंतर बाविस्टीन ही ३० ग्रॅम अधिक १३.००.४५ ही १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये घेऊन प्रति झाड १५० ते २०० मिली याप्रमाणे आवळणी करावी. सोयाबीन पिकावर खोडमाशी व चक्रीभुंगा रोगाने आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडास नियंत्रणासाठी इथियान ५० टक्के ही ३० मिली किंवा इंडॉक्सिकार्ब १५.८ टक्के ही ७ मिली किंवा क्लोरेनट्रीनिलीप्रोल १८.५ टक्के ही ३ मिली याप्रमाणे प्रति दहा लिटर पाण्यामध्ये घेऊन फवारणी करावी. अळीवर्गीय किडीच्या व्यवस्थापनासाठी आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यास सरासरी ४ आळ्या प्रति मीटर ओळ याप्रमाणे असल्यास प्रोफेनोफोस ५० टक्के प्रवाही ही २० मिली किंवा इंडॉक्सिकार्ब १५.८ टक्के ही ७ मिली किंवा क्लोरेनट्रीनिलीप्रोल १८.५ ही ३ मिली याप्रमाणे प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तूर पिकावर मुळकुज व खोडकुज च्या व्यवस्थापनासाठी ट्रायकोडर्मा हे १०० ग्रॅम प्रति दहा लिटर पाण्यामध्ये घेऊन तुरीच्या ओळीमध्ये ड्रेंचिंग करावी, असे आव्हान सोयगाव कृषी विभागाचे कृषी सहायक मानसिंग भोळे राजपूत यांनी केले आहे.



## तिरंगा...!

स्वतंत्र भारत देशाला
जगण्याची नवी आस दे !
भ्रष्ट-जुलमी, अन्यायांशी
लढण्या मनात जोश दे !

थोर हुतात्म्यांना स्वर्गात
नेक पुण्यांचा सहवास दे !
ऋण फेडण्यास आम्हाला
प्रभु, सत्याचा सुवास दे !

भृष्ट नितीच्या अंधाराला
माणूसकीचा प्रकाश दे !
एकतेने राहण्या आम्हा
सत्कर्माचा तू आकाश दे !

देशाच्या स्वातंत्र्यासाठी
जगण्या मोकळा श्वास दे !
नेहमी यशस्वी होण्यास
कष्टाच्या फळांची रास दे !

हर घर तिरंग्यासाठी
मातृभुमीला आरास दे !
तिरंगा फडकविण्यास
मनाला हर्ष-उल्हास दे !

- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण.
मो. ९७६४३५०३७४.

## थोर सैनिक

वाट पाहूनी थकले होते
सुट्टी मिळाली कशी तरी
पाहूनी आपल्या गोड परीला
उठले आनंद तुषार उरी

रमता गोड कुटुंबासवे
वेळ ना थांबत पळभरी
एरव्हीच्या प्रतिक्षेची
तोही परीक्षा घेतो परी

हुकूम अचानक येताक्षणी
यावे लगोलग सीमेवरी
वेश घालूनी कर्तव्याचा
तयार सैनिक सत्वरी

सामान आपुले गाडीवरती
केली गाडी सुरू जरी
गोड छकुली समोर येता
गहिवरला पिता तो अंतरी

एक पापा द्या ना बाबा
सांभाळून मी ठेवीन मनी
निधड्या छातीचा पिता तो
सांगे तिजला कुरवाळूनी

मुलगी पिताही खंबीर तितुके
कर्तव्य वर्दीचे जाणतसे
थोर सैनिक भारतभूचे
कुटूंब तयांचे प्रेरकसे

सौ. अंजली राजेंद्र कस्तुरे
छत्रपती संभाजीनगर

## स्वातंत्र्य भारताचे

क्षितिजावरी झळाळे,
स्वातंत्र्य भारताचे
तेजापरी मिळाले,
स्वातंत्र्य भारताचे !

जय हिंदवी युगाचे,
सौभाग्य तारणारे
रक्तास मोल आले,
स्वातंत्र्य भारताचे !

संतप्त आसवांनी,
निःशस्त्र वार केले
परक्यास ना कळाले,
स्वातंत्र्य भारताचे !

वीरांगना जळाची,
समशेर होत आहे
विश्वस्त वेगळाले,
स्वातंत्र्य भारताचे !

मौनात बोलण्याचा,
उपयोग फार आहे
निष्पर्ण वृक्ष न्हाले,
स्वातंत्र्य भारताचे !

गनिमांस मारणारा,
तो देह क्रूर झाला
प्रारब्ध हे निघाले,
स्वातंत्र्य भारताचे !

नरवीर सैनिकाने, संग्राम सार्थ केले
साकार स्वप्न झाले, स्वातंत्र्य
भारताचे !

©® प्रदीप बडदे, (नवी मुंबई)
मो. ९५९४०२७९९५



## मैत्री

नात्याची न गोत्याची
रक्ताची न हाडा मांसाची
पण जिवाभावाची
तूझी माझी मैत्री
लोभाची न हव्यासाची
मोठेपणाची न हेव्यादाव्याची
पण घोर ओढीची
तूझी माझी मैत्री
रूपाची न रंगाची
विशिष्ट नाही कुठल्या ढंगाची
परक्यातली आपली
तूझी माझी मैत्री
एक सूर ना एक रंग
एक जीव न एक अंग
पण, एक साथ एक संग
तूझी माझी मैत्री
ना बांधलेलं तरीही न तुटलेले
साऱ्या नात्यांना पुरून उरलेलं
अथःपासून अंतापर्यंत
तूझी माझी मैत्री
कल्पना मापूसकर
मीरारोड, ठाणे, 90826 46494

## मेरे पापा प्यारे पापा...

जल्दी उठकर जाओ पापा
खेल खिलौने लाओ पापा...

सब से पहले मैं जो उठती
घर आंगन में फूल सजाती
साथ मेरे हो जाओ पापा ...

शाम हुई खिड़की से झांके
रस्ता देखें मेरी आँखें
जल्दी से घर आओ पापा...

गांव में अब मेला आया है
खेल कूद मौसम छाया है
मुझ को सैर कराओ पापा...

कभी न कोई हठ मैं करती
आप कहे जो मान भी जाती
मम्मी को समझाओ पापा...

मुझे पसन्द है रसमलाई
देखो बाहर कुल्फी आई
मीठा कुछ खिलाओ पापा...

मन लगाएं मुझे पढ़ना है
दुनियां में आगे बढ़ना है
स्कूल मुझे ले जाओ पापा ...

कोई पूंछे सब से प्यारा
दुनियां में है कौन तुम्हारा
प्यारे तुम बतलाओ पापा...

© बलराज संघई
9420015108



## दिस सोनियाचा

दिस सोनियाचा गोड
आज पहा उगवला
ध्वज तिरंगा गर्वात
उंच नभी फडकला..

जग झोपेत हो सारे
मिटे सारा हो अंधार
सूर्य घेऊनी प्रकाश
आज आला भुईवर..

इथे रक्ताच्या नद्यांनी
घडविला इतिहास
भूमी रंगली रक्तात
स्वातंत्र्याची तिला आस ..

खूप भोगल्या यातना
अन जुलमी वेदना
भूमी केली हो गुलाम
हरवल्या संवेदना..

जाग येता भुमीपुत्रा
सारे झाले एक आता
युद्घ स्वातंत्र्याचे सुरु
नारा चलेजाव देता..

क्रांतीपर्व सुरु होता
कापे फिरंगी शासन
काळे पाणी भोगण्याचा
मिळे पुत्रास सन्मान..

राजगुरू व भगत
सुखदेव मोठा भाऊ
होई शहीद हसत
गुण आज त्यांचे गाऊ..

नेता सुभाष आमुचा
नाही तयास रे जोड
सेना हिंद ती आझाद
युद्ध करी अवघड..

देता प्राणाची आहुती
तेव्हा मिळे हो आजादी
आज देश माझा पुढे
शोभे साऱ्या जगामधी....

ज्ञानेश्वर गायके.कन्नड
मो..९४०३३८४८८९

## स्वातंत्र्याची उलटूनी सत्तरी ।

स्वातंत्र्याची उलटूनी सत्तरी ।
तरी नाही स्त्री, आत्मनिर्भर ||
आहिल्या पुन्हा घेशील कधी,
अवतार ।।धृ।।
स्त्री ही होती तुझ्यादेव्हरयावरील
देवता ।आजच्या युगात तिची
काय सांगु व्यथा ।।संपेल कधी
तिचा, मानशीक छळ ।होईल पुर्ण
कस, महिला विश्वासाच वर्तुळ ।।
निर्भया सारख्या घटनेवरती फक्त
कोरडी फुंकर || धृ ||
वादळात सापडलेली अहिल्या
तू नौका ।जीवनात धैर्य कैसे,
शिकविले तू लोका ।।पती गेले,
पुत्र गेला कोसळले ग आभाळ ।
मन करुन पाषाण, केला प्रजेचा
सांभाळ ।।
कर्तुत्वा जागुन आयुष्यभर झाली
दिन दुबळयाचा आधार ।।धृ
सती प्रथेला देवून, मुट माती ।
ध्यास देश सेवेचा घेतला तू हाती ।।
महिलाना देवून लष्करी शिक्षण ।
देवून हाती भाला, धनुष्य बाण ।।
ज्योतिर्लिंगचा करुन जिर्नोध्दार,
बांधले तीर्थक्षेत्री मंदीर ॥ धृ ॥
जाती धर्माच्या, तोडून भिंती ।
केली अस्पृश्यतेची बंधन मुक्ती ।।
प्रत्येक राज्याचा वकील नेमून ।
केली आदर्श न्याय व्यवस्था निर्मान
।।
मृत्युदंडाची शिक्षा देणारी पहिली
आई तू कठोर ॥धृ।।
नाही चुकून ढळला, कधी डोईवरचा
पदर ।हाती नित्य शिवलिंग, नाही
पडला विसर ।।
होऊनी कर्म योगिनी, फ़ेडीले तू
मातृभुमिचे ऋण ।घेउनी पदवी
पुण्यश्लोक, जगी मिळविला
बहुमान || धृ ||
कवी भावले वर्णविती माते, तुझ्या
जीवनाचा सार
अहिल्या पुन्हा घेशील कधी अवतार
कवी- आप्पाराव भावले,
गंगापुर (ज)

## लाडाची लेक

आई बापाची लाडाची
तू जाशिल सासरी ग,
तुझी आठवण पोरी मला
हर घडीला येईल ग...|| १ ||

माय बापाची तू चीमणी
आज उडून तू गेली,
तुझ्यासाठीच ग पोरी
सारी जींदगी ही गेली...|| २ ||

शिलवंतांची तू लेक
आहे एकोणती एक,
चारित्र्यान ग तू नेक
बुद्ध भिमाची तू लेक....|| ३ ||

लहानाचे मोठे करून
सांभाळीले ग मी तूला,
तुझ्याविना ग जीवण हे
सुने-सूने वाटे मला...|| 4 ||

तुझ्या सुखासाठी मी ग
कष्ट सोसले अपार,
अंगावरी मी सोसली
भर उन्हाची दूपार...|| ५ ||

या स्वार्थी दुनियेत
कोणी नाही ग कोणाचे,
दिल्या घेतल्याचे सारे
मतलबी या मणाचे...|| ६ ||

कोण विचारिल तुला
मी दूरदेशी जाता,
नको विश्वास तू ठेवू
गणगोतावरी आता...|| ७ |

तुझ्या जीवाची ग पोरी
काळजी वाटे मला,
मी सोडून गेल्यावरी
कोण पाहिल ग तूला...|| ८ ||

सागरकुमार झनके,
9822575244



## तर तू तिरंगा नको लावू...

स्वातंत्र्याची लढाई
जर तू आजही वाचली नाहीस,
गांधी, नेहरू, भगतसिंग, सुभाषबाबू, आंबेडकर
हुतात्म्यांचे बलिदान ठाऊक नाही.
...तर तू तिरंगा नको लावू. . .
आजही तुझ्या घरावर
तुझ्या धर्माचा झेंडा फडकत असेल
...तर तू तिरंगा नको लावू. . .
सोशल मिडियावर इतर धर्मिय
भारतीय बांधवांबाबत तू विखारी पोस्टत असशील
...तर तू तिरंगा नको लावू. . .
घरातला सगळा कचरा रस्त्यावर
आणून तुच टाकत असशील
...तर तू तिरंगा नको लावू. . .
सिग्नल पडलेले असताना
इतर लोक जागेवर उभे असताना
भरधाव वेगात तू सिग्नल तोडून पळत असशील
...तर तू तिरंगा नको लावू. . .
निदर्शने करताना, आग्रह धरताना
तुझ्या हातात दगड घेऊन लालपरीची काच तू आजही
फोडत असशील
...तर तू तिरंगा नको लावू. . .
कोणा दुसर्याच्या खिशातील पैशावर
डोळा ठेवून तो हडप करायचे तुझ्या मनात सहज येत
असेल तुझ्या
...तर तू तिरंगा नको लावू. . .
पर्यावरणाचा -हास होताना पाहूनही
निर्माल्य आणि मुर्त्या नदीत टाकत असशील
...तर तू तिरंगा नको लावू. . .
कितीही महामारी पसरत असली
तरी मावा खाऊन रस्त्यावर थुंकत असशील
...तर तू तिरंगा नको लावू. . .
देवा धर्माच्या नावावर बाजार मांडून
ख-या भाविकांना लुबाडत असशील
...तर तू तिरंगा नको लावू. . .
कोणी काय खावं, कोणी काय घालावं ?
यावर तू अधिकार सांगत असलास
...तर तू तिरंगा नको लावू. . .
खोट्याचा सन्मान अन् ख-याचा अपमान
असा अविवेकाचा जागर करतोयस
...तर तू तिरंगा नको लावू. . .
खरं बोलण्यापेक्षा कोणासाठी
फक्त बरं बोलत असशील
...तर तू तिरंगा नको लावू. . .
समोरच्याचे विचार पटले नाही
म्हणून कोणाचा खून करण्याचा विचार करीत असशील
...तर तू तिरंगा नको लावू. . .
भौतिक सुखासाठी वर्षानुवर्षे वाढवलेली झाडे कापून,
जंगल संपवीत असशिल
...तर तू तिरंगा नको लावू. . .
धनदांडग्यांना सोडून
कष्टकऱ्यांची पिळवणूक करत असशील
...तर तू तिरंगा नको लावू. . .
तुझ्या भारतातील नागरिक तुला
बांधव वाटत नसतील
...तर तू तिरंगा नको लावू. . .
स्वातंत्र्य, समता, बंधुतेचा अर्थ
कधीच शांतपणे कोणाकडून समजून घेत नसशिल
...तर तू तिरंगा नको लावू. . .
धर्मनिरपेक्षता म्हणजे काय ?
ते न समजता आकांडतांडव करीत असशील
...तर तू तिरंगा नको लावू. . .
दर पावलाला लोकशाहीचे मुल्य
पायदळी तुडवुन हिटलरी भाषा करीत असशील
...तर तू तिरंगा नको लावू. . .
लोकप्रतिनिधी निवडताना
दारू, मटन, पैसा आणि जात धर्म बघून मतदान करीत
असशील
...तर तू तिरंगा नको लावू. . .
स्वतःचा धर्म आणि जात ही
संविधानाच्या पेक्षा मोठी वाटत असेल
...तर तू तिरंगा नको लावू...
भारतीय स्वातंत्र्याचा आणि मानवी मूल्यांचा आग्रह
धरणारा तिरंगा लावून.
शांती सद्भाव व करुणेला दूर सारून
स्वार्थी, राक्षसी व हुकुमशाही कृती करणार असशील
...तर तू तिरंगा नको लावू. . .
खरंच सांगतो
तू तिरंगा नको लावू. . .
लक्ष्मण निदानकार, नांदेड

## आम्ही भारतवासी

आम्ही भारतवासी, आम्हां आहे
अभिमान असेच राहूया सदैव मिळून,
मिसळून. भारत मातेचे आम्ही
लेकरे गुणगान महाविभूतींची ठेवूया
सदैव जाणं आमचा तिरंगा शोभते
साऱ्या विश्वात पोहोचला आहे आज
घराघरात स्वाभिमानी राहू, बोलू
प्रेमाने प्रत्येकांशी आपण आहोत सारे
भारतवासी या मातीशी जुळून राहू
जन्मभर तीच देईल आम्हांला आधार
नकोच द्वेष नकोच कोणाचा तिरस्कार
गोर, गरीबांना आपुलकीने देऊया
आधार विसरून जाऊ मतभेद,
जातीभेद मिटवून टाकू व्यर्थ झगडे,
वाद स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देऊया
बंधू भावाने मिळून, मिसळून राहूया
सौ. संगीता संतोष ठलाल



मु.कुरखेडा, जि.गडचिरोली
७८२१८१६४८५